अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक

मेहता मराठी ग्रंथजगत

फेब्रुवारी २०१४ | किंमत १५ रुपये

Digital Edition

मेहता मराठी ग्रंथजगत

◆ फेब्रुवारी २०१४ ◆ वर्ष चौदावे ◆ अंक दुसरा

– अनुक्रमणिका –

संपादकीय	४
साहित्यवार्ता	८
पुरस्कार	३६
साहित्य संमेलन	५०
सातारा ग्रंथमहोत्सव	५६
पुस्तक परिचय	६४
श्रद्धांजली	१००
बालनगरी	११०

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी :
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी
मेहता पब्लिशिंग हाऊस

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवन समोर, पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
Extension (ग्रंथजगत विभाग) - २२४/२२५
E-mail : info@mehtapublishinghouse.com

डिजिटल अंकाची वर्गणी : तीन वर्षांची ३००रु., पाच वर्षांची ४००रु.

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

संमेलनांचे साचेबंद स्वरूप बदलायला हवे

डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी हे महिने महाराष्ट्रात आता इतर पारंपरिक सण-उत्सवाच्या जोडीनेच साहित्यसंमेलनांचे आणि गावोगावच्या ग्रंथजत्रांचे दिवस म्हणून मराठी अस्मितेला सुखावणारे ठरतील असे एकूण वातावरण आहे. आणि ते तसे आहे ही आनंदाची आणि अभिमानाची बाबा आहे. दमाणी, लाभसेटवार यासारखे पुरस्कार, साहित्य अकादमीचे पुरस्कार, ज्ञानपीठ-सरस्वती सन्मान पुरस्कार, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे ग्रंथ पुरस्कार (३१ मार्चला संपणाऱ्या आर्थिक वर्षाचे पुण्यकर्म गाठीला बांधण्याचे श्रेय!) वगैरे याच सुमाराला घोषित होतात आणि त्यामुळेही एकूण नव्या जुन्या लेखक-कवींच्या आशाआकांक्षा पल्लवित होतात. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा मान अर्थातच मोठा. त्याचे अर्थकारण, त्याचे आमंत्रण, त्यातील सहभाग, त्यातील मान-अपमान आणि वाद -प्रवाद यांच्या लज्जतदार बातम्यांनी माध्यमांचा टीआरपी चांगलाच वाढतो. महाराष्ट्रात हजारावर लेखक-समीक्षक-प्राध्यापक आणि कवी (त्यांची संख्या सांगणे कठीण! पाचदहा हजार काहीही आकडा टाका. तो बरोबर ठरेल) यांना तीनचार दिवसांमध्ये दोनतीन मंडपात एकटे अ.भा.सा. संमेलन कसे समावून घेणार? तेव्हा विद्रोही साहित्य संमेलन, बालकुमार साहित्य संमेलन, महिला साहित्य संमेलन, सानेगुरुजी कथामाला, सम्यक संमेलन, समरसता साहित्य संमेलन, दुर्ग साहित्य संमेलन, समीक्षक संमेलन, पक्षिमित्र संमेलन, पर्यावरण, आदिवासी-वनवासी साहित्य संमेलन, जैन साहित्य संमेलन, ख्रिस्ती, मुस्लिम, अस्मितादर्श, अंकुर, मराठावाडा, विदर्भ, कोमसाप, दक्षिण महाराष्ट्र, कामगार, स्त्रीवादी – अशी किती संमेलने

भरतात आणि एका परीने ती सर्वांना साहित्यकार म्हणून आपली खास ओळख मिळवून देतात. त्या संमेलनाच्या जोडीने ग्रंथप्रदर्शनेही भरतात. त्यात हजारो पुस्तकांची विक्री होते. सर्वच जण पुस्तके घेतात असे नाही. पण काही लोक निदान पुस्तके तरी चाळतात. पुस्तक नावाची काहीतरी गोष्ट विक्रीसाठी असते आणि ती विकत घेणारे शेकडो खुळे लोक असतात हे लक्षात येते आणि आपणही त्यांच्यात सामील व्हावे – असे कोणकोणाला वाटते. एकूण संमेलन-ग्रंथप्रदर्शने-पुरस्कार या निमित्ताने ग्रंथव्यहाराला चांगली चालना मिळते एवढे निश्चित!

या बहुतेक संमेलनांचे सध्याचे स्वरूप हे खूपच साचेबंद झाले आहे; त्यामुळे या संमेलनाला होणारी गर्दी कधीकधी आश्चर्यकारक वाटते, तर कधी कधी त्यांना श्रोत्यांचा, रसिकांचा फारच अल्प प्रतिसाद मिळाल्याचाही अनुभव अस्वस्थ करतो. रसिक या संमेलनांना उपस्थित राहतात ते वाङ्मयाचे अभ्यासक म्हणून नव्हे तर यापेक्षा काहीतरी चांगले, वेगळे, पहायला मिळेल, थोरामोठ्यांना भेटता येईल; त्यामुळे रंजन होईल, अविस्मरणीय असे काही अनुभवायला मिळेल या अपेक्षेने. कधी कधी दिग्गजांची जुगलबंदी रंगते आणि रसिकांना ती तृप्त करते.

पहिल्या दिवशी सकाळी ग्रंथदिंडी, दुपारी ग्रंथदर्शनाचे उद्‌घाटन, संध्याकाळी उद्‌घाटनाचा मुख्य सोहळा, मावळत्या अध्यक्षांचे भाषण, स्वागताध्यक्षांचे भाषण, नवीन स्थानापन्न झालेल्या अध्यक्षांचे भाषण, रात्री कविसंमेलन, दुसऱ्या दिवशी दोन तीन परिसंवाद, मुलाखती, बालमेळावा, एखाद्या विषयावर चर्चासत्र, सत्कार, परिसरातील साहित्यकार कलावंतांचे स्मरण, रात्री संगीत नाटक वा करमणुकीचे कार्यक्रम, शेवटच्या दिवशी ठराव, समारोप, मांडवपरतणी. त्यात करमणुकीच्या कार्यक्रमांना आणि नामवंत कलाकारांना चांगली गर्दी असते. परिसंवादांना शेसव्वाशे श्रोते मिळणे हेही खूप मोठे यश! परिसंवादांचे जे विषय महामंडळाने ठरवलेले असतात ते बरेच बाळबोध किंवा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे प्रबोधन करणारे असतात; वर्षानुवर्षे ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, संतवाङ्मय, विद्रोही बंडखोर विचार – वगैरे तेच ते विषय शीर्षके बदलून घेतले जातात. वक्तेही तेच ते असतात. स्थानिक लोकांचे त्यात भरताड असल्याने बाहेरच्या श्रोत्यांना त्याबद्दल फारसा उत्साह नसतो.

बहुतेक संमेलने ही अशा चाकोरीतल्या कार्यक्रमांमुळे आता कंटाळवाणी, रटाळ वाटतात. पंढरपूरच्या नाट्य संमेलनाने त्यामुळे की काय या वेळी एक धाडसी निर्णय घेतला. एकही परिसंवाद ठेवायचा नाही असे जाहीर केले. त्याऐवजी रंजनावर भर देऊन एकांकिका, एकपात्री प्रयोग, थेट मुलाखती वा नाट्यप्रवेश, अभिरूप न्यायालय, हौशी रंगकर्मीचे कार्यक्रम यांना प्राधान्य दिले. नाट्य संमलेनात

एकदोन नव्हे तर पाच नाटकांचे प्रयोग ठेवले. (गाढवाचे लग्न, करून गेलो गाव, ड्राय डे, बया दार उघड, प्रतिसंगम) निरनिराळ्या विद्यापीठातील नाट्य विभागातील विद्यार्थ्यांना खास आमंत्रित करून मराठी नाट्यपरंपरेचा बहुरंगी परिचय व्हावा असा प्रयत्न केला. परभाषक नाट्यकलावंतांनाही उपस्थित राहावे असा आग्रह धरला.

बदलत्या काळानुसार संमेलनांचे स्वरूपही बदलण्याचा हा प्रयोग यशस्वी ठरेल असे वाटते. पंढरीचा पांडुरंग बडवे–उत्पातांच्या मगरमिठीतून मुक्त श्वास घेईल; तसेच हे नाट्यसंमेलन ठरीव साचा झुगारून देऊन आबालवृद्धांना अभिनव कलानंदाचा आनंद देईल. नाट्यलेखक, दिग्दर्शक, कलाकार, समीक्षक, अन्य रंगकर्मी, प्रसार माध्यमांचे प्रवर्तक या सर्वांना या संमेलनातून नवीन दृष्टी लाभेल, कलाकृतींचे नवे आदिबंध उलगडतील.

प्रकाशन क्षेत्रात ई-बुक्स, मल्टिमिडिया, इंटरॲक्टिव्ह बुक्स, पॉटरमोअर सारखे नवे प्रयोग सध्या चालू आहेत. जागतिकीकरणामुळे तंत्रज्ञानातील दरी कमी कमी होत आहे.

नाट्यक्षेत्रात, चित्रपटक्षेत्रातही खूप परिवर्तन होत आहे.

दहा मिनिटांचे नाटक, एकपात्री प्रयोग, नि:शब्द अभिनय, दृक्श्राव्य सादरीकरण वगैरे प्रयोग नाट्यानुभवाला पोषक ठरू शकतील.

... नवनव्या कल्पनांना आता स्वैर, मुक्त संचार करायला वाव आहे.

या मुक्ततेचा वापर सर्जनशीलतेला संपन्न बनवील. देशोदेशींचे कलाकार एकत्र येऊन नवनव्या शक्यता प्रत्यक्षात आणू शकतील.

संमेलनांद्वारे, महोत्सवांद्वारे, ग्रंथजत्रांद्वारे अशा नव्या प्रयोगांचे जागतिक पातळीवर सादरीकरण सुलभपणे होऊ शकेल.



नम्र सूचना

'मेहता मराठी ग्रंथजगत'च्या सर्व वाचकांनी कृपया नोंद घ्यावी की यापुढे 'मेहता मराठी ग्रंथजगत'साठी एक वर्षाची सभासदत्व ही योजना 'एप्रिल २०१४' पासून आम्ही बंद करत आहोत. यापुढे कुठल्याही जुन्या सदस्यास अथवा नव्याने सदस्यत्व घेणाऱ्या व्यक्तीस एक वर्षाचे सभासदत्व मिळू शकणार नाही. तीन व पाच वर्षांचे सभासदत्व योजना मात्र पूर्वीप्रमाणेच चालू राहील.

आगामी

अत्याचाराच्या धगीतून
सोन्याप्रमाणे तेजाळून
निघालेल्या मुलीची आत्मकथा

...तरीही जिवंत मी!

मूळ लेखिका : **सुआद**

अनुवाद : **गौरी केळकर**

ही सुआद नावाच्या पॅलेस्टिनी तरुणीची कहाणी आहे. एखाद्या मुलाकडे नुसतं पाहिलं किंवा त्याच्याशी बोललं म्हणून नावं ठेवणाऱ्या संकुचित आणि पुरोगामी पॅलेस्टिन समाजात एक तरुण सुआदला लग्नाचं वचन देऊन फसवतो. याची कठोर शिक्षा सुआदला मिळते आणि तिच्या पोटात वाढत असलेल्या बाळासह तिला जिवंत पेटवून दिलं जातं. ऑनर क्राइमच्या या क्रूर अनुभवातून सुआद वाचते. समाजसेवी संघटनेच्या एका कार्यकर्तीमुळे सुआदला जीवनदान मिळते आणि युरोपात तिचं नवं आयुष्य सुरू होतं. बालपणी सोसलेला कमालीचा छळ, गुरासारखा खाल्लेला मार, मरेस्तोवर केलेलं काम आणि दुसरीकडे, युरोपातल्या पुढारलेल्या समाजातलं जीवन, आगीच्या खाणाखुणा अंगावर वागवत जिणं, नवरा व मुलांकडून प्रेम, मानसिक आधार अशी सुआद डोंगराएवढं धाडस करून आपली कथा सगळ्या जगापुढे मांडते. तिच्यासारखा प्रसंग ओढवलेल्या मुलींना धीर देण्याचा प्रयत्न करते. हा तिचा प्रवास काळजाला घर पाडणारा, त्रासदायक आहे पण त्याला धैर्याची, माणुसकीची, इच्छाशक्तीची, सहनशक्तीची प्रेरक झालरही आहे.

☞ व्यंकटेश माडगूळकरांच्या वस्तूंचे संग्रहालय साकारणार

सिद्धहस्त लेखणी आणि सिद्धहस्त कुंचला यांच्याशी अद्वैत साधलेले व्यंकटेश माडगूळकर यांना जंगलाचं वेड होतं. मुक्या प्राण्यांचं भावविश्व ते जितक्या सखोलपणे जाणायचे तितकंच माणसं वाचण्याचं त्यांचं कसबही विलक्षण होतं. 'बनगरवाडी' आणि 'माणदेशी माणसं' यांसारख्या अजरामर कलाकृतींच्या निर्मात्याचे निवासस्थान असलेला 'अक्षर' हा टुमदार बंगला आता काळाच्या पडद्याआड गेला आहे, परंतु नव्या वास्तूत त्यांच्या नित्य वापरातील वस्तूंचे संग्रहालय साकारणार आहे. प्राप्तिकर कार्यालय गल्लीतील या बंगल्यात १९६१ पासून व्यंकटेश माडगूळकर यांचा निवास होता. एका लेखकाचे घर कसे असावे हे ध्यानात घेऊन माधव आचवल यांनी त्याची वास्तुरचना केली होती. ज्येष्ठ साहित्यिकांचा सहवास, लेखनाच्या प्रांतामध्ये 'धुळाक्षरे' गिरवू पाहणाऱ्या नवोदित लेखकांना तात्यांनी केलेले मार्गदर्शन, व्यंकटेश माडगूळकर, द. मा. मिरासदार आणि शंकर पाटील या तिघांचे एकत्रित कथाकथन, जंगल भटकंती आणि शिकारीचा छंद या साऱ्या घटनांचा हा बंगला गेली पाच दशके साक्षीदार होता. पंडित-जावेडकर बिल्डर्स नवी वास्तू विकसित करीत आहेत, अशी माहिती माडगूळकर यांच्या कन्या ज्ञानदा नाईक यांनी दिली. त्या म्हणाल्या, या वास्तूत तात्यांची स्मृती जतन व्हावी या आमच्या इच्छेला सकारात्मक प्रतिसाद लाभला आहे. त्यामुळे येथे छोटेखानी संग्रहालय साकारले जाणार आहे. तात्यांची स्टडी रुम, त्यांच्या स्वत:च्या ग्रंथालयातील इंग्रजी साहित्याची अभिजात पुस्तके, तात्यांनी लेखन केलेली पुस्तके, त्यांचा सूट, चष्मा, गॉगल, पाइप, पेन, फिरायला जाताना ते बरोबर घ्यायचे ती काठी यांसह त्यांच्या लेखनाच्या वह्या, टिपण वह्या, तात्यांनी चितारलेली चित्रे, स्केच बुक्स अशा गोष्टी पाहावयास मिळणार आहेत. तात्यांचा छायाचित्रांचा संग्रह, त्यांच्या पुस्तकांसाठी ज्येष्ठ चित्रकार दीनानाथ दलाल यांनी चितारलेली जुनी मुखपृष्ठे, तात्यांनी रेखाटलेली वन्यजीवांची

चित्रे याचाही या संग्रहालयामध्ये समावेश असेल. आगामी दोन वर्षांत हे संग्रहालय साकारणार आहे.

☞ पानिपतकारांना शनिवारवाडा भूषण पुरस्कार

पानिपतकार विश्वास पाटील यांना १० जानेवारी रोजी शनिवारवाडा भूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. शनिवारवाड्याच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात द.मा. मिरासदार यांनी पाटील यांना मानचिन्ह दिले. पतित पावन संघटनेतर्फे हा कार्यक्रम झाला.

☞ हर्ष परचुरे यांच्या 'वनाचे श्लोक' पुस्तकाचे प्रकाशन

वनांमधील सौंदर्य, जैवविविधतेतील त्यांची भूमिका, प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे माणसाच्या अस्तित्वाशी जोडले गेलेले नाते सांगणाऱ्या 'वनाचे श्लोक' या पुस्तकाचे प्रकाशन वनस्पती तज्ज्ञ डॉ. श्री. द. महाजन यांच्या हस्ते झाले.

या पुस्तकात २२५ श्लोक असून, वृक्षांचे जीवनचक्र, निसर्गचक्रातील त्यांचे महत्त्व, वनांचे प्रकार, वनांमध्ये आढळणारे घटक, जलसंवर्धनातील त्यांची भूमिका, वनांविषयी प्रचलित असलेल्या चालीरीती, परंपरा, मानव आणि वनांच्या नात्याचे विविध पैलू मांडण्यात आले आहेत.

या वेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ. विश्वंभर चौधरी, ज्येष्ठ पर्यावरण अभ्यासक विजय परांजपे उपस्थित होते.

☞ 'पुरुषोत्तम'वर पुण्याचीच छाप

पुरुषोत्तम करंडक स्पर्धेच्या अंतिम फेरीत पहिल्या चारपैकी तीन क्रमांक पुण्याच्या महाविद्यालयांनी पटकावले आहेत. पहिला क्रमांक 'एमआयटी'च्या 'क'ला काना 'का' या एकांकिकेने तर दुसरा क्रमांक स.प. महाविद्यालयाच्या 'बेल'या एकांकिकेने मिळविला. इस्लामपूरच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या 'सायलेंट स्क्रिप्ट'-या एकांकिकेने तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस मिळवले. चौथे प्रायोगिक बक्षीस भारती विद्यापीठाच्या फाईन आर्टस् महाविद्यालयाच्या 'उळागड्डी' एकांकिकेने मिळविले. एकूण सात विभागांत २२ महाविद्यालये सहभागी झाली होती. सुप्रिया विनोद, सतीश राजवाडे व प्रसाद वनारसे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

☞ 'लिम्का'मध्ये सामूहिक माऊथ ऑर्गन वादन

'याद किया दिलने कहाँ हो तुम', पल पल दिल के पास', 'पिया तोसे नैना लागे रे', 'किसी नजर को तेरा इंतजार आज भी है' यापासून ते 'जरा सी दिल में दे जगह तू' अशी श्रवणीय गीते ऐकताना गायकाच्या स्वराबरोबरच लक्षात राहतात

ते माऊथ ऑर्गनचे सूर. 'शोले' चित्रपटातील धून तर या वाद्यानेच सजली आहे. प्रसिद्ध माउथ ऑर्गनवादक सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली १०६ जणांनी ही धून सादर केली आणि 'लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'ने या अनोख्या विक्रमाची नोंद घेतली.

शोले चित्रपटातील धूनबरोबरच भूप रागातील रचनेवर प्राणायामावर आधारित सुरक्रिया ही सामूहिक धून देखील सादर केली. पाटील हे सुरभि संगीत अकादमीच्या माध्यमातून माऊथ ऑर्गन आणि बासरीवादनाचे शिक्षण देतात.

या विक्रमाबद्दल सुनील पाटील यांनी २९ डिसेंबर रोजी ब्रह्मे सभागृह येथे माउथ ऑर्गन वादनाची मोफत कार्यशाळा आयोजित केली होती.

☞ फॉण्ट डाउनलोड

अनेकदा एखादा फॉण्ट डाउनलोड करण्यासाठी आपण थेट फॉण्टच्या नावाने गुगल सर्च करतो. मात्र http://in.ffonts.net/ या साइटवरूनही वेगवेगळ्या भाषांतील १४ हजारपेक्षा जास्त फॉण्ट डाऊनलोड करू शकता. फॉण्टच्या स्टाइल्सनुसार फॉण्ट शोधून इन्स्टॉल करता येतात.

☞ बौद्ध काळातील समर्थ स्त्रियांचा इतिहास

निसर्गाने वाट्याला दिलेल्या विविध भूमिकांचे पालन करीत असतानाही माणूसपणाला सर्वाधिक महत्त्व देणाऱ्या बुद्धांच्या काळातील 'थेरी'चे जीवन यावर प्रा. आशालता कांबळे यांचे ४ जानेवारी रोजी व्याख्यान झाले.

भिक्खुणी संघात सामील झाल्यानंतर बुद्धाने सांगितलेल्या आठ कठोर नियमांचे पालन करून समाजकार्य करणाऱ्या थेरींच्या काव्यरचना म्हणजे 'थेरीगाथा'. यातील ७३ भिक्खुणींच्या ५२२ गाथा १६ सर्गामध्ये मांडलेल्या आहेत. कधी थेरींचा स्वत:शीच संवाद, अशा स्वरूपातील या वचनांमध्ये सामर्थ्यशील स्त्रीचे प्रतिबिंब उमटलेले आहे.

बौद्ध तत्त्वज्ञानाने त्यांच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणलेले आहे. स्त्री म्हणून निसर्गानेच वाट्याला दिलेल्या पत्नी, आई या भूमिका थेरींनी नाकारल्या नाहीत, पण आयुष्यभर त्या या भूमिकांत गुंतूनही पडल्या नाहीत. काही काळ त्या भूमिकांत जगून त्यानंतर स्त्री आणि पुरुष यांच्या पलिकडे जाऊन 'माणूस' म्हणून त्या जगल्या.

☞ पृथ्वीवरील सर्वांत थंड ठिकाण

अमेरिकी अवकाश संशोधन संस्थेच्या (नासा) उपग्रहाने जगातील सर्वांत थंड जागा शोधून काढली असल्याचा दावा 'नासा'च्या शास्त्रज्ञांनी केला आहे. पूर्व

अंटार्क्टिकामध्ये असलेल्या या ठिकाणाचे तापमान -९३.२ अंश सेल्सियस (-१३५ डिग्री फॅरनाइट) नोंदविण्यात आले आहे. या पूर्वी पूर्व अंटार्क्टिकामधील एका ठिकाणी २१ जुलै १९८३ रोजी -८९.२ अंश सेल्सियस नोंदविण्यात आले होते.

☞ सोनिया गांधी – लोकप्रिय महिला नेत्या

काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी देशाच्या सर्वात लोकप्रिय महिला नेत्या आहेत. दुसऱ्या स्थानावर भाजपच्या नेत्या आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेत्या सुषमा स्वराज यांना स्थान मिळाले आहे.

वेब पोर्टल शादी डॉट कॉमद्वारा करण्यात आलेल्या सर्वेक्षणानुसार महिलांमध्ये सर्वाधिक पसंतीच्या आणि लोकप्रिय नेत्याच्या रूपात सोनिया गांधी यांना सर्वात जास्त ३६.२ टक्के मते मिळाली आहेत. भाजप नेत्या सुषमा स्वराज यांना ३३.६ टक्के मते मिळाली.

कॉर्पोरेट घराण्यात रिलायन्सच्या नीता अंबानी यांना सर्वाधित पसंती मिळाली आहे. त्यांना ३५.६ टक्के मते मिळाली, तर किरण मजुमदार-शॉ ३३.०३ टक्के मतांसह दुसऱ्या लोकप्रिय महिला व्यावसायिक ठरल्या. फिल्मी जगतात शाहरूख खान याची पत्नी गौरी खान पहिल्या स्थानावर, ऐश्वर्या राय बच्चन दुसऱ्या स्थानावर, माधुरी दीक्षित तिसऱ्या स्थानावर आणि काजोल चौथ्या स्थानी, क्रीडा विश्वात मेरी कॉम पहिल्या, सायना नेहवाल दुसऱ्या आणि सानिया मिर्झा तिसऱ्या स्थानावर राहिल्या. घर, परिवार एकत्र ठेवून आपल्या क्षेत्रात सफलता प्राप्त करणाऱ्या लोकांची पंसतीच्या महिलांची यादी तयार करण्यासाठी हे सर्वेक्षण करण्यात आल्याचे पोर्टलचे मुख्य परिचालन अधिकारी गौरव रक्षित यांनी सांगितले.

☞ व्यायामाने दूर होते मानसिक अस्वस्थता

व्यायामाने शरीर निरोगी राहू शकते, हे सर्वांनाच माहीत आहे. त्यामध्ये सातत्य असल्यास मानसिक अस्वस्थतेचा (डिमेन्शिया) आजारही दूर होऊ शकतो आणि संबंधित रुग्ण आपली कार्यक्षमता पुन्हा मिळवू शकतो, असे सिद्ध झाले आहे. ब्रिटनमध्ये सुमारे ३०० रुग्णांकडून करून घेतलेल्या व्यायामामुळे त्यांच्या मानसिक अवस्थेत सुधारणा झाल्याचे आढळून आले. काही रुग्णांनी स्वत:ची कामे करण्यासही सुरवात केली आहे. ब्रिटनमध्ये सध्या 'डिमेन्शिया'चे आठ लाख रुग्ण असून, २०२१ अखेर ही संख्या दहा लाखांपर्यंत जाईल. याबाबत संशोधन करणारे अलबेट्रा विद्यापीठाचे डोरेफी फोर्ब्स यांनी सांगितलं, ''घरी किंवा रुग्णालयात राहणाऱ्या रुग्णांना व्यायामाने चांगला आधार मिळत आहे. कोणत्या प्रकारचा आणि किती व्यायाम करायचा याबाबत मात्र अजून संशोधन व्हायचे आहे.'' मेंदूतज्ज्ञ डॉ. लौरा फिप्स यांच्या म्हणण्यानुसार, कोणत्याही आजारासाठी व्यायाम आवश्यकच

आहे. मानसिक आजार असलेल्या रुग्णांना आरोग्यदायी जीवन जगण्यासाठी व्यायाम निश्चितच फायदेशीर ठरू शकेल.

☞ मसूर खा आणि उच्च रक्तदाब कमी करा

तुम्हाला उच्च रक्तदाबाचा त्रास आहे? तर मग तुम्ही जेवणामध्ये अधूनमधून मसूर आणि मसुराच्या डाळीपासून तयार केलेले पदार्थ आवर्जून खायला हवेत. मसूर खाल्ल्याने उच्च रक्तदाब कमी करणे शक्य होते, असे लंडनमधील एका संशोधनातून सिद्ध झाले आहे. डाळी आणि कडधान्ये जेवणामध्ये असतील तर रक्तवहन अधिक सुलभ होते. मसूर हा रक्तवाहिन्यांचे स्वास्थ्य राखण्याचे महत्त्वाचे काम करतो, असेही डॉक्टरांनी म्हटले आहे.

डल्लास येथे झालेल्या अमेरिकन हार्ट असोसिएशन परिषदेमध्ये कॅनडाचे डॉ. पीटर झार्डका आणि डॉ. कार्ला टेलर यांनी सादर केलेल्या शोधनिबंधामध्ये हा दावा करण्यात आला आहे. झार्डका आणि टेलर यांनी उंदरांवर केलेल्या संशोधनातून हे निष्कर्ष काढण्यात आले आहेत. जेवणामध्ये अधूनमधून मसुराचा उपयोग केल्यानंतर वाढत्या वयातही रक्तदाब नियंत्रणात ठेवणे सहज शक्य होते, याबाबत गेल्या वर्षी आणखी दोन शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहेत.

☞ लातूरला स्त्रीशक्ती संघटनेचे अधिवेशन

'देशात सुवर्णकाळ आणण्याची ताकद स्त्रीशक्तीमध्ये आहे. स्त्रियांनी नवीन पिढी सुसंस्कारित केली तर देशाला निश्चितच दिवस चांगले येतील,' असे मत जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. राणी बंग यांनी व्यक्त केले.

भारतीय स्त्रीशक्ती संघटनेचे रौप्यमहोत्सवी अधिवेशन लातूर येथे झाले. व्यासपीठावर संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्षा नयना सहस्रबुद्धे, डॉ. जोत्स्ना कुकडे, माधुरी साकुळकर, डॉ. शालिनी बापट, ज्योती मंगलगे, के. जयश्री, डॉ. लीला करवा, कुमुदिनी भार्गव उपस्थित होत्या.

आसारामबापू, तरुण तेजपाल प्रकरण हे प्रकार म्हणजे अत्याचाराच्या हिमनगाचे टोक आहे. प्राचीन काळापासून महिलांवर अत्याचार होत आहेत. याला पुरुषी मानसिकता कारणीभूत असून ती बदलण्याची गरज आहे. स्त्रीप्रती आदर व जबाबदारीची जाणीव मुलांना शिकवण्याची गरज आहे, असे त्या म्हणाल्या.

या वेळी डॉ. बंग यांच्या हस्ते 'मराठवाड्यातील महिलांचा राजकीय सहभाग,' 'स्त्रियांच्या मानसिक आरोग्यासाठी भावनिक नियोजन,' 'पोलिस कुटुंबीयांचे सर्वेक्षण,' 'महिला व पाणीप्रश्न', 'नक्षलवादाच्या छायेतील कौटुंबिक व स्त्रीजीवन सर्वेक्षण अहवाल' या सहा पुस्तकांचे प्रकाशन झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कुकडे यांनी केले. मावळत्या प्रांताध्यक्षा मंगला बक्षी यांनी नूतन अध्यक्षा माधुरी साकुळकर यांना,

तर मावळत्या सचिव कुमुदिनी भार्गव यांनी नूतन सचिव ॲड. शालिनी बापट यांना पदाची सूत्रे दिली.

☞ सिम्बॉयसिसमध्ये रेडिओ किरणांचे अभ्यासकेंद्र

सिम्बॉयसिस विद्यापीठामध्ये रेडिओ किरणांच्या परिणामांवर अभ्यास करण्यासाठी रेडिओ खगोलशास्त्रज्ञ गोविंद स्वरूप यांच्या नावे केंद्र सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती सिम्बॉयसिसच्या प्रधान संचालिका डॉ. विद्या येरवडेकर यांनी दिली.

सिम्बॉयसिस विद्यापीठाच्या इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी आणि इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्स यांच्यातर्फे या केंद्राचे काम चालणार आहे. रेडिओ किरणांचे जीवितावर होणारे परिणाम या विषयावर अभ्यास करणारे सिम्बॉयसिस हे तिसरे केंद्र आहे. रेडिओ किरणांचा माणसाच्या आयुष्यावर नेमका काय परिणाम होतो याबाबत अजून संशोधन होण्याची गरज आहे. या वेळी जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील प्राध्यापक जे बेहारी यांनी सांगितले, ''मोबाईल फोनवर अर्ध्या तासापेक्षा अधिक वेळ सलग बोलणे धोकादायक ठरू शकते. इलेक्ट्रो मॅग्नेटिक किरणांचा माणसावर कसा परिणाम होतो, त्याबाबत संशोधन सुरू आहे. मोबाइलमधून बाहेर पडणाऱ्या रेडिओ किरणांचे नेमके मोजमाप करण्यासाठी निश्चित अशी प्रक्रिया नाही. इलेक्ट्रो-मॅग्नेटिक किरणांचा माणसावर होणाऱ्या परिणामाबाबत निश्चित निष्कर्षापर्यंत येण्यासाठी इलेक्ट्रो मॅग्नेटिक किरणांचे उत्सर्जन होते अशा ठिकाणी राहणाऱ्या माणसांचा सलग अभ्यास होणे आवश्यक आहे.''

☞ एसएमएसच्या वापरात घट

वय वर्षे २१ एसएमएसला पर्याय ठरत असलेल्या विविध ॲप्लिकेशनमुळे हा तिशी गाठेल की नाही अशी शंका आहे. सध्या एसएमएसचा वापर काही मर्यादेपर्यंतच होत आहे. यामुळे वयात आलेल्या या एसएमएसला स्पर्धेत टिकण्यासाठी नव्या क्लृप्तीची गरज आहे.

२१ वर्षांपूर्वी एसएमएसने मोबाइल तंत्रज्ञानाचे महत्त्व वाढवले. पण आज वॉटस् अपसारख्या विविध मेसेजिंग अपमुळे एसएमएसना बसला आहे. कंपन्या आता एसएमएसला फारसे महत्त्व देत नसून त्यांनी आपला मोर्चा डेटा कनेक्शनशी संबंधित ऑफर्सकडे वळविला आहे. एसएमएसचा वापर सध्या बँका, सरकारी योजना, कॉर्पोरेट जाहिराती यासाठी होत आहे. ग्रामीण भागातही याचा वापर स्मार्टफोनमुळे खूप मर्यादित झाला आहे. देशातील स्मार्टफोन आणि सोशल मीडियाचा वापर करणाऱ्यांची संख्या वाढू लागल्याने अनेक कंपन्यांनीही एसएमएसचा वापर कमी केला आहे. मोबाइल कंपन्यांच्या मते एसएमएसचा बिझनेस कमी झाला असला तरी त्याला आर्थिक बाजारात मूल्य आहे. यामुळे पूर्णपणे एसएमएस सेवा

बंद करणे शक्य होणार नाही. तसेच एसएमएसला पर्याय असलेले विविध अप्स हे तात्कालिक आहेत. स्मार्टफोनचा वापर वाढल्याने एसएमएसचा वापर कमी झाला असे गृहीतक चुकीचे ठरू शकते. यामुळे भविष्यात पुन्हा एसएमएसचे दिवस येतील. मोबाइल कंपन्यांचे म्हणणे खरे ठरेल की ॲप्लिकेशन विकसित करणाऱ्याचे हे आपल्याला येणारा काळच दाखवेल.

☞ ग्रंथप्रेमी वाचकांचा दाते कट्टा

पुणे शहरात काही गोष्टींना पिढ्यांचा वारसा लाभलेला आहे उदा. वैशाली, रूपाली हॉटेल, पूर्वीचं लकी हॉटेल. त्याचप्रमाणे लकडी पुलाच्या अलीकडे रिगल हॉटेलच्या इमारतीत एक वृत्तपत्रांचे व पुस्तकाचे दुकान होतं 'एम.जी. दाते'. त्या दुकानाचे मालक माधव दाते. त्यांनी वयाच्या ८३ व्या वर्षी १ नोव्हेंबर २०११ रोजी वृद्धत्वामुळे दुकान बंद केलं. त्या दुकानाला तीन पिढ्यांचा वारसा लाभलेला आहे. हे दुकान पुस्तकं, दिवाळी अंक आणि स्टेशनरीचं होतं, तरी ते अनेकांच्या आयुष्यातील चढ-उतारांचे साक्षीदारही होतं. दुकानवाले दाते हे पुण्यातील प्रसिद्ध मांडववाले दाते यांच्या घराण्यातलेच. जरा वाट चुकून या व्यवसायात पडले. साहित्यासोबत त्यांना जनसंग्रहाचेही व्यसन होते. पुस्तकांसोबत सर्व क्षेत्रातील लोकांसोबत मैत्रीचा धागा विणला गेला. या मैत्रीला वयाची किंवा उच्चनीचतेची किनार नव्हती. या दुकानात येऊन अनेक ग्रुप तयार झाले. हे दुकान कधीच झकपक नव्हतं. मागच्या ४० वर्षांत त्याचं कधी नूतनीकरणही झालं नाही, तरीही त्यात नवलाई होती. दोस्तीची मॅग्नेटिक पॉवर होती.

☞ चिमुकलीच्या साहसाला शौर्याची थाप

लपाछपीचा खेळ खेळताना एका बांधकाम सुरू असणाऱ्या इमारतीच्या जिन्याखालील टाकीमध्ये पडलेल्या निर्मितीला (वय ४) वाचविण्यासाठी पोहता येत नसूनही तन्वीने टाकीत उडी घेतली. बांधकाम सुरू असल्याने त्या टाकीतील पाणी सिमेंट व मातीमिश्रित झाले होते. त्यामुळे टाकीतील पाण्याचा रंग पूर्णपणे काळा झाला होता. या पाण्यामध्ये निर्मिती पडल्यानंतर दिसतही नव्हती. मात्र, तन्वीने धाडसाने टाकीत उडी घेतली. टाकीतील पाणी तन्वीच्या नाकापर्यंत लागत होते. तरीही या पाण्यात तन्वीने निर्मितीचा शोध सुरू ठेवला.

तन्वीच्या हाताला निर्मितीच्या हाताचा स्पर्श झाला आणि तिने क्षणाचाही विलंब न करता निर्मितीला उचलून आपल्या खांद्यावर घेतले. निर्मितीला खांद्यावर घेतल्याने तन्वी टाकीतील पाण्यात बुडू लागली. परंतु न घाबरता तन्वी टाचा वर करून उभी राहिली. तन्वीबरोबर खेळत असणाऱ्या तिच्या मित्रांनी तन्वीच्या घरच्यांना ही गोष्ट सांगितली. तन्वीचे वडील लगेचच पाण्याच्या टाकीकडे धावले व निर्मितीला

खांद्यावर घेऊन उभ्या असणाऱ्या तन्वीला पाण्याबाहेर काढले.

भावे प्राथमिक शाळेमध्ये तिसरीत शिकणाऱ्या तन्वीने आपल्या बहिणीचे प्राण वाचविण्यासाठी दाखविलेले धाडस उल्लेखनीय आहे.

या धाडसामुळे शाळेमध्ये तिला 'वीरबाला' म्हणून संबोधले जात आहे, तर तन्वीची आई कल्पना व वडील नंदकुमार यांना तन्वीचे पालक असल्याचा अभिमान वाटत आहे. तन्वीने दाखविलेले धैर्य, धोक्यात घातलेला जीव व टाकीतील काळ्या पाण्याशी शूरपणे लढा देत वाचविलेले बहिणीचे प्राण... या गोष्टींमुळे स्त्रीशक्तीचे दर्शन घडते. तसेच तन्वीच्या धाडसामुळे दत्तवाडी परिसर व तिच्या शाळेतील मुलींना साहसाचा एक नवीन धडाच मिळाला आहे.

☞ फेसबुक चालले आहे इतिहासात...

भारतात फेसबुक हा जवळपास प्रत्येक इंटरनेट युजरच्या सोशल नेटवर्किंगचा अविभाज्य भाग बनला आहे. ब्रिटनमध्ये मात्र फेसबुकला उतरती कळा आली आहे. सोशल मिडियाविषयी घेण्यात आलेल्या एका सर्वेक्षणानुसार फेसबुक हे आता ब्रिटनमधील तरुणपिढीसाठी इतिहासजमा झाले असून त्याची जागा इतर माध्यमांनी घेतली आहे.

पालकांकडून फ्रेंड रिक्वेस्ट येणे, हे युवकांचे फेसबुकपासून दूर जाण्याचे महत्त्वाचे कारण आहे.

लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेजमधील आठ संशोधकांच्या गटाने ब्रिटनसह भारत, चीन, ब्राझील इत्यादी सात देशांमध्ये यासंबंधीचे सर्वेक्षण करून निष्कर्ष काढले आहेत. प्राध्यापक डॅनिएल मिलर यांचा या संशोधनामध्ये सहभाग आहे.

फेसबुक ही आता युवकांसाठी 'कूल' गोष्ट राहिली नसल्याचे मिलर यांनी नमूद केले. १६ ते १८ वर्षांच्या युवकांसाठी तर फेसबुक हे इतिहासजमा झाले असून त्याची जागा ट्विटर, इन्स्टाग्राम, स्नॅपचॅट, वॉट्सॲप यांनी घेतल्याचे संशोधनातून समोर आले आहे. फेसबुकवर प्रौढांच्या अकाउंटची संख्या वाढली आहे. त्यामुळे सोशल नेटवर्किंगवरील आपले खासगी आयुष्य जपण्यासाठी तरुण पिढी वेगाने फेसबुकपासून दूर जात असल्याचे निरीक्षण मिलर यांनी नोंदवले.

☞ 'विंडोज'चा वापर आता मराठीतूनही!

कोणतेही वेगळे सॉफ्टवेअर न वापरता किंवा इंटरनेटशी जोडलेले न राहताही आपल्या विंडोज संगणकावर मराठीतून मजकूर लिहिणे आता शक्य होणार आहे.

स्थानिक भाषांमधून संगणकाला उत्तेजन देण्यासाठी 'मायक्रोसॉफ्ट इंडिया'ने 'भाषा' हा उपक्रम हाती घेतला असून या अंतर्गत १४ भारतीय भाषांमधून संगणन करण्यासाठीच्या साधनांचा संच मोफत उपलब्ध करून दिला आहे.

नॅशनल ई- गव्हर्नन्स ॲकॅडमीच्या 'सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर आयटी इन

इंडियन लँग्वेजेस' या केंद्राच्या कार्यकारिणीत मायक्रोसॉफ्टला स्थान मिळाले आहे.

या पार्श्वभूमीवर कंपनीचे प्रमुख उत्पादन विपणन व्यवस्थापक मेघश्याम करणम् यांनी भाषा या उपक्रमाविषयी माहिती दिली. विंडोज एक्सजी, विंडोज व्हिस्टा, विंडोज ७, ८ आणि ८.१ या ऑपरेटिंग सिस्टिम्सवर १४ भारतीय भाषांमधून काम करता येणार आहे. यात मराठी, हिंदी, कोकणी, गुजराती, कन्नड, तमिळ, तेलुगु, मल्याळम, उर्दू, बंगाली, आसामी, उडिया, पंजाबी, नेपाळी या भाषांचा समावेश आहे. करणम म्हणाले, ''ग्राहकांना 'यूझर इंटरफेस' आणि 'हेल्प' ही साधने स्थानिक भाषांमधून वापरता येतीलच, तसेच स्थानिक भाषेत मजकूरही टाईप करता येईल. या साधनांमध्ये ९ भाषांसाठी 'डेटा कन्व्हर्टर' या साधनाचाही समावेश आहे. या कन्व्हर्टरच्या साहाय्याने ग्राहकांना आपल्या 'नॉन युनिकोड लेगसी डेटा'चे रूपांतर 'युनिकोड डेटा' मध्ये करता येईल. तसेच हिंदी-इंग्रजी आणि हिंदी-इंग्रजी-गुजराती असे दोन प्रकारचे शब्दकोशही ग्राहकांना उपलब्ध होणार आहेत.''

www.bhashaindia.com या संकेतस्थळावर ही संगणन साधने मोफत डाऊनलोडिंगसाठी उपलब्ध आहेत. ही साधने वापरून संगणन करण्यासाठी आवश्यक असणारे 'मायक्रोसॉफ्ट ऑफिस' मात्र ग्राहकांनी विकत घ्यायचे आहे.

☞ माध्यमांचे भाषा तंत्र

कुठल्याही माध्यमात काम करताना त्या माध्यमाची भाषाच नाही, तर भाषेचे तंत्र शिकणे गरजेचे आहे, असे मत ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे यांनी व्यक्त केले.

भरत नाट्य मंदिर येथे आयोजित आर्क फिल्म फेस्टिव्हलचे उद्‌घाटन आगाशे यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ समीक्षक समर नखाते, दिगंत पाटील आदी या वेळी उपस्थित होते. या फेस्टिव्हलमध्ये विविध विषयांवरील दहा लघुपट दाखविण्यात आले. या उपक्रमाला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या वेळी आगाशे यांनी भाषा या विषयावर उपस्थितांशी संवाद साधला. ''शाळेच्या ग्रंथालयात गेल्यापासून मला पुस्तकांची भीती बसली. भाषा हे शब्दांचे माध्यम आहे. आपण शाळेत जातो, तेव्हाच भाषा शिकलेलो असतो ती प्रत्यक्ष अनुभवातून आणि बोलण्यातून शाळा-कॉलेजात आपण भाषा नव्हे तर तिचे तंत्र शिकतो. भाषेचे विविध प्रकार आहेत, पण भाषेचे तंत्र आपण शिकलो नाही तर नेमकी वापरायची कशी आणि तिचा आनंद कसा घ्यायचा हे आपल्याला कळत नाही. म्हणून नुसती भाषा नव्हे तर तिचे तंत्र आत्मसात करण्याची गरज आहे. आपण भाषा नुसती वापरतो, ती विकसित करत नाही. अभ्यासात कमी पडणाऱ्यांना कमी संबोधले जाते. पण त्यामुळेच चांगले दिग्दर्शक, कलाकार, लेखक सिनेसृष्टीला मिळाले आहेत'', असे आगाशे म्हणाले.

आर्क फिल्म फेस्टिव्हलचे उद्‌घाटन पारंपरिक पद्धतीने झाले. हल्ली सिनेमेही डिजिटल पद्धतीने तयार होतात. त्यामुळे अशा कार्यक्रमांचे उद्‌घाटनही तसेच व्हायला हवे, अशी अपेक्षा डॉ. मोहन आगाशे यांनी व्यक्त केली. नवे प्रघात पाडा, असा संदेशही त्यांनी या वेळी दिला.

उद्‌घाटनाच्या सत्रानंतर 'कातळ', 'घड्याळाचा दवाखाना' आणि 'दोडका' (विक्रांत पवार), 'टी-टाईम' (राजदत्त रेवणकर), 'फ्रेम' (विवेक चक्रे), 'जॉय अनबाऊंड' (वैभव खिस्ती), 'जिगिशा' (योगेश जाधव), 'देवदासी' (दिगंत पाटील), 'गिरणी' (उमेश कुलकर्णी) आणि 'लास्टवन' (नुपूर बोरा) आदी लघुपट दाखविण्यात आले.

☞ वाचनवेडे श्रेष्ठ का?

व्यक्तीला सक्रिय, समाधानी, कार्यशील बनविण्यासाठी कशाची गरज असते? यश, पैसा, संपत्ती, सन्मान, प्रसिद्धी की आणखी दुसरे काही? अमेरिकेच्या जॉर्जिया भागात केवळ संशोधन या उद्देशाने उभारण्यात आलेल्या इमॉरी विद्यापीठाच्या मते वरील कुठल्याही बाबी मेंदूला कार्यशील बनविण्यास उपयुक्त ठरत नाहीत, तर चांगल्या कादंबरीच्या वाचनाने व्यक्तीला कार्यशील बनविण्याइतपत मेंदू तल्लख बनतो. अभ्यास गटाने विद्यार्थी समूहावर कादंबरीच्या वाचन उपयुक्ततेबाबत प्रदीर्घ अभ्यास केला. त्याच्या मते कुठल्याही पुस्तकातील कथनशैली ही मेंदू क्रियाशील करण्यास उपयुक्त ठरते. भाषा शिकण्यासाठी माणसाला महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या मेंदूच्या डाव्या टेम्पोरल कॉर्टेक्स पुस्तक वाचनामुळे क्रियाशील होतात.

अभ्यास गटाचे प्रमुख लेखक ग्रेगरी बर्नस यांच्या मते कादंबरी वाचनामुळे मेंदूच्या सेंट्रल सल्कस या भागातही जास्त क्रियाशीलता दिसून येते. हा भाग आपल्या शरीरातील अवयवांच्या हालचालींचे नियंत्रण करण्याच्या प्रक्रियेत प्राथमिक संवेदक म्हणून काम करीत असतो. या भागातील न्यूरॉन्स म्हणजे एक प्रकारच्या चेतापेशी शरीराच्या संवेदन क्षमतेशीही निगडित असतात. हे बदल आपल्या संवेदनशीलतेशी एवढे निगडित असतात की कादंबरी वाचल्यानंतर तिच्यातील कथानक वाचकाच्या मानसिकतेत चार ते पाच दिवस वावरते. त्यामुळे न वाचणाऱ्या व्यक्तीपेक्षा अधिक सक्रिय, अधिक समाधानी आणि कार्यशील असते. ब्रेन कनेक्टिव्हिटी या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे.

☞ पिढीचा ट्रेंड लक्षात घ्या

"वाचन कमी झाल्याची तक्रार साफ चुकीची आहे. मध्यंतरी वाचकांची निवड आणि ट्रेंड बदलल्यानं ती पोकळी जाणवत होती. लेखक - प्रकाशक त्यांच्या मागणीला पुरे पडू शकत नव्हते. आता तशी परिस्थिती नाही. मला वाटतं,



आगामी

माफिया क्वीन्स ऑफ मुंबई

मूळ लेखक

एस. हुसेन झैदी,
जेन बोर्जस

अनुवाद

उल्का राऊत

दाऊद इब्राहिम, करीम लाला, हाजी मस्तान यासारख्या मुंबईतील माफियांवर नियतकालिकं, वृत्तपत्र अशा माध्यमातून अभ्यासपूर्ण लिहिलं गेलं आहे. चित्रपटांमध्ये त्यांच्या व्यक्तिरेखाही रंगवल्या गेल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या जीवनाचे तपशील, त्यांचे तथाकथित व्यवसाय यांविषयी बरीच माहिती सहज उपलब्ध होऊ शकते परंतु काही स्त्रिया देखील मुंबईच्या याच गुन्हेगारी विश्वाचा हिस्सा आहेत. ही गोष्ट फारशी ज्ञात नाही. अंडरवल्डच्या भाई आणि दादा लोकांच्या खांद्याला खांद्या लावून, तर कधी मार्गदर्शन करून आणि पडद्यामागून सूत्रं हलवून या स्त्रियांनी अंडरवर्ल्डचे काही अवैध धंदे चालवण्यास मदत केली. या पुस्तकात प्रथमच अशा स्त्रियांच्या जीवनाचा मागोवा घेण्यात आला आहे; आख्यायिका बनलेल्या या स्त्रियांच्या जीवनकहाण्या सांगितल्या आहेत. मुंबईच्या अंडरवर्ल्डची यापूर्वी कधीच उजेडात न आलेली बाजू अत्यंत चित्तवेधक शैलीत, सखोल संशाधन करून या पुस्तकात मांडली आहे.

साहित्याशी संबंधित जे उपक्रम राबवले जातात, त्यातले विषय पूर्णत: आजच्या पिढीशी विसंगत आहेत. नव्या पिढीचा साहित्य संमेलनात सहभाग हवा असेल, तर या पिढीच्या वाचनाचा तसंच जगभरातला ट्रेंड लक्षात घ्यायला हवा. संमेलनाच्या पत्रिकेत, परिसंवादात ई-बुक, ऑडिओ बुक या विषयांना स्थान नाही, याचं वाईट वाटतं. अशा उपक्रमांच्या कार्यकारिणीतही नव्या पिढीला स्थान नाही. त्यामुळे त्याची आखणी वर्षानुवर्षे पारंपरिक पद्धतीनं होते आहे. अशा परिस्थितीत तरुण वाचत नाहीत हे म्हणणं चुकीचं आहे.'' असे मत मेहता पब्लिशिंग हाऊसचे संचालक सुनील मेहता यांनी व्यक्त केले.

☞ साहित्यिक कलावंत संमेलन

''महाराष्ट्राला दीडशे वर्षांची स्त्री साहित्याची परंपरा असून अनेक स्त्री लेखिकाही आघाडीवर आहेत, पण अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या गेल्या ८६ वर्षात फक्त चार स्त्रियांना अध्यक्ष होण्याचे भाग्य लाभले. साहित्य अकादमीच्या पुरस्कारांच्या मानकऱ्यांमध्ये केवळ सहा स्त्रिया आहेत. साहित्यिक सांस्कृतिक जगात स्त्रियांना डावलले आहे'', असे मत ज्येष्ठ लेखिका डॉ. अश्विनी धोंगडे यांनी साहित्यिक कलावंत संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात व्यक्त केले. स्त्री लेखिकांच्या प्रवासातील संक्रमणे, साहित्यक्षेत्र आणि सामाजिक बदलांचा आढावा त्यांनी या वेळी घेतला. वैदिक काळापासूनच स्त्रिया सर्जनशील लेखन करीत आहेत. पण आपल्या समाजाच्या जडणघडणीमध्ये त्यांना स्थान नाही. वेगवेगळ्या अनिष्ट चालीरीतीमुळे स्त्रियांना उपभोगासाठीच वापरले गेले आहे. स्त्री ही मोक्षवादी मार्गावरील धोंड आहे, अशा शिकवणुकीने, धर्माने स्त्रीला धार्मिक रीतिरिवाजातील क्रियाशील भूमिकेपासून दूर ठेवले. उंबरठ्याआडचे जीवन हेच तिच्या आयुष्याचे विधिलिखित ठरले. पण महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांसारख्या समाजसुधारकांमुळे स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली झाली, असे सांगून धोंगडे यांनी स्त्रियांच्या प्रगतीचा प्रवास उलगडला.

स्त्रियांचे साहित्यक्षेत्र समाजजीवन ढवळून काढण्यात नेहमीच अग्रेसर राहिले आहे. मराठी साहित्यामध्ये त्यांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांना शंभर वर्षांची परंपरा आहे. सुरुवातीची आत्मचरित्रे नवऱ्याच्या कर्तृत्वाचे कौतुक करणारी होती. पुढच्या पिढीतील आत्मचरित्रात व्यक्तीची जीवनात, संसारात होणारी घुसमट, स्त्रीने आपल्या परीने त्यातून शोधलेला मार्ग यातून तिची व्यक्तिवादाकडे सुरू असलेली वाटचाल दिसते. आज देवदासी, बारबाला, नर्सेस, मुस्लिम स्त्रिया अशा शोषित स्त्रिया आपले आयुष्य मोकळेपणाने आत्मचरित्रातून व्यक्त करू लागल्या आहेत.

यापुढे तंत्रज्ञानात करिअर करणाऱ्या, राजकारणात ज्यांना पुरुषी वर्चस्वाशी संघर्ष करावा लागला, अशा स्त्रियांनी आपल्या क्षेत्रातील अनुभव मोकळेपणाने मांडण्याची गरज आहे, असे मत धोंगडे यांनी व्यक्त केले.

शशिकांत शिंदे म्हणाले, 'समाजासाठी काम करणारी अशी अनेक माणसे आपल्या भवताली आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी समाजातील अनिष्ट प्रथांविरोधात काम केले, पण आपण जादूटोणाविरोधी विधेयक त्यांच्या मृत्यूनंतरच मंजूर केले गेले, याची खंत आहे.'

कवी कोणत्याही पक्षाचा नसतो, तो रयतेचा असतो. रयतेला पक्षाघात होऊ नये म्हणून जागरूक राहून विचार मांडत राहतो, असे सांगून फ. मुं. शिंदे यांनी विनोदी शैलीत राजकारण आणि साहित्य क्षेत्राची तुलना केली. विविध पुस्तकांचे प्रकाशन, चित्रकला आणि दिवाळी अंक स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार शिंदे यांच्या हस्ते झाले.

☞ सायबर हल्लेखोरांकडून धोका

'सोशल नेटवर्किंग साइट'वर वैयक्तिक माहिती टाकायला सर्वांनाच आवडते. अनेक लहान-सान गोष्टीही या साइटवर व्यक्त केल्या जातात. उदा. आज रात्री सहकुटुंब आम्ही हॉटेलमध्ये जेवायला जाणार आहोत.. किंवा ३१ डिसेंबरपासून सलग पाच दिवस आम्ही गोव्यात आहोत. व्हॉट्सॲप किंवा फेसबुकवर आपले स्टेट्स वारंवार बदलायला अनेकांना आवडते. या स्टेट्सवरही अशाच प्रकारे वैयक्तिक जीवनातील माहिती टाकली जाते. मात्र यामुळे सायबर हल्लेखोरांना आयतेच कुरण मिळते. या माहितीच्या आधारे ते तुमची पिळवणूकही करू शकतात. गेल्या वर्षभरात अशा अनेक घटना घडल्या आहेत. त्यामुळे 'सोशल नेटवर्किंग साइट'वर माहिती देताना जरा तारतम्य बाळगा.

☞ जगातील पहिली 'स्टँडिंग क्लासरूम स्कूल'

ऑस्ट्रेलियात आता अशी एक शाळा सुरू होतेय जिथे मुलांना उभे राहूनच शिकावे लागेल! शिक्षा म्हणून नव्हे तर मुलांमधील लठ्ठपणाचे प्रमाण कमी व्हावे या उद्देशाने 'माउंट अलबर्ट' या प्राथमिक शाळेत 'स्टँडिंग क्लासरूम' सुरू करण्यात आल्या आहेत. अशा प्रकारची ही जगातील पहिली 'स्टँडिंग क्लासरूम' असेल. 'बेकर आयडीआय हार्ट व डायबेटिस इन्स्टिट्यूट' मधील संशोधकांनी प्रयोग म्हणून दोन महिन्यांपूर्वीच सहावीच्या वर्गातील मुलांना उभे राहता येईल किंवा बसता येईल, असे 'ॲडजस्टेबल' बाक उपलब्ध करून दिले. त्यातील बऱ्याचशा मुलांनी उभे राहणे पसंत केले. आता तज्ज्ञांचा गट या मुलांचे आरोग्य, तंदुरुस्ती, आकलन व स्मरणशक्ती यांचा अभ्यास करणार आहे. जेव्हा मुले उभी राहतात, तेव्हा त्यांचे जास्तीत जास्त स्नायू आपोआपच गुंतून राहतात. यामुळे रक्ताभिसरणाचे कार्य सुधारून थकवा येण्याचे प्रमाणही कमी होते, असे इन्स्टिट्यूटचे प्रमुख डेव्हिड डस्टन यांनी सांगितले. जी मुले शाळेतील दोन तृतीयांश वेळ बसून घालवतात किंवा बालपणातील बराचसा काळ बसण्यात घालवतात त्यांच्यामध्ये नंतर मधुमेह, लठ्ठपणा, हृदयविकार असे आजार

दिसून येतात, हे यापूर्वी झालेल्या अभ्यासातून सिद्ध झाले आहे. या अभिनव प्रयोगाचे विद्यार्थी, पालक व शिक्षक वर्गातून स्वागत करण्यात आले. हा प्रयोग यशस्वी झाला तर पूर्ण देशभरात राबविण्याचा त्यांचा मानस आहे.

☞ सुधा मूर्ती यांच्या परीघ कादंबरीचे प्रकाशन

महिलांमध्ये प्रचंड क्षमता आणि ऊर्जा असून, पुरुषांपेक्षा त्या जास्त शक्तिशाली आहेत. जीवनात मानवी नात्यातील विविध भूमिका सहजपणे पार पाडत असल्यामुळे त्या घरच्या 'उत्कृष्ट व्यवस्थापिका' आहेत, असे मत ज्येष्ठ लेखिका सुधा मूर्ती यांनी यांनी व्यक्त केले.

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे सुधा मूर्ती यांच्या 'परीघ' या मराठी अनुवादित कादंबरीचे प्रकाशन भावे हायस्कूलच्या शिक्षिका मृणाल वैद्य व ज्ञानप्रबोधिनीच्या मृदुला पाठक यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ लेखिका वीणा देव, अनुवादिका उमा कुलकर्णी व मेहता पब्लिशिंगचे सुनील मेहता यावेळी उपस्थित होते.

सुधा मूर्ती म्हणाल्या, पूर्वीपासून महिला सहनशील आहेत. आपण काहीच करू शकत नाही, या भावनेतून नवऱ्यावर अवलंबून राहण्याची मानसिकता आजही त्यांच्यात कायम आहे, आता यात बदल होण्याची गरज आहे. 'परीघ' ही कादंबरी महिलांमधील याच सुप्तगुणांना अधोरेखित करते. त्यामुळे ही कादंबरी माझ्या दृष्टीने सर्वोत्कृष्ट आहे, असे सुधा मूर्ती यांनी सांगितले.

यावेळी उपस्थित श्रोत्यांच्या प्रश्नांना त्यांनी दिलखुलासपणे उत्तरे दिली.

महाराष्ट्र ही माझ्या विचारांची भूमी आहे. इतर भाषांपेक्षाही मराठी भाषेत माझे साहित्य मोठ्या संख्येने वाचले जाते. मराठी भाषकांना माझ्या साहित्याचे आकर्षण आहे. माझ्या पुस्तकांची ते वाट पाहत असतात हीच गोष्ट माझ्यासाठी लाखमोलाची आहे. या प्रेमाच्या बंधनातून मला कधीच मुक्त व्हायची इच्छा नाही, असेही सुधा मूर्ती यांनी सांगितले.

☞ स्वा. सावरकरांच्या गझलांना अमिताभ बच्चन यांचा आवाज

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी अंदमानच्या तुरुंगात लिहिलेल्या गझला २०१३ च्या जुलैत सापडल्या तेव्हाच सावरकरभक्त थरारून गेले होते, आता या गझला कॅसेट आणि सीडीच्या माध्यमातून रसिकांपर्यंत पोचत असून, अमिताभ बच्चन यांनी या गझलांना आपला आवाज दिला आहे. २१ जानेवारी रोजी दादरच्या स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहात या सीडीचे अनावरण झाले. अमिताभ बच्चन यांनी या उपक्रमासाठी दिलेले सहकार्य म्हणजे त्यांच्या देशभक्तीचा नमुना असल्याचे सावरकरांचे नातू रणजित सावरकर यांनी म्हटले आहे.

सावरकरांच्या गझला, हिंदी गीते तसेच मराठीतून हिंदीत भाषांतरित केलेल्या

त्यांच्या रचनांची सीडी तयार केली आहे. शंकर महादेवन, सुरेश वाडकर, साधना सरगम, जावेद अली, जसबिंदर नरूला, स्वप्नील बांदोडकर आणि वैशाली सामंत यांनी स्वरसाज चढवला आहे.

☞ बिल गेट्स सर्वांत प्रशंसनीय

अमिताभ ९ व्या, तर हजारे १४ व्या स्थानी

प्रशंसा यादीत भारताच्या सचिन तेंडुलकर, नरेंद्र मोदींसह अमिताभ बच्चन (९व्या स्थानी), माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम (१० व्या स्थानी), समाजसेवक अण्णा हजारे (१४व्या स्थानी), दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल (१८ व्या स्थानी), तर प्रसिद्ध उद्योगपती रतन टाटा (३० व्या स्थानी) यांचा समावेश आहे.

भारतासह १३ हून अधिक देशांत घेतलेल्या एका सर्वेक्षणानुसार मायक्रोसॉफ्ट कंपनीचे संस्थापक बिल गेट्स हे सर्वांत जास्त प्रशंसनीय व्यक्ती असून, या यादीत भारताचा माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यादीत पाचव्या, तर भाजपचे पंतप्रधानपदाचे उमेदवार नरेंद्र मोदी सातव्या स्थानी आहेत. ३० जणांच्या यादीत भारताच्या सात जणांनी स्थान पटकाविले आहे.

द टाइम्ससाठी एका संस्थेने १३ हून अधिक देशांत हे सर्वेक्षण केले. जवळपास १४ हजार लोकांनी या सर्वेक्षणात आपले मत नोंदविले. प्रशंसा यादीत पहिल्या दहांमध्ये चार भारतीयांनी स्थान मिळविले, तर ३० जणांच्या यादीत सात भारतीयांचा समावेश आहे. ५८ वर्षीय अब्जाधीश बिल गेट्स यांना सर्वाधित पसंती मिळताना त्यांनी अमेरिकेचे राष्ट्रपती बराक ओबामा यांनाही मागे टाकले आहे. प्रशंसा यादीत ओबामा दुसऱ्या स्थानावर राहिले. रशियाचे राष्ट्रपती व्लादिमीर पुतीन तिसऱ्या, तर पोप फ्रान्सिस चौथ्या स्थानी आहेत. जगभरातील लोकांच्या पसंतीला पोप फ्रान्सिससह दलाई लामा (१३ व्या स्थानी), अमेरिकन उद्योगपती वॉरेन बुफेट (आठव्या स्थानी), राणी एलिझाबेथ (सतराव्या स्थानी), तर अँजेलिना जोली १९ व्या स्थानी आहे. जगभरात क्रीडापटूंचे खूप आकर्षण असते. मात्र, यात तेंडुलकरशिवाय अर्जेंटिनाचा फुटबॉलपटू लिओनेल मेसी यानेच स्थान मिळवले आहे.

☞ शर्मा यांच्या पुस्तकांचे प्रकाशन

‘‘साहित्य हे प्रकटीकरणाचे व संवादाचे प्रभावी माध्यम असल्याने लेखक आपल्या साहित्यातून स्वत:चे अनुभव आणि भावना यांना मोकळी वाट करून देतो. अगदी सहज, सुलभ आणि समर्पक भाषेत मांडलेली हीच साहित्यकृती वाचकांच्या मनाला भिडते आणि वास्तवरूपात डोळ्यासमोर उभी राहते,’’ अशी भावना ‘हिंदी आंदोलन’चे अध्यक्ष संजय भारद्वाज यांनी व्यक्त केली.

आबासाहेब गरवारे महाविद्यालय, 'ज्ञानदा' महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा आणि निराली प्रकाशनातर्फे लेखक प्रा. डॉ. ओमप्रकाश शर्मा यांच्या 'सेट-नेट प्रश्नपत्र तीन', 'साहित्य : विविध वाद' व 'जनसंचार और पत्रकारिता : विविध आयाम' या तीन पुस्तकांचे प्रकाशन 'सकाळ'चे निवासी संपादक नंदकुमार सुतार यांच्या हस्ते झाले. महाराष्ट्र राष्ट्रभाषा सेभेचे कार्याध्यक्ष प्राचार्य सु.मो.शाह, प्राचार्य डॉ. श्रीकांत गुप्ता, प्रकाशक जिग्नेश फुरिया आणि हिंदी विभागप्रमुख डॉ. नीला बोरवणकर या वेळी उपस्थित होते.

भारद्वाज म्हणाले, ''लेखक आणि समीक्षकाचे नाते वेगळे असले तरी लिखाणाच्या रूपाने हा धागा जुळून येतो. मात्र, समीक्षकाने लेखकाच्या साहित्यकृतीवर टीका करण्यापेक्षा त्याच्या लिखाणाशी समरस व्हायला हवे. आज पत्रकारितेचे आयाम बदलत आहेत. या बदलांमुळेच बातमीचा गाभाच हरवत चालला आहे. चांगल्या समाजासाठी आणि विकासासाठी माध्यमांनी पत्रकारितेची मूल्ये जपली पाहिजेत.'' डॉ. गुप्ता, शह, फुरिया, सुतार यांचीही या वेळी भाषणे झाली. प्रा. नीला महाडीक यांनी सूत्रसंचालन केले.

☞ खिडकीतून मिळवा घराला पुरणारी वीज!

महागाईचे चटके बसत असताना सौरऊर्जेमुळे महिन्याच्या वीजबिलाचे बजेट वाचणार असेल, तर असे तंत्रज्ञान कोणालाही हवेहवेसे वाटेल. घरासाठी बसवलेली सोलर पॅनेलच्या रूपातील एक छोटीशी खिडकी तुमच्या घरातील वीज उपकरणांच्या गरजेसाठी उपयुक्त ठरली, वीजबिलात कपात झाली आणि अशी वीज साठवून ठेवता आली, तर असे मॉडेल प्रत्येकालाच हवेहवेसे वाटेल ना? असेच नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान विकसित केले आहे दिनेश कदम या उद्योजकाने.

१४७ चौरस मीटर पॅनेलद्वारे १ किलोवॅट वीजनिर्मिती होईल.

एका चार मजली इमारतीत 'बीआयपीव्ही' तंत्रज्ञानाद्वारे आठ किलोवॅट ते १० किलोवॅट वीजनिर्मिती

बॅटरीसह असलेल्या उपकरणाचा प्रत्येक किलोवॅटचा खर्च १ लाख ८० हजार रुपये

घरगुती उपकरणांसाठी ४० हजारांपासून खर्च.

☞ मेमरी कार्डएवढा कम्प्युटर

पूर्वीच्या काळी कम्प्युटर एका खोलीत मावेल एवढा मोठा होता. नंतरच्या काळात त्यात सुधारणा होत होत त्याचा आकार लहान होत गेला आणि आता तो तळहातावर मावण्याएवढा लहान झाला आहे. इथपर्यंतची माहिती सर्वांनाच ज्ञात आहे; पण आता कम्प्युटरने त्याहीपेक्षा छोटे रूप धारण केले आहे. मोबाइलमध्ये

बसणाऱ्या एसडी कार्डएवढ्या छोट्या आकाराचा कम्प्युटर इंटेल या कंपनीतील शास्त्रज्ञांनी विकसित केला आहे. महान शास्त्रज्ञ एडिसन यांचे नाव त्या कम्प्युटरला देण्यात आले आहे. २०१४ च्या मध्यापर्यंत हा कम्प्युटर विक्रीला उपलब्ध होणार आहे.

इंटेलने काही महिन्यांपूर्वी प्रदर्शनात दाखवलेल्या क्वार्क मायक्रोप्रोसेसर या तंत्रज्ञानावर हा कम्प्युटर चालतो. 'आजच्या काळात कम्प्युटर हा अंगावर घालता येणाऱ्या हेल्थ ट्रॅकरसारख्या स्मार्ट उपकरणांमध्ये वापरता यायला हवा. कॉफी मगसारखे रोजच्या वापरातले घटक इंटरनेटशी जोडलेले असण्याची गरज आहे. त्यामुळे इतका छोटा कम्प्युटर विकसित करण्याची गरज आहे,' असे इंटेलचे मुख्य कार्यकारी अधिकारी ब्रायन क्रझेनिक यांनी सांगितले.

''एडिसन हा इवलासा असला, तरी ती परिपूर्ण कम्प्युटर आहे. अनेक ऑपरेटिंग सिस्टीम त्याच्यामध्ये चालू शकतात. तसेच वायरलेस नेटवर्कला जोडले जाण्याची क्षमताही त्याच्यामध्ये आहे,'' असे क्रझेनिक म्हणाले.

'माणसाच्या अंगावर घालता येण्यासारखी उपकरणे सध्या फारशी वापरात नाहीत. कारण ती प्रत्यक्षात सगळ्या समस्या सोडवत नाहीत. तसेच अद्याप माणसाच्या जीवनशैलीशी ती एकरूप झालेली नाहीत. त्यामुळे आम्ही इंजिनीअरिंगमधील या नावीन्यपूर्ण प्रकल्पाचे आव्हान स्वीकारले. कम्प्युटिंग आणि कनेक्टिव्हिटीमधले सर्वोत्तम काम हे ध्येय ठेवून आम्ही कामाला सुरुवात केली,' अशा शब्दांत क्रझेनिक यांनी या प्रकल्पामागील भूमिका स्पष्ट केली.

'एडिसन' हा छोटा कम्प्युटर कशा प्रकारे वापरता येऊ शकतो, याचे प्रात्यक्षिक लास व्हेगासमध्ये झालेल्या कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्स शोमध्ये दाखवण्यात आले. हा कम्प्युटर बाळाच्या कपड्यांना लावला, तर त्याचे आई-बाबा दुसऱ्या खोलीतूनही बाळाच्या हालचालींवर लक्ष ठेवू शकतील. आई-बाबांच्या हातातल्या कॉफी मगला जर 'एडिसन' जोडलेला असेल, तर तो इंटरनेटला जोडला जाऊ शकेल आणि तो बाळाच्या कपड्यांवरील 'एडिसन'शी संवाद साधू शकेल. त्यामुळे, बाळाला बरे वाटत नसल्यास क्षणार्धात आई-बाबांना कळू शकेल.

☞ २०१४ मधील माहिती तंत्रज्ञान

फेसबुक, ट्विटर अशा विविध सोशल नेटवर्किंग साइट्सचा वाढता वापर हा माहितीच्या महाजालावर मोठ्या प्रमाणावर माहिती गोळा करत आहे. या माहितीचे संकलन करणे आता कंपन्यांना जिकिरीचे होऊ लागले आहे.

फेसबुकचाच विचार केला तर तेथे मिनिटाला कित्येक टेरा बाइट माहिती संकलित होत असते. या माहितीचे व्यवस्थापन करणे हे फेसबुकसाठी आजमितीस मोठे आव्हान आहे. हेच आव्हान नजीकच्या काळात आपल्या घरातही निर्माण होणार आहे. घरातील संगणकातील माहिती कुठे साठवायची असा प्रश्न आपल्याला

पडतो. अशा वेळी क्लाउड कम्प्युटिंग महत्त्वाची भूमिका बजावते. आपली सर्व माहिती साठवून ठेवण्यासाठीची क्लाउड कम्प्युटिंगची सुविधा आता घराघरापर्यंत पोहोचणार आहे. यामुळे येणाऱ्या वर्षात स्वस्त क्लाउड कम्प्युटिंग सुविधा देणाऱ्या कंपन्यांची स्पर्धा चांगलीच रंगणार आहे. यामध्ये आयबीएम, मायक्रोसॉफ्ट अशा बड्या कंपन्यांचाही समावेश आहे. क्लाउड सर्व्हरवर साठवून ठेवलेली ही माहिती आपल्याला कधीही कुठेही पाहता येऊ शकते. यासाठी आपल्याला माहिती साठवून पेनड्राइव्ह घेऊन फिरण्याची गरज भासणार नाही. इतकेच नव्हे तर यामुळे नवीन तंत्रज्ञान उद्योग सुरू करण्यासाठीही मोठी मदत होणार आहे. उद्योग सुरू करायचा म्हणजे कोट्यवधी रुपये सॉफ्टवेअरच्या खरेदीत गुंतवावे लागत असत, पण क्लाउड कम्प्युटिंगमुळे आता ही गुंतवणूक निव्वळ १० टक्क्यांवर येऊन ठेपली आहे. यामुळे नवीन वर्षात तंत्रज्ञान क्षेत्रात आणखी नव्या कंपन्या उदयास येतील, असा अंदाज आहे.

स्वस्तात जास्त चांगल्या दर्जाचे स्मार्टफोन बाजारात उपलब्ध होऊ शकणार आहेत. सध्या बाजारात उपलब्ध असलेल्या स्वस्त स्मार्टफोनमध्ये आपल्याला चांगल्या दर्जाच्या सुविधा मिळत नाहीत, पण आता आणखी काही भारतीय ब्रँड स्मार्टफोनच्या बाजारात दाखल झाल्यामुळे ही किंमत कमी होईल. बड्या कंपन्यांमधील स्पर्धा कायम राहणार असून सॅमसंग आणि ॲपल आपआपले नवे फोन घेऊन बाजारात उतरणार आहेत. मोबाइलची सर्वात मोठी ऑपरेटिंग सिस्टीम असलेल्या ॲण्ड्रॉइडमध्येही भरपूर सुधारणा होणार आहेत. विंडोजमध्ये एचटीएमएल ५ मुळे सुरक्षा आणि वापरण्याचा वेग याच्यात सुधारणा होणार आहे. एमकॉमर्समध्ये लक्षणीय वाढ होणार असून यासाठी विविध ॲप्लिकेशन कंपन्या जय्यत तयारीला लागल्या आहेत. एका सर्वेक्षणानुसार ई-कॉमर्सचा सुमारे ४३% मोर्चा आता एम-कॉमर्सकडे वळणार आहे. यामुळे एम-कॉमर्स हे येत्या काळात ब्रँड आणि मोबाइल कंपन्या यांच्यासाठी महत्त्वाचे असणार आहे.

२०१४ हे निवडणुकांचे वर्ष असणार आहे. यामुळे या वर्षात डिजिटल मीडियाचीही मोठी झलक आपल्याला पाहावयास मिळणार आहे. बहुतांश राजकीय पक्षांनी सोशल मीडिया व्यवस्थापकाची नेमणूक केली आहे. तर काहींनी थेट सोशल मीडिया कंपन्यांना कंत्राट दिले आहेत. यामुळे यामध्ये नवनवे शोध आपल्याला पाहावयास मिळणार आहेत.

वेअरेबल उपकरणे

याशिवाय २०१४ मध्ये आपल्याला वेअरेबल उपकरणांची जंत्री पाहावयास मिळणार आहे. यामध्ये स्मार्ट घड्याळे, चष्मे, मनगटी पट्टा यांचा समावेश असणार आहे. यामुळे आपण स्मार्टफोनवरून एक पाऊल पुढे जाणार असून अधिक टेकसॅव्ही होऊ शकणार आहे. ही उपकरणे आपल्या जीवनातील अनेक कामे

अधिक सोपी करणार असून एका क्लिकवर एकाच वेळी अनेक कामे करण्याची क्षमता या उपकरणांमध्ये असणार आहे.

☞ फोर्ब्सच्या यादीत २३ भारतीय तरुणांचा समावेश

फोर्ब्स या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या मासिकाने यंदाच्या वर्षासाठी जगभरातील ४५० युवाताऱ्यांची निवड केली असून त्यात २३ भारतीय तरुणांचा समावेश आहे. मासिकाचा 'थर्टी अंडर थर्टीज' हा अंक तिशीच्या आतच जागतिक स्तरावर आपल्या कामगिरीचा ठसा उमटवणाऱ्या तरुणांची ओळख करून देणारा आहे. त्यात तालराकॅपिटल या वित्तीय गुंतवणूक संस्थेच्या व्यवस्थापकीय संचालकपदाचा मान मिळविणारा गणेश बेटनभाटला (२८), डीडब्ल्यू इन्व्हेस्टमेंट मॅनेजमेंट संस्थेचा रिषभ दोशी (२९), ओसीएच-झिंक कॅपिटल मॅनेजमेंटा पोर्टफोलिओ मॅनेजर असलेला चैतन्य मेहरा (२९), ६० कोटी डॉलर एवढा प्रचंड पसारा असलेल्या ग्रीनओक्स कॅपिटलचा संस्थापक नील मेहता (२९), ऑनलाइन डिजिटल प्रॉडक्टसच्या उलाढालीत आपल्या नावाचा ठसा उमटवणारा साहिल लविंगिया (२१), घानामध्ये तांदूळ उत्पादनात आघाडीवर असलेल्या गॅडको कंपनीचा सहसंस्थापक करण चोप्रा (२९) आदींचा समावेश आहे.

सॅम चौधरी (२७) : वर्गात मुलांच्या शिस्तीवर नजर ठेवणारा क्लास दोजो सॉफ्टवेअर कंपनीचा संस्थापक

शामेंदु गुप्ता (२८) : बालवाडीच्या वयातील मुलांना खेळ आणि ॲनिमेटेड गोष्टींची ओळख करून देणारे उपकरण

प्रणव यादव (२८) : ब्रेन मॅपिंग तंत्रज्ञानाची नवी दालने निर्माण करणाऱ्या न्यूरो साइट या कंपनीचा मुख्याधिकारी

ईशा खरे (१८) : इंटेल इंटरनॅशनल सायन्स अँड इंजिनीअरिंग फेअरमधील सर्वोत्कृष्ट वैज्ञानिक

अल्प उत्पन्नगटांतील कुटुंबांमधील बुद्धिमंत बालकांचा शोध घेऊन त्यांच्या भविष्याला आकार देण्याकरिता मुंबई, चेन्नई, कानपूर आणि दिल्लीमध्ये एका आगळ्या शिक्षणकेंद्राचा प्रयोग अवंती नावाच्या एका संस्थेने सुरू केला. कृष्णा रामकुमार (२८) हा या अवंतीचा संस्थापक. अशा जवळपास ७५० मुलांचे भविष्य घडविण्याच्या या प्रयोगाबद्दल फोर्ब्जने रामकुमारला आपल्या यादीत स्थान दिले आहे. स्वच्छ ऊर्जास्रोतांची गरज ओळखून त्या क्षेत्रात काम करणाऱ्या अजयिता शहा या तरुणीचाही या मानकऱ्यांमध्ये समावेश आहे. पदार्थांचा ताजेपणा टिकवून ठेवणारा फ्रेशपेपर बनविणारी कविता शुक्ला (२९), अमेरिकेतील फुटबॉलपटू मेधा पारेख (२८), सुपरजायंट गेम्स या संस्थेचा संचालक आमिर राव (२९), विज्ञानक्षेत्रात चमक दाखवणारी दिव्या नाग (२२), मॅसॅच्युसेट्स जनरल हॉस्पिटलमधील निवासी

डॉक्टर रघु चिवनकला (२९), वैद्यकक्षेत्रात काम करणारी सुरभी सरना (२८) यांनीही या यादीत मानाचे स्थाप पटकावले आहे.

वयाची तिशी ओलांडण्याआधीच वित्तव्यवस्थापन, प्रसारमाध्यमे, क्रीडा, शिक्षण आदी क्षेत्रांत असामान्य कर्तृत्व दाखवणारी ही तरुणाई म्हणजे, नव्या जगाच्या शोधप्रक्रियेतील बुद्धिमंतांची मांदियाळी आहे.

☞ हौशी वाचनप्रेमींच्या उपक्रमातून वस्त्यांमध्ये वाचनालये सुरू

वाचनाची इच्छा असूनही परवडत नाही, म्हणून पुस्तकांपासून राहिलेल्या मुलांसाठी दोन वर्षांपूर्वी कोथरूडमधील गोसावी वस्तीमध्ये 'वस्ती तिथे वाचनालय' हा अनोखा उपक्रम सुरू झाला. साडेचारशे मुले सभासद झाली. आता हा उपक्रम टप्प्याटप्प्याने शहरातील इतर वस्त्यांमध्येही राबविण्यात येणार आहे.

उपक्रमाची व्याप्ती वाढविण्यासाठी 'अक्षरसरिता फाउंडेशन' स्थापन केले आहे अशी माहिती उपक्रमाच्या प्रमुख शोभा बोंद्रे दिली.

त्या म्हणाल्या, लहान मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आणि वंचित वाचकांना पुस्तके मिळवून देणे हा आमचा उद्देश आहे. जानेवारी २०१२ मध्ये गोसावी वस्तीत पहिले मोफत वाचनालय सुरू केले. दोन वर्षांत साडेचारशे मुले आमची सभासद झाली आहेत. याशिवाय धुणीभांडी, घरकाम, स्वयंपाक करणाऱ्या पन्नास महिलाही आता सभासद झाल्या आहेत. सध्या वाचनालयात आणि १४०० पुस्तके आहेत. २५ जानेवारीला संजीवनी हॉस्पिटलजवळील सेवाग्राम संस्थेत नवीन वाचनालय सुरू करीत आहोत.

गोसावी वस्तीत मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे आम्हाला आता इतर वस्त्यांमध्येही पोहोचायचे आहे. यासाठी मोबाईल व्हॅन वाचनालय सुरू करण्याची इच्छा आहे. या उपक्रमासाठी पुस्तके अथवा इतर काही मदत करण्याची इच्छा असेल तर त्यांनी ६४७०१२२५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे शोभा बोंद्रे यांनी केले.

☞ भारतीय छात्र संसदेत उद्योजक अभय फिरोदिया

''मोबाईल, लॅपटॉप, टॅब यांचा वापर गरजेचा झाला आहे. मात्र या वस्तूंचा अतिरेकी वापर म्हणजे उपभोक्तावाद आहे. उपभोक्ता होत असताना चांगला आणि समाधानी माणूस व्हायचे की वस्तू आणि सेवा मिळविणारा माणूस व्हायचे, याचा विचार माणसाने केला पाहिजे.'' असे प्रतिपादन उद्योजक अभय फिरोदिया यांनी केले.

कोथरूड येथील 'एमआयटी'त आयोजित चौथ्या भारतीय छात्र संसदेत 'उपभोक्तावाद भारताला उपभोगतोय का?' या विषयावरील परिसंवादाला 'एमआयटी'चे संस्थापक डॉ. विश्वनाथ कराड, आंध्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. जी. एम. एन. राजू, पत्रकार स्वामिनाथन गुरुमूर्ती, बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक गजानन

काकडे, छात्र संसदेचे निमंत्रण राहुल कराड व्यासपीठावर उपस्थित होते. हरियानाचे आमदार अनिल धनतोरी आणि मणिपूरचे आमदार जंगेमलुंग पानमेई यांना आदर्श युवा विधायक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

☞ जी मेलचे मुक्तद्वार

कुणाला मेल पाठवायचा म्हणजे त्याचा मेल आयडी तुम्हाला माहीत हवा किंवा त्याच्या मेल आयडीवर कधीतरी तुम्ही ईमेल पाठविलेला असायला हवा, तरच पुढच्या वेळी मेल पाठविताना त्याचे नाव तुमच्या कॉन्टॅक्ट लिस्टमध्ये येते, अशी परिस्थिती होती. मात्र, आता केवळ गुगल + वापरणाऱ्या कुणालाही जीमेलवरून ईमेल पाठविता येणार आहे. केवळ संबंधित व्यक्तीचे नाव माहीत असले की झाले!

गुगलने नुकत्याच जाहीर केलेल्या बदलांनुसार आता जीमेल युझरला त्याच्या कॉन्टॅक्ट लिस्टसह गुगल+ वापरणाऱ्या व्यक्तींनाही मेल पाठवता येतील. यामध्ये तुम्ही ज्यांना ओळखता अशा व्यक्तींसह अनोळखी व्यक्तींचाही समावेश होईल.

अडीच वर्षापूर्वी सुरू झालेले गुगल+ सध्या ५४ कोटी युझर्स नियमित वापरतात. यामुळे दोन्ही सुविधांचा वापर करणाऱ्यांची सोय होणार असल्याचे गुगलचे म्हणणे आहे. अशाप्रकारे पाठविण्यात आलेले मेल समोरच्या व्यक्तीच्या जी-मेलमधील प्रायमरीऐवजी सोशल कॅटेगरीमध्ये दिसतील. या मेलला रिप्लाय केला ही, तर भविष्यात त्या व्यक्तीकडून येणारे ईमेल गुगल स्वत: ब्लॉक करेल. ज्या व्यक्तींना अशाप्रकारे पाठविलेले मेल बिलकुल नको आहेत, ते सेटिंग्जमध्ये जाऊन गुगल+ वरील कुणीही, गुगल+ वरील विस्तारीत सर्कल, सर्कल किंवा कुणीच नाही असा पर्याय निवडू शकतात. सेलिब्रिटींना मात्र असे काहीही करण्याची गरज नाही. ज्या व्यक्तींना गुगल+ वर मोठ्या प्रमाणावर फॉलोअर्स आहेत त्यांना इतर गुगल+ युझरचे मेल डायरेक्ट येणार नाहीत, असे गुगलने स्पष्ट केले आहे. मात्र, सेलिब्रिटी याची नेमकी व्याख्या त्यांनी स्पष्ट केलेली नाही.

यामुळे लोकांच्या प्रायव्हसीवर गदा येईल, अशी भीती काही तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. सुरुवातीला सर्वांनाच अशा प्रकारचे मेल येऊ शकणार असल्याने बळजबरीने याप्रकारचे मेल स्वीकारण्यास युझर्सची संमती असल्याचे गुगलने गृहीत धरल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्याऐवजी ज्यांना ही सुविधा हवी आहे, त्यांना सेटिंग्जमध्ये बदल करून ही सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी पुढे आली आहे. इलेक्ट्रॉनिक प्रायव्हसी इन्फॉर्मेशन सेंटरचे कार्यकारी संचालक मार्क रोटेनबर्ग यांच्या म्हणण्याप्रमाणे गुगलचे हे नवीन फीचर त्रासदायक आहे.

☞ फ्लॅश ट्रान्स्फर

व्हॉटसॲप, वुईचॅट ॲप्लिकेशनच्या क्रेझनंतर आता तरुणाईला 'फ्लॅश

ट्रान्स्फर' ॲप्लिकेशन भुरळ पाडत आहे. हे 'ॲप्स्' वाय-फायच्या माध्यमातून कनेक्ट होत असल्याने शेअरिंग वेग ब्लूटुथच्या तुलनेत वीसपटीने अधिक आहे. कॅमेऱ्याच्या फ्लॅशच्या स्पीडप्रमाणे छायाचित्रे, व्हिडिओ आदी फाइल्स ट्रान्स्फर होतात.

या ॲप्लिकेशनच्या वापराने पाच ते दहा मेगाबाईटची फाइल केवळ १० ते १५ सेकंदात ट्रान्फर होते. ब्लूटुथद्वारे हीच फाइल पाठवण्यासाठी तीन मिनिटांपेक्षा अधिक कालावधी लागतो. कमी वेळात आणि मोबाईल शेक होताच फाइल जात असल्यानं ब्लूटुथपेक्षा स्मार्टफोनधारकांच्या ॲप यादीत फ्लॅश ट्रान्स्फरला प्राधान्य मिळतेय.

वाय-फायच्या माध्यमातून फाइल जात असल्यानं एकाच वेळी दोन-तीन मोबाईलवरही फाइल्स ट्रान्स्फर करता येते. गाणी, गेम्स, सॉफ्टवेअर, फिल्मचं शेअरिंग करण्यासाठी फायदेशीर ठरत आहे. ॲपल, आयफोन या मोबाईल्सना ब्लूटुथ सुविधा नसल्यानं फाइल ट्रान्सफर करण्यात अडचणी येत होत्या; परंतु या ॲप्लिकेशनमुळे ट्रान्स्फरची सोय झाली असल्यानं त्यांच्यासाठी ही एक पर्वणीच समजावी लागेल. गुगल प्ले आणि वेबसाइटवरही फ्लॅश ट्रान्स्फर मोफत उपलब्ध आहेत. तरुणांमध्ये व्हॉट्सॲप, फेसबुकसह इतर ॲप्स अविभाज्य घटक बनत आहेत. या ॲप्समुळं सध्या एसएमएस किंवा फोनचे प्रमाण कमी झाल्याचंही पाहायला मिळतंय.

नोटपॅड, कॅल्क्युलेटर, संकेतस्थळ, टेलिफोन, ॲनिमेशन, इलेक्ट्रीसिटी बिल आदी सॉफ्टवेअरमुळे आपले जीवन सुसह्य झाले; परंतु ही सॉफ्टवेअर्स नेमकी बनतात कशी, याबद्दल वापरकर्त्यांच्या आणि विद्यार्थ्यांच्या मनात कायमच कुतूहल असते. विविध प्रणालींच्या (लॅंग्वेज) आधारानं ही सॉफ्टवेअरनिर्मिती अकरावी, बारावीच्या विद्यार्थ्यांनी केली. दि पूना गुजराती केळवणी मंडळाच्या आचार्य श्री. डी. बी. दादावाला महाविद्यालयात विद्यार्थी - पालकांसाठी याचं प्रदर्शन भरवले होते. त्याचे उद्‌घाटन दीपक जोशी यांनी केले. अभ्यासक्रमातील विषयांपलीकडं जाऊन विद्यार्थ्यांनी निर्मिलेल्या या सॉफ्टवेअर्सचं सर्वांनी कौतुक केलं. शहरातील सर्व संगणक शिक्षकांसाठीही अशा कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार आहे.

☞ ऑनलाइन पासपोर्ट अर्ज

पासपोर्ट सुविधा केंद्रांना (पीएसके) एजंटांच्या विळख्यातून सोडविण्यासाठी 'ऑनलाइन' अर्ज भरण्याची सुविधा पुरविणारी स्वतंत्र यंत्रणा देशात उभारण्यात येणार आहे.

पासपोर्टची सर्व सुविधा ऑनलाइन करण्यासाठी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसच्या (टीसीएस) मदतीने पुण्यासह देशातील प्रमुख शहरांमध्ये 'पीएसके' सुरू झाली आहेत. यापूर्वी पासपोर्ट कार्यालयाला एजंटांनी गराडा घातला होता. 'पीएसके'मुळे

पासपोर्ट मिळविण्यासाठी एजंटांची मक्तेदारी मोडीत निघेल, अशी अपेक्षा होती. पण, एजंटांनी आपली भूमिका बदलत ऑनलाइन अर्ज भरून देण्यासाठी या केंद्रांच्या परिसरात गर्दी केली. तंत्रज्ञानाची माहिती नसणारे आणि इंग्रजी अवगत नसलेले बहुसंख्य अर्जदार ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी एजंटचा रस्ता धरत आहेत. त्यासाठी सातशे ते एक हजार रुपये एजंट घेत होते. त्यातून मार्ग काढण्यासाठी पासपोर्टचा ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात येत आहे. त्यासाठी पासपोर्ट कार्यालय, 'पीएसके' याव्यतिरिक्त आणखी एका संस्थेला हे काम देण्यात येईल.

पुणे कार्यालयाचे पासपोर्ट अधिकारी नरेंद्र सिंह म्हणाले, ''पासपोर्टचा अर्ज ऑनलाइन भरला जातो. त्याव्यतिरिक्त वेळोवेळी पासपोर्ट मेळ्याचे आयोजन करून तातडीने अर्जदारांना पासपोर्ट देण्याचा प्रयत्न केला जात आहे. आई-वडिलांचा पासपोर्ट वैध असल्यास सहा वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांसाठी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी (६० पेक्षा जास्त) ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर त्यातून मिळणारा 'ॲप्लिकेशन रेफरन्स नंबर' (एआरएन) घेऊन पासपोर्ट सेवा केंद्रावर जाता येईल. त्यासाठी कोणतीही वेळ घेण्याची गरज नाही. पासपोर्ट वितरणाचा कोटाही वाढविण्यात येणार आहे. सध्या पुण्यातून दरमहा ८०० पासपोर्ट वितरित केले जातात. त्यात ५० पासपोर्टची भर पडणार आहे.''

☞ पक्ष्यांची अनोखी दुनिया

देशातील विविध पक्ष्यांच्या अनोख्या दुनियेचे गोड गुपित 'बर्ड फेस्ट' या महोत्सवाच्या माध्यमातून जानेवारीत उलगडले गेले. नावाजलेले छायाचित्रकार, पक्षिप्रेमी, पक्षितज्ज्ञ याबरोबरच प्रत्यक्ष पक्ष्यांच्या अधिवासात प्रवेश करून निरीक्षण हे या महोत्सवाचे खास आकर्षण होते.

नेचर वॉक संस्थेतर्फे आयोजित 'बर्ड फेस्ट'चे हे तिसरे वर्ष असून, महोत्सवाचे उद्‌घाटन उद्योजक अतुल किर्लोस्कर, 'सँक्चुरी एशिया'चे संपादक बिट्टू सहगल यांच्या हस्ते झाले. या वेळी महापालिका आयुक्त महेश पाठक, एमटीडीसीचे व्यवस्थापकीय संचालक जगदीश पाटील, मुख्य वनसंरक्षक जीत सिंग, नितीन काकोडकर, मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) सुनील लिमये हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या प्रदर्शनात जुन्या पिढीतील पक्षी छायाचित्रकार धीर्तिमान मुखर्जी, क्लेमंट फ्रान्सिस, निरंजन संत, विक्रम पोतदार यांच्या छायाचित्रांचा समावेश होता. प्रदर्शनात समुद्रसपाटीपासून ते हिमालयापर्यंत आढळणाऱ्या पक्ष्यांची विविधता बघता आली.

पक्ष्यांवर आधारित माहितीपट, बर्ड क्विझ, विविध कार्यशाळा आणि पक्षिनिरीक्षण सहली हे महोत्सवाचे वैशिष्ट्य होते. पाचगाव पर्वती आणि एआरएआय

टेकड्यांवर तसेच कवडीपाट येथे तज्ज्ञांसोबत पक्षिनिरीक्षण सहलीही आयोजित केल्या गेल्या.

☞ 'दुनियादारी'ने ओलांडला २८ कोटींचा टप्पा

कथानक, संगीत, गीते व कलाकारांचा दर्जेदार अभिनय अशा सर्वच पातळ्यांवर सरस ठरलेल्या 'दुनियादारी'ने २८ कोटींचा टप्पा ओलांडला आहे. 'मी शिवाजीराजे भोसले बोलतोय' या चित्रपटानंतर २५ कोटींच्या पुढे जाण्याचा मान मिळवीत 'दुनियादारी'ने मराठी चित्रपटसृष्टीत पहिल्यांदाच उत्पन्नाबाबत मुसंडी मारली आहे.

हिंदी चित्रपटसृष्टीमध्ये 'शंभर कोटी क्लब' चित्रपटांची संख्या वाढत असतानाच आता मराठीनेही 'पंचवीस कोटी क्लब'च्यावर जाण्याचा धडाका लावला आहे. सहा महिन्यापेक्षा जास्त काळ प्रेक्षकांच्या मनावर 'दुनियादारी'ने भुरळ घालण्याचे काम केले. सुहास शिरवळकर यांनी या कादंबरीद्वारे मांडलेले महाविद्यालयीन तरुणाईचे वास्तवदर्शी विश्व, संजय जाधव यांचे दिग्दर्शन, अंकुश चौधरी, स्वप्नील जोशी, जितेंद्र जोशी, सई ताम्हनकर, ऊर्मिला कानेटकर, सुशांत शेलार, संदीप कुलकर्णी, वर्षा उसगावकर या कलाकारांचा उत्तम अभिनय आणि संगीतकार अमितराज, समीर साप्तीकर व पंकज यांच्या संगीतामुळे प्रेक्षकांना आपल्याकडे खेचले. शाहरुखच्या 'चेन्नई एक्सप्रेस'ला टक्कर देत पुण्यात उत्पन्नामध्ये मागे टाकण्याचा विक्रम या चित्रपटाने केला. तसेच 'भाग मिल्खा भाग,' 'वन्स अपॉन अ टाइम इन मुंबई दोबारा' यांसारख्या तगड्या हिंदी चित्रपटांनाही त्याने आव्हान दिले. ३०-३५ चिपटगृहांमध्ये अजूनही हा चित्रपट पाहण्यासाठी गर्दी होत आहे.

☞ राज्यातील ग्रंथालयांना वाढीव अनुदान?

दर्जा सुधारण्याची सूचना देण्यात आलेल्या राज्यभरातील ५७८८ ग्रंथालयांचा अहवाल ग्रंथालय संचालनालयाने राज्य सरकारला सादर केला आहे. ५६८८ ग्रंथालयांनी दर्जा सुधारल्यामुळे या अहवालात त्यांची वाढीव अनुदानासाठी शिफारस करण्यात आली असून त्याबाबतचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात येणार आहे.

राज्यात वाचनसंस्कृतीच्या प्रसाराचे काम करणाऱ्या ग्रंथालयांना राज्य सरकारकडून अनुदान देण्यात येते. या ग्रंथालयाचा कारभार तपासण्यासाठी महसूल विभागाने २०१२ मध्ये राज्यातील १२ हजार ८६१ ग्रंथालयांची पडताळणी केली होती. या पडताळणीनंतर अकार्यक्षम असलेल्या ९१४ ग्रंथालयांची मान्यता काढून घेण्यात आली, तर ३५० ग्रंथालयांचा दर्जा कमी करण्यात आला होता. तसेच ५७८८

ग्रंथालयांना सूचना देऊन सुधारणा करण्यास सांगण्यात आले होते. या ग्रंथालयांच्या कामाची पाहणी करून तयार करण्यात आलेला नवा अहवाल राज्य सरकारला सादर करण्यात आला.

ग्रंथालय संचालनालयाने केलेल्या पाहणीत, कामातील त्रुटी सुधारण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या ५७८८ ग्रंथालयांपैकी सुमारे ५६८८ ग्रंथालयांनी त्यांचा दर्जा सुधारत कामामध्ये सुसूत्रता आणल्याचे लक्षात आले आहे. त्यामुळे या ग्रंथालयांची वाढीव अनुदानासाठी शिफारस करण्यात आली आहे. बाकी शंभर ग्रंथालये त्यांचा दर्जा सुधारण्यात अपयशी ठरल्याने त्यांचा वाढीव अनुदानासाठी या अहवालामध्ये विचार करण्यात आलेला नाही, असे सांगण्यात आले. या वाढीव अनुदानाबाबतचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतला जाणार आहे.

☞ तंत्रज्ञान उसने नको

''माहिती तंत्रज्ञानाने देशात मोठी क्रांती घडवून आणल्याचे आपण बोलतो. मात्र, प्रत्यक्षात तंत्रज्ञानातील ९५ टक्के उपकरणे ही इतर देशातून आयात केली जात आहेत. त्यामुळे तंत्रज्ञानातील उपकरणांची उत्पादकता वाढविली पाहिजे.'' असे मत छत्तीसगडचे राज्यपाल शेखर दत्त यांनी व्यक्त केले.

सेंटर फॉर ॲडव्हान्स्ड स्ट्रॅटेजिक स्टडीज तर्फे (कॅस) राष्ट्रीय सुरक्षा आणि विकास या विषयावरील विशेष पुस्तिकेचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. माजी केंद्रीय गृहसचिव राम प्रधान, संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचे (डीआरडीओ) माजी महासंचालक डॉ. व्ही. के. सारस्वत, 'कॅस'चे अध्यक्ष आणि माजी राजदूत एम. के. मंगलमूर्ती, 'यशदा'चे महासंचालक डॉ. संजय चहांदे, निवृत्त एअर मार्शल भूषण गोखले, 'सकाळ'चे अध्यक्ष प्रतापराव पवार, माजी नौदल प्रमुख ॲडमिरल जयंत नाडकर्णी उपस्थित होते. दत्त म्हणाले, ''भविष्यात भारताने जगाचे नेतृत्व करावे, अशी विचारणा इतर देश करत आहेत. अशा परिस्थितीत आपण केवळ महासत्तेचा जप न करता प्रत्यक्ष कृती करणे आवश्यक आहे.''

''२६/११ च्या हल्ल्यानंतर देशातील अंतर्गत सुरक्षा आणि सीमेवरील सुरक्षा व्यवस्था हे एकमेकांशी संलग्न असणे आवश्यक आहे. मात्र, अद्याप त्यासंदर्भात प्रयत्न झाले नाहीत,'' असे प्रधान यांनी सांगितले.

☞ भांडारकर संस्थेचा खजिना अडगळीत

जुनी कपाटे, मोडलेली कवाडे अशा दुरवस्थेमुळे भांडारकर प्राच्यविद्या संस्थेतील (बोरी) पुस्तक भांडाराला अडगळीचे स्वरूप आले आहे.

संस्थेच्या आवारात हे पुस्तक भांडार असून, या इमारतीला ऐतिहासिक वास्तूचा दर्जा प्राप्त आहे. मात्र, डागडुजीच्या नावाखाली दोन वर्षांपूर्वी पाडापाड

केली होती. काही लोकांच्या विरोधानंतर थांबलेले हे काम अद्यापही 'जैसे थे'च आहे. साडेतीनशे प्रकाशने आणि पाच लाखांहून अधिक पुस्तके, महाभारत, रामायण आणि विविध कॅटलॉगसह दुर्मिळ पुस्तकांचा त्यात समावेश आहे.

यातील काही बाइंडिंग केलेली, तर काही सुटी पुस्तके आहेत. वर्षानुवर्षे ही पुस्तके पडून आहेत; तसेच देखभाल, साफसफाई केली जात नाही. एखाद्या वाचकाने पुस्तकाची मागणी केल्यास हे भांडार उघडले जाते. इतर वेळी ते बंद असते.

''मधल्या काळात मी संस्थेचे काम पाहत नव्हते. त्यामुळे बरीच कामे रखडली आहेत. संस्थेत पुन्हा रुजू झाल्यानंतर कामे मार्गी लागत आहेत. बऱ्याचशा पुस्तकांचा कागद खराब झाला आहे. चांगली पुस्तके नवीन पुस्तक भांडारात हलविली आहेत.'' असे मानद सचिव मैत्रेयी देशपांडे, यांनी सांगितले.

☞ वाढत्या ज्ञानामुळे मेंदूची क्षमता कमी होते

वय जसजसे वाढत जाते तसे जास्त शहाणपण येते आणि मेंदूची क्षमताही वाढते, ही पारंपरिक समज बदलणारे संशोधन समोर आले आहे. एखाद्या व्यक्तीच्या मेंदूमध्ये जास्तीत जास्त गोष्टी साठवून ठेवण्याचा प्रयत्न झाला तर त्या मेंदूची क्षमताही उत्तरोत्तर कमी होत जाते, असे नुकत्याच झालेल्या संशोधनातून स्पष्ट झाले आहे.

मोठ्या प्रमाणावर ज्ञानाचा साठा मेंदूत झाला, तर काही कालावधीनंतर तो मेंदू क्षीण होत जातो, असेही संशोधनामध्ये स्पष्ट झाले आहे. युनिव्हर्सिटी ऑफ ट्युबिंगेन येथील एक अभ्यासक डॉ. मायकेल रामस्कर यांनी याबाबत संशोधन केले आहे.

एखाद्या व्यक्तीचे वय वाढत गेल्यानंतर आजूबाजूच्या गोष्टी, संपर्कात येणारी माणसे, घेतलेले शिक्षण याबाबत माहिती त्या व्यक्तीच्या मेंदूमध्ये एकत्र होते. त्या व्यक्तीचे वय वाढल्यानंतर त्या विशिष्ट व्यक्तीच्या मेंदूची क्षमताही कमी होते, असे हा अभ्यास सांगतो.

एखाद्या व्यक्तीला जितका जास्त अनुभव तितका त्या व्यक्तीचा मेंदू कमजोर, असेही अभ्यासामुळे स्पष्ट झाले आहे. डॉ. मायकेल यांच्या टीमने एका कम्प्युटर प्रोग्रॅमच्या साह्याने मेंदूचे शास्त्रशुद्ध निरीक्षण नोंदविले. एखादी व्यक्ती तिच्या आयुष्यामध्ये कोणत्या नव्या गोष्टी कोणत्या वयामध्ये शिकतो, त्या किती वर्षांपर्यंत त्याच्या लक्षात राहतात यासह विविध निरीक्षणे नोंदविण्यात आली. ज्ञान मेंदूत साठविल्यानंतर मेंदूची क्षमता कमी होत असल्याचे समोर आले आहे.

☞ मोबाईवरील जाहिराती – अब्जावधींची उड्डाणे

मोबाईलवरही जाहिरातींचे प्रमाण वाढू लागले आहे. या जाहिरातींचा खर्च गेल्या वर्षी जागतिक स्तरावर १३.१ अब्ज डॉलर इतका झाला होता. हा खर्च दरवर्षी वाढत असून २०१७ पर्यंत तो ४१.९ अब्ज डॉलरवर जाईल, असा अंदाज गार्टनर या संशोधन संस्थेने वर्तविला आहे.

चालू वर्षांत जगभरातील मोबाईल जाहिरातींचा व्यवसाय १८ अब्ज डॉलरवर जाणार आहे. या जाहिरातींचे प्रकार विविध आहेत. परंतु त्यात मोबाईलच्या स्क्रीनवर दिसणाऱ्या अर्थात डिस्प्ले प्रकारातील जाहिरातींना अधिक पसंती, असे गार्टनरचे मत आहे. त्यांनतर व्हिडिओ जाहिरातींना 'मोबिझन'ची पसंती मिळेल.

गार्टनर रिसर्चच्या संचालक स्टिफनी बघासारियन यांच्या मते, पुढील काही वर्षांत मोबाईल जाहिरातींच्या खर्चावर बंधने येतील. ही बंधने मुख्यत: मोबाईल कंपन्यांची संकेतस्थळे व ॲप्लिकेशन वेगाने वाढत असल्यामुळे येणार आहेत. त्या तुलनेत मोबाईलवर जाहिरात करू इच्छिणाऱ्या ब्रँडकडून जाहिरातींसाठी जागांची मागणी येत नसल्याचे स्पष्ट झाले आहे. तरीही २०१५ ते २०१७ या काळात मात्र मोबाईल जाहिरातींना वेग येणार आहे. जाहिरातींचे दर, आकार यांत सुसूत्रता आल्याचा हा परिणाम असेल.

☞ मोबाईलमुळे संगणकांची विक्री मंदावली

मोबाईलला आशियातील लोकांनी सध्या सर्वाधिक पसंती दिली आहे. मोबाईलवर संगणकाची कामे करता येत असल्याने लोक वैयक्तिक संगणक (पर्सनल कॉम्प्युटर-पीसी) विकत घेण्यास उत्सुक नाहीत. यामुळे आशिया-प्रशांत विभागात 'पीसी'च्या विक्रीत १० टक्के घट झाली आहे.

लॅपटॉप व नोटबुकच्या बाजारपेठेत चिनी संगणक कंपनी लेनोव्होने वर्चस्व कायम टिकवत २४.९ टक्के बाजारहिस्सा राखण्यात यश मिळविले आहे. दुसऱ्या क्रमांकावर अमेरिकेतील हेवलेट पॅकार्ड ही कंपनी असून, तिचा बाजारहिस्सा १०.५ टक्के झाला आहे. डेल ही कंपनी तिसऱ्या स्थानी असून, तिने ९.४ टक्के बाजारहिस्सा काबीज केला आहे. त्यानंतर तैवानच्या एसर व असुस यांनी अनुक्रमे ८.१ व ६.९ टक्के हिस्सा काबीज केला आहे.

इंटरनॅशनल डेटा कॉर्पोरेशनच्या (आयडीसी) निरीक्षणानुसार जपान सोडल्यास उर्वरित आशिया-प्रशांत प्रदेशातील बहुतांश देश विकसनशील असून, या देशांमध्ये आर्थिक मंदीचे वातावरण आहे. त्यामुळेही संगणक खरेदीवर याचा थेट परिणाम दिसून आला आहे. त्याच वेळी एकाच व्यक्तीला संगणक व मोबाईल यांचा खर्च परवडत नसल्याने आणि मोबाईलवर इंटरनेट उपलब्ध होत असल्याने स्मार्टफोन तसेच टॅब्लेटला या प्रदेशातील लोकांची वाढती पसंती मिळत आहे. चालू वर्षातही

संगणकाला मोबाईलशी कडवी झुंज द्यावी लागणार असल्याचा अंदाज आयडीसीचे विश्लेषक हांदोको अँडी यांनी वर्तविला आहे.

☞ हिरवळ देते सकारात्मक ऊर्जा

शहरी भागात जवळपास हिरवळ असल्यास तुम्हाला निश्चितच सकारात्मक ऊर्जा मिळते आणि मन प्रफुल्लित होते. ब्रिटनमध्ये झालेल्या एका अभ्यासात हे सिद्ध झाले आहे. 'एन्व्हॉयर्न्मेंट सायन्स'मध्ये हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे. ब्रिटनमधील युनिव्हर्सिटी ऑफ एक्सटेरमधील सेंट्रल फॉर एन्व्हॉयर्न्मेंट अँड ह्यूमन हेल्थचे सहप्राध्यापक मॅथ्यू व्हाइट म्हणाले, ''हिरवाई असलेल्या शहरी भागात राहण्याऱ्या नागरिकांमध्ये सकारात्मक ऊर्जा मोठ्या प्रमाणात आढळते.

■

आगामी

प्रयोग वनस्पतीविज्ञानाचे

डी.एस. इटोकर



बीट, मुळा, गाजर यांना कोणत्या वनस्पती म्हणतात. ज्वारी, बाजरी, मका, सूर्यफुल यांना फळे व फुले येतात का? .... खोडाच्या प्रकारावरून वनस्पतींचे भाग कसे पडतात?...
या आणि अशांसारख्या वनसपती विज्ञानातील प्रश्नांची उत्तरं सहज सोप्या भाषेत आणि सचित्र प्रयोगांच्या माध्यमातून...!

★ शिवशाहीर पुरंदरे यांना झी २४ तास अनन्य जीवनगौरव पुरस्कार

कोणत्याही फळाची अपेक्षा न करता निरपेक्ष भावनेने समाजाच्या भल्यासाठी जीव ओतून देऊन काम करणारी ही सर्वसामान्य मंडळी अनन्यसाधारण अशी आहेत. ही मंडळी समाजाची खरी शक्ती असून त्यांचे काम पाहिले की निराश व्हायचे काहीही कारण नाही, ही खात्री पटते. ही माणसे समाजाची शक्ती असून त्यांच्यामुळे हिंदवी स्वराज्य आणखी मोठे होणार आहे, असे प्रतिपादन शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी केले.

झी २४ तास वृत्तवाहिनीतर्फे २०१३ चा 'झी २४ तास अनन्य जीवनगौरव पुरस्कार' केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या हस्ते पुरंदरे यांना प्रदान करण्यात आला. सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

मुंबईत हॉटेल ताजमहाल येथे झालेल्या या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या सर्वसामान्यांना तसेच बाबासाहेब यांच्या पत्नी निर्मला पुरंदरे यांनाही 'झी २४ तास अनन्य जीवनगौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रकृती अस्वाथ्यामुळे हा पुरस्कार त्यांना त्यांच्या निवासस्थानी प्रदान करण्यात आला होता. त्याची चित्रफित या वेळी दाखविण्यात आली.

★ दिलीप कदम यांना कॉमिक्स पुरस्कार

चित्रकार दिलीप कदम यांना कॉमिक्स क्षेत्रात मानाचा समजला जाणाऱ्या 'फादर ऑफ इंडियन कॉमिक्स' पुरस्कार दिल्ली येथे आयोजित 'कॉमिक फेस्ट ऑफ इंडिया'मध्ये प्रदान करण्यात आला. या सोहळ्यात देशातील अनेक कॉमिक्स कंपन्यांनी सहभाग घेतला होता. 'प्रगती पुरुष नरेंद्र मोदी' हे कॉमिक कदम यांनी मुखपृष्ठासह चित्रित केले असून, त्याचे लेखन नेहा शर्मा यांनी केले आहे.

★ 'प्राज'च्या प्रमोद चौधरी यांना 'बायोस्पेक्ट्रम लीडरशिप' पुरस्कार

बायोस्पेक्ट्रम कंपनीतर्फे प्राज इंडस्ट्रीजचे कार्यकारी अध्यक्ष प्रमोद चौधरी यांना 'बायोस्पेक्ट्रम लीडरशिप' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

जैवतंत्रज्ञान क्षेत्रातील विविध शाखांमध्ये लक्षणीय कामगिरी करणाऱ्या व्यक्ती आणि कंपन्यांना दर वर्षी बायोस्पेक्ट्रम पुरस्काराने गौरविण्यात येते. चौधरी गेल्या ४० वर्षांहून अधिक काळ व्यवसाय आणि उद्योजकता क्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत. त्यांनी वेगवेगळ्या शासकीय संस्थांमध्ये, संस्थात्मक पातळीवर आणि उद्योगांमध्ये काम करताना पुनर्नवीकरण होणाऱ्या ऊर्जेचा पुस्कार केला आहे. तसेच वातावरणातील बदलावर चर्चा करणाऱ्या यूएन लीडरशिप फोरममध्ये भारताची भूमिका मांडली होती. सध्या ते जैवऊर्जा या विषयावरील 'नॅशनल कमिटी ऑफ द कन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज'च्या अध्यक्षस्थानी आहेत. त्याशिवाय वर्ल्ड काउन्सिल ऑन इंडस्ट्रियल बायोटेक्नॉलॉजी (डब्ल्यूसीआयबी) आणि एक्झिक्युटीव्ह काउन्सिल ऑफ असोसिएशन ऑफ बायोटेकनॉलॉजी लेड एन्टरप्रायजेस (एबीएल) या संस्थांचे सदस्यही आहेत.

★ सतीश आळेकर, डॉ. वाघमारे यांना पुरस्कार

बलराज साहनी-साहिर लुधियानवी फाउंडेशनच्या वतीने ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर यांना 'बलराज साहनी' पुरस्कार आणि साहित्यिक खासदार डॉ. जनार्दन वाघमारे यांना 'कैफी आझमी' पुरस्कार ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य यांच्या हस्ते २६ डिसेंबर रोजी प्रदान करण्यात आला.

★ टिळक पुरस्कार मामेन मॅथ्यू यांना प्रदान

लोकमान्य टिळकांना अभिप्रेत असणारे 'स्वराज्य' आणि त्यासाठी आवश्यक अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे रक्षण करण्याची माध्यमांची जबाबदारीच असल्याचे मत 'मल्याळी मनोरमा' समूहाचे मुख्य संपादक मामेन मॅथ्यू यांनी व्यक्त केले.

'केसरी मराठा ट्रस्ट'तर्फे देण्यात येणाऱ्या सहाव्या 'लोकमान्य टिळक पत्रकारिता राष्ट्रीय पुरस्कारा'ने मॅथ्यू यांना 'केसरी'चे संपादक डॉ. दीपक टिळक यांच्या हस्ते गौरविण्यात आले. एक लाख रुपये, स्मृतिचिन्ह आणि लोकमान्य टिळकांच्या पुस्तकांचा संच असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

'केसरी'च्या १३३ व्या वर्धापनदिनी केसरी वाड्यामध्ये आयोजित कार्यक्रमाच्या वेळी राज्याचे सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील, ट्रस्टचे सरव्यवस्थापक डॉ. रोहित टिळक, 'केसरी'चे कार्यकारी संपादक सुकृत खांडेकर, ज्येष्ठ पत्रकार कुलकर्णी, प्रेमा मॅथ्यू आदी व्यासपीठावर उपस्थित होते. या वेळी सहकारमंत्री पाटील यांच्या हस्ते ज्येष्ठ पत्रकार अरविंद गोखले, चित्रकार सुहास बहुलकर; तसेच टिळक

महाराष्ट्र विद्यापीठ, अनाथ हिंदू महिलाश्रम आणि वक्तृत्वोत्तेजक सभा या संस्थांना 'जयंतराव टिळक स्मृती पुरस्कारा'ने गौरविण्यात आले.

मॅथ्यू म्हणाले, 'स्वराज्याच्या स्थापनेसाठी आवश्यक असणारी देशप्रेमाची भावना समाजामध्ये निर्माण करण्यासोबतच समाजशिक्षणासाठी 'केसरी'च्या स्थापनेपासूनच लोकमान्य टिळकांनी प्रयत्न केले. 'मल्याळी मनोरमा'चे कामही याच तत्त्वांना धरूनच चालत आले आहे. पत्रकारिता हे समाजसेवेचे पुढचे पाऊल असल्याचे मानत काम सुरू असल्याने 'मल्याळी मनोरमा'ची प्रगती झाली. वृत्तपत्रांच्या पानांमधील आठ कॉलमांच्या पलीकडे जात पत्रकारिता करण्याची ही प्रेरणा दोन्ही वृत्तपत्रांसाठी महत्त्वाची ठरली. त्यामुळेच हा पुरस्कार स्वीकारताना पत्रकार म्हणून असणाऱ्या जबाबदाऱ्यांची पुन्हा जाणीव होत आहे.' कुटुंबीयांची पुन्हा जाणीव होत आहे.' कुटुंबीयांची मालकी असणाऱ्या जगभरातील काही सर्वोत्तम वृत्तपत्रांमध्ये 'मल्याळी मनोरमा'च्या आधी 'केसरी'चा समावेश असल्याचा गौरवोल्लेख मॅथ्यू यांनी केला.

मॅथ्यूंसारख्या ज्येष्ठ पत्रकारांना या पुरस्काराच्या निमित्ताने समाजासमोर आणण्याचे काम ट्रस्टच्या माध्यमातून केले आहे. त्यामुळे पुरस्कार्थींसोबतच पुरस्काराचीही उंची वाढत चालल्याचे मत पाटील यांनी व्यक्त केले. डॉ. दीपक टिळक यांनी प्रास्ताविक केले. स्वप्नील पोरे यांनी सूत्रसंचालन केले. खांडेकर यांनी आभार मानले.

यापूर्वी 'द हिंदू'चे संपादक एन. राम यांनाही या पुरस्काराने गौरविण्यात आले होते. याचा संदर्भ देऊन राम आपले वर्गमित्र असल्याची आठवण मॅथ्यू यांनी सांगितली. 'मद्रास ख्रिश्चन कॉलेज सेकंडरी हायस्कूलचे विद्यार्थी असणाऱ्या आम्हा दोघांना लोकमान्य टिळकांच्या नावाच्या पुरस्काराने गौरविण्यात आले, ही बाब आमच्या मुख्याध्यापकांना समजली असती, तर त्यांना निश्चितच आमचा अभिमान वाटला असता,' अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली.

★ श्रीकांत मोघे यांना गदिमा पुरस्कार

''कवितेमध्ये असणे तसेच दिसणे अन् जगण्यात असणे तसेच लिहिणे, हे आमचे व्रत असून, गदिमांनी घालून दिलेल्या पायवाटेवरून गेल्याने हे साध्य झाले आहे,'' अशी भावना ज्येष्ठ कवी ना. धों. महानोर यांनी व्यक्त केली.

महानोर यांच्या हस्ते ज्येष्ठ अभिनेते श्रीकांत मोघे यांना गदिमा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी गीतकार गुरू ठाकूर, आनंद माडगूळकर, श्रीधर माडगूळकर, गायिका विभावरी आपटे, माधुरी जसराज उपस्थित होते.

विद्याप्रज्ञा पुरस्काराने आपटे यांचा, चैत्रबन पुरस्काराने ठाकूर यांचा, गृहिणी-सखी-सचिव पुरस्काराने जसराज यांचा, तर गदिमा पारितोषिकाने प्रतीक फाळके या विद्यार्थ्याचा गौरव करण्यात आला.

महानोर म्हणाले, ''हजारो रसिकांच्या मनावर राज्य करतो तोच खरा कवी

असतो, गदिमा हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. वंचित असलेल्या लोककलेला गदिमांनीच त्यांच्या चित्रपटांमधून प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांनी लिहिलेली गाणी रसिकांच्या हृदयावर कोरली गेली.''

कविता आणि गाणे यांतील अंतरच गदिमांनी त्यांच्या चित्रपटांतून मिटविण्याचा प्रयत्न केला. भाषांतराच्या क्षेत्रात त्यांनी वेगळा ठसा उमटवताना मराठमोळे शब्द कधीही सोडले नाहीत, त्यामुळेच रसिकांना साहित्य आपलेसे वाटले, असेही महानोर म्हणाले. गदिमांचे स्मारक होण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन त्यांनी केले. समाजाकडून हीन वागणूक मिळूनही संत ज्ञानेश्वरांनी जगाच्या कल्याणासाठी ज्ञानेश्वरी लिहून ती घराघरांत पोचली. त्याचप्रमाणे गदिमांनी लिहिलेल्या गीतरामायणातून प्रभू रामाचे आयुष्य सामान्यांपर्यंत पोचले, अशी भावना मोघे यांनी व्यक्त केली.

ठाकूर, आपटे, जसराज यांनी मनोगत व्यक्त केले. शैला मुकुंद यांनी सूत्रसंचालन केले.

★ पत्रकारिता पुरस्कार

पत्रकार दिनानिमित्त पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघातर्फे विविध क्षेत्रातील मान्यवरांचा; तसेच पत्रकारितेत उल्लेखनीय कार्य केलेल्या पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. शिवसेनेचे नेते रामदास कदम, 'सकाळ' माध्यम समूहाचे कार्यकारी संपादक (राजकीय) आणि संघाचे प्रदेशाध्यक्ष गोविंद घोळवे, संघटक संजय भोकरे, संजय जोशी आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

'सकाळ'चे बातमीदार रोहित आठवले, संदीप घिसे, आशा साळवी (पत्रकारिता), उत्तम गेलडा (उद्योगरत्न), चेतन तुपे (कार्यक्षम नगरसेवक), विजय कदम, डॉ. निशिगंधा वाड (कलारत्न), शशिकांत कांबळे. अनंता बापू चव्हाण (समाजरत्न), अविनाश पाडाळे (युवारत्न), हेमंत निकम, कुंडलिक कायगुडे, सहायक पोलिस निरीक्षक (कार्यक्षम अधिकारी), किरण जोशी (पर्यावरण पत्रकारिता) यांना गौरविण्यात आले. रामदास कदम यांनी मनोगत व्यक्त केले. घोळवे म्हणाले, ''ग्रामीण भागातील सर्व विस्थापित पत्रकारांना एकत्र आणून राज्यभर संघटनेचा विस्तार करणार आहोत. पत्रकारांच्या उत्कर्षासाठी सदैव कार्यरत राहणार असून, त्याला सर्वांनी साथ द्यावी.''

★ ठाकूर स्मृती पुरस्कार

''सध्या सर्वच क्षेत्रातील सुसंस्कृतता संपत चालली आहे. शिक्षण, पत्रकारिता, समाजकारण या क्षेत्रांचा वापर समाजात दुफळी माजविण्यासाठी होतो आहे. अशा वेळी जुन्या पिढीने जोपासलेला परोपकाराचा संस्कार नवी पिढी जपणार का हा खरा प्रश्न आहे,'' अशी भावना न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांनी व्यक्त केली.

३री आवृत्ती

एक दिवा विझताना...

लेखक

रत्नाकर मतकरी

किंमत : १३०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.

या संग्रहातल्या 'एक दिवा विझताना'सारख्या कथा न आकळणारी गूढ रहस्ये या सूत्राभोवती फिरतात. 'चौथी खिडकी' ही एक अफलातून विज्ञानकथा 'काळ' या संकल्पनेभोवती रचली आहे, तर 'पोरखेळ'सारख्या कथेमधून मानवाचे नियतीच्या हातातले बाहुले असणे हे सूत्र बाळाच्या बाहुल्यांशी खेळण्याच्या प्रतीकातून सूचित केले आहे. कलावंत आणि कला यांच्यातला तिढा मांडणारी 'सुचेता चक्रपाणी आणि तिचा कोकिळकंठ' ही कथा एक उत्कृष्ट फँटसी ठरते; ती जादुई वास्तववादाची आठवण करून देते.

संधिप्रकाशातल्या धूसर वातावरणात एखाद्या अरण्यात शिरावे, तसे मतकरी यांच्या कथा वाचताना वाटते. वास्तव आणि कल्पना यांच्या सीमारेषेवर प्रवास सुरू होतो. वाचकांना या अरण्यातल्या कळलेल्या, न कळलेल्या वाटांकडे नेण्यासाठी मतकरी कथनाचे वेगवेगळे घाट, निवेदनशैली यांचा वापर करतात.

हा प्रवास विलक्षण आकर्षक असतोच; पण तो आत आत खोलातही नेतो.

स्व. बाबूराव ठाकूर स्मृती पुरस्कार सोहळ्यात या वेळी प्राचार्य वा.ना. अभ्यंकर, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन रावसाहेब शिंदे आणि ज्येष्ठ पत्रकार निशिकांत जोशी यांना स्व. बाबूराव ठाकूर स्मृती पुरस्काराने गौरविण्यात आले. पत्रकार, किरण ठाकूर उपस्थित होते.

चपळगावकर म्हणाले, ''समाजकार्य, शिक्षण आणि पत्रकारितेने सुसंस्कृत माणूस घडवला पाहिजे. तळागाळातील बहुजनांच्या हिताला प्राधान्य देणाऱ्या शिक्षणसंस्था आज हव्या आहेत. पत्रकारांचे बळ वाढले पाहिजे. त्या बळाचा योग्य वापर करण्याबाबतचा विवेक त्यांच्याकडे असला पाहिजे.''

शिंदे म्हणाले, ''स्वार्थाच्या परिघापलीकडे जाऊन काम करणारी माणसेच संस्कृती आणि मानवतेला समृद्ध करतात. जगताना प्रेम, आशा आणि कृतज्ञतेची सदोदित गरज असते.' जोशी यांनी पत्रकारितेतल्या उमेदीच्या काळातील आठवणी जागवल्या. या वेळी पशुवैद्यकशास्त्रातील निवृत्तीनंतर इतिहाससंशोधनाला वाहून घेणारे डॉ. सदाशिवराव शिवदे, मूकबधिरांसाठी काम करणाऱ्या शुभदा जोशी आणि पाबळच्या विज्ञानाश्रमात कार्यरत असलेले योगेश कुलकर्णी यांचाही सत्कार करण्यात आला.

★ गिरीश बापट यांना 'नातू पुरस्कार'

नातू फाउंडेशनचा यंदाचा 'महादेव बळवंत नातू' पुरस्कार ज्ञानप्रबोधिनीचे संचालक गिरीश बापट यांना, तर आसाम येथील रवी सावदेकर यांना 'सेवाव्रती कार्यकर्ता' पुरस्कार ता.९ जानेवारीला शिवशाहीर बाबसाहेब पुरंदरे यांच्या हस्ते देण्यात आला. ग्रामीण भागात आरोग्य, शिक्षणाच्या कार्याबद्दल बापट यांना एक लाख रुपये, शाल आणि स्मृतिचिन्ह असा हा पुरस्कार देण्यात आला. रवी सावदेकर हे आसाममधील जोरहाट जिल्ह्यातील आहेत. ते माजुली बेटावर वनवासींसाठी विवेकानंद केंद्राची शाळा गेल्या दहा वर्षांपासून चालवीत आहेत. या वेळी हरिओम मालशे आणि अरुण कोंडजकर यांचा विशेष गौरव केला गेला.

★ 'शब्दवैभव'चा वर्धापनदिन साजरा

शब्दवैभव साहित्यप्रेमी मंडळाचा अठ्ठाविसावा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. त्या निमित्ताने आयोजित मेळाव्यात ३० साहित्यिक सहभागी झाले होते. माझे वाचन-लेखन, आवडलेले पुस्तक या विषयांवर स्पर्धा घेण्यात आल्या. डॉ. शंतनू चिंधडे यांनी उद्घाटन केले.

★ धन फाउंडेशनला सारडा ॲवॉर्ड

समता आणि शिक्षण यासाठी देशव्यापी कार्य करणाऱ्या धन फाउंडेशन या

मदुराईतील स्वयंसेवी संस्थेचा 'सारडा इक्वल ॲपॉर्च्युनिटी' पुरस्कार देऊन नुकताच गौरव करण्यात आला. पुण्यातील सारडा इक्वल ॲपॉर्च्युनिटी फाउंडेशनतर्फे दर वर्षी हा पुरस्कार दिला जातो. साडेसात लाख रुपये रोख व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

★ डॉ. महाजन यांना 'बनहट्टी' पुरस्कार

डॉ. छाया महाजन यांना पुणे मराठी ग्रंथालयाचा राजेंद्र बनहट्टी पुरस्कार (पाच हजार रुपये रोख व सन्मानचिन्ह) 'राहिलो उपकारा इतुका' या कथासंग्रहाबद्दल देण्यात आला.

★ सुरेशकुमार वैराळकर यांना पाटणकर स्मृती पुरस्कार

''प्रेम व दुःख हा काव्याचा सर्वभाषी आत्मा आहे. या आत्म्याला कोणत्याही भाषेचे बंधन नसल्यामुळे काव्यातील भावना स्पष्ट व्यक्त होतात,'' असे मत ज्येष्ठ समीक्षक डॉ. अविनाश अवलगावकर यांनी व्यक्त केले.

'रंगत-संगत प्रतिष्ठान'चा २०१३चा भाऊसाहेब पाटणकर स्मृती पुरस्कार शाहीर सुरेशकुमार वैराळकर यांना रेणू गावसकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. अवलगावकर म्हणाले, ''मनातील भावनांची उत्कटता व ताकद यामुळे कवितेतील निखळपणा खळखळून वाहू लागतो. कवितेला वयाचे बंधन नसते आणि त्यामुळेच कवी हा चिरतरुण असतो.'' या वेळी कवयित्री स्वाती सामक, ॲड. प्रमोद आडकर, अंजली महागावकर, डॉ. अविनाश सांगोलेकर आदी उपस्थित होते.

★ भारत फोर्जला 'स्वॉर्ड ऑफ ऑनर'

भारत फोर्ज लि. या फोर्जिंग कंपनीला आरोग्य आणि सुरक्षा या व्यवस्थापकीय कार्यप्रणालींचा उत्कृष्ट पद्धतीने कारखान्यात वापर केल्याबद्दल ब्रिटिश सेफ्टी कौन्सिलकडून 'स्वॉर्ड ऑफ ऑनर' या आंतरराष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले. हा पुरस्कार भारत फोर्ज लि. चे. कार्यकारी संचालक बी.पी. कल्याणी यांनी लंडनमधील ऐतिहासिक गोल्डस्मिथ हॉलमध्ये नुकताच स्वीकारला. 'स्वॉर्ड ऑफ ऑनर' पुरस्कार संपूर्ण प्रकल्पातील उच्च दर्जाची आरोग्य व सुरक्षा कामगिरी याचे प्रतीक मानला जातो. हा पुरस्कार मिळविणारी भारत फोर्ज ही जगातील मोजक्या कंपन्यांपैकी एक आहे.

★ ऊर्जा संवर्धनाबद्दल 'महाऊर्जा'ला पुरस्कार

ऊर्जा संवर्धनासाठी केलेल्या प्रभावी कार्याबद्दल केंद्रीय ऊर्जा मंत्रालयातर्फे देण्यात येणारा राष्ट्रीय स्तरावरील प्रथम पुरस्कार महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण

(महाऊर्जा) या राज्य सरकारच्या संस्थेस प्राप्त झाला आहे. महाऊर्जाचे महासंचालक आनंद लिमये यांनी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला. या वेळी ऊर्जा राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार) ज्योतिरादित्य शिंदे उपस्थित होते.

ऊर्जा संवर्धनात विशेष कामगिरी करणाऱ्या घटकांना प्रोत्साहन देण्यासाठी हा पुरस्कार देण्यात येतो. ऊर्जा संवर्धन कार्यक्रमांतर्गत औद्योगिक क्षेत्र, व्यावसायिक क्षेत्र, सरकारी इमारती येथे ऊर्जा संवर्धन आणि ऊर्जा कार्यक्षमता योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.

★ 'बिआट्रिझ्स वॉर' चित्रपटाला सुवर्णमयूर

ऑस्ट्रेलिया व पूर्व तिमोर यांची संयुक्त निर्मिती असलेल्या 'बिआट्रिझ्स वॉर' या पोर्तुगीज चित्रपटाने भारताच्या ४४ व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (इफ्फी) सुवर्णमयूर व चाळीस लाख रुपयांचे पहिले बक्षीस जिंकले. कमलेश मुखर्जी यांच्या 'मेघे ढाका तारा' या चित्रपटाला दहा लाख रुपयांचा शताब्दी सिनेमा पुरस्कार प्राप्त झाला; तर अपुर पांचाली (अपूस साँग) चित्रपटाचे दिग्दर्शक कौशिक गांगुली यांना उत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून घोषित करण्यात आले.

बॉंड गर्ल मिशेल यो, दिग्दर्शक रोहित शेट्टी, ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख, राजेश्वरी सचदेव, दक्षिणेतील युवा अभिनेते सुमंतकुमार, गिरीश मलिक आणि देशी-विदेशी तारकांबरोबर राज्यपाल भारत वीर वांच्छू, मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर, केंद्रीय माहिती व प्रसारण राज्यमंत्री मनीष तिवारी, आरोग्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर आदी उपस्थित होते.

ओनुर उन्लू दिग्दर्शित 'दाव गिल्डस्ट द इव्हन' या तुर्कस्तानच्या चित्रपटाला विशेष ज्युरी पुरस्कारादाखल रजतमयूर मिळाला. पोलंडच्या माग्दालिना बोकझार्स्का यांना उत्कृष्ट अभिनेत्री; तर 'ए प्लेस इन हेवन' या चित्रपटातील आलोन मोनी आबोटबॉल यांना उत्कृष्ट अभिनेत्याचे पुरस्कार देण्यात आले.

★ 'स्वरानंद'च्या पुरस्कारांचे वितरण

'संगीतामध्ये प्रावीण्य मिळवण्यासाठी कलाकारांना दीर्घकाळ साधना करावी लागते. त्याप्रमाणे संगीत ऐकणे ही सुद्धा एक कलाच असून, त्यासाठीही साधना करावी लागते', असे मत ज्येष्ठ शास्त्रीय गायिका डॉ. प्रभा अत्रे यांनी व्यक्त केले.

स्वरानंद प्रतिष्ठानतर्फे संगीतक्षेत्रातील योगदानासाठी विविध पुरस्कार प्रदान करण्यात आले.

संगीतकार आशिष मुजुमदार यांना केशवराव भोळे पुरस्कार, हार्मोनियमवादक डॉ. नरेंद्र चिपळूणकर यांना विजया गदगकर पुरस्कार, पार्श्वगायिका वैशाली सामंत यांना उषा वाघ पुरस्कार आणि गायक हेमंत पेंडसे यांना बृहस्पर्शी गायिका माणिक

वर्मा पुरस्काराने गौरविण्यात आले. स्वरानंद प्रतिष्ठानचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ गीतकार सुधीर मोघे, कार्यकारी विश्वस्त प्रा. प्रकाश भोंडे या वेळी उपस्थित होते. याच कार्यक्रमात शरद अनवलीकर, विश्वनाथ गायकवाड, लीला कानडे यांनाही सन्मानित करण्यात आले.

डॉ. अत्रे म्हणाल्या, 'संगीताचे सर्व प्रकार मला प्रिय आहेत. सुगम संगीत हे शास्त्रीय संगीताइतकेच कठीण आहे. प्रत्येक संगीत प्रकाराचे शास्त्र वेगळे आहे, प्रकृती वेगळी आहे, ते सादर करण्याची मानसिकताही वेगळी आहे. कोणताही संगीतप्रकार हलका नाही. त्यामुळे दीर्घसाधना करण्याबरोबरच इतर प्रकारांचा अभ्यास करणेही महत्त्वाचे आहे.'

पुरस्कारांनी कलाकारांची जबाबदारी वाढते. चांगल्या कामाने पुरस्कार चालून येतात. त्यासाठी धडपड करण्याची गरज नाही, असे पत्की यांनी सांगितले.

★ जन्मत:च अंगठा नसलेल्यांचे आधारवड - डॉ. प्रकाश कोतवाल यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार

दिल्लीतील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेतील अस्थिरोगशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश कोतवाल हे हातावरील शस्त्रक्रियेतील देशातले आघाडीचे शल्यचिकित्सक. त्यांनी हे नैपुण्य अमेरिकेतील केंटकी लुइव्हिलमधील हँड सर्जरीची संस्था आणि न्युयॉर्कमधील हॉस्पिटल फॉर स्पेशल सर्जरी येथे मिळविले. आठ वर्षांपूर्वी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या दोन्ही मनगटांवर शस्त्रक्रिया करून त्यांना हाताच्या बोटांवरील गमावलेले नियंत्रण डॉ. कोतवाल यांनी परत मिळवून दिले.

डॉ. कोतवाल यांचा जन्म ५ मे १९५१ रोजी जळगावमध्ये झाला. तीन भावंडांमध्ये ते थोरले! त्यांचे कुटुंब मध्य प्रदेशात स्थायिक झाले. इंदूरच्या महात्मा गांधी मेमोरियल मेडिकल कॉलेजमध्ये एमबीबीएस आणि अस्थिरोगशास्त्रात एमएस केले. इंदूरला शिकत असताना आत्या सुषमा आणि त्यांचे पती प्रभाकर संवत्सर यांचा मोठाच आधार मिळाल्याची कृतज्ञता ते व्यक्त करतात. १९७७ साली नोकरीच्या शोधात दिल्लीला आलेले डॉ. कोतवाल यांची सीनियर रेसिडेंट पदासाठी प्रतिष्ठेच्या अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेत अर्थात एम्समध्ये निवड झाली. ३६ वर्षांच्या प्रवासानंतर आता ते अस्थिरोगशास्त्र विभागाचे प्रमुख बनले आहेत. डॉ. कोतवाल यांनी या काळात भरपूर शैक्षणिक आणि संशोधनात्मक कार्य केले. त्यांनी अस्थिरोगशास्त्रावर दोन पुस्तके, विविध अभ्यासक्रमांसाठी २५ धडे तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्रकाशनांमध्ये सव्वाशेच्या आसपास संशोधनपूर्ण लेख लिहिले. मोडलेली हाडे जुळविण्यावर सतत संशोधन करणाऱ्या स्वित्झर्लंडच्या 'ए ओ फौंडेशन' या विश्वव्यापी संघटनेचे ते भारतातील विश्वस्त आहेत. जन्मत:च अंगठा नसलेल्या किंवा अपघातात अंगठा गमावलेल्या लोकांना मिळवून करण्याचे काम त्यांनी केले आहे. डॉ. कोतवाल यांना अलीकडेच

सर्वश्रेष्ठ संशोधनपर लेखासाठी दिल्या जाणाऱ्या अमेरिकेतील पॉल आर. मॅन्स्के पुरस्काराने गौरविण्यात आले. इंडियन मेडिकल असोसिएशन तसेच डॉ. एस. के. मुखर्जी स्मृती पुरस्काराचेही ते मानकरी ठरले. अंटार्क्टिका मोहिमेवर जाणाऱ्या पथकाची वैद्यकीय तपासणी आणि त्यांच्यासोबत जाणाऱ्या डॉक्टरांची निवड करण्याची जबाबदारी ते गेल्या पंधरा वर्षांपासून पार पाडत आहेत. देशात आणि परदेशात साडेचारशेहून आधिक वैज्ञानिक परिषदांमध्ये त्यांनी व्याख्याने दिली आहेत. नेपाळच्या बी. पी. कोईराला इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्समध्ये त्यांनी काही महिने प्राध्यापक म्हणून काम केले. राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या उपचारासाठी बनलेल्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकात, तसेच गेल्या आठ-दहा वर्षांपासून पंतप्रधान मनमोहन सिंग आणि उपराष्ट्रपती हमीद अन्सारी यांच्यावरील उपचारासाठीच्या डॉक्टरांच्या पथकात डॉ. कोतवाल यांचा समावेश आहे. देशातील अनेक बडे नेते आणि उच्चपदस्थांवर ते उपचार करीत असतात. रतलामसारख्या गावातून देशातील सर्वोत्तम इस्पितळात काम करण्याची मिळालेली संधी, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील असंख्य मान्यवरांशी झालेला संपर्क यामुळे आपल्या व्यावसायिक वाटचालीविषयी ते अत्यंत समधानी आहेत.

★ सुलोचना चव्हाण यांना 'मोहम्मद रफी पुरस्कार'

मोहम्मद रफी आर्ट फाउंडेशनच्या वतीने लावणी सम्राज्ञी सुलोचना चव्हाण यांना 'मोहम्मद रफी पुरस्कार' देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले. 'पुणेकरांनी दिलेले प्रेम, जिव्हाळा, आत्मीयता हा माझ्या आयुष्यातील अनमोल ठेवा आहे,' असे मनोगत त्यांनी या वेळी व्यक्त केले. या प्रसंगी पोलीस आयुक्त गुलाबराव पोळ, अपर पोलीस आयुक्त चंद्रशेखर दैठणकर, ज्येष्ठ व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर, भोई प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. मिलिंद भोई आदी उपस्थित होते. पुरस्कार सोहळ्याच्या निमित्ताने 'अंदाज-ए-रफी' या संगीत मैफलीचे आयोजन करण्यात आले होते.

★ किशोरी आमोणकर यांना पं. हरिप्रसाद चौरसिया पुरस्कार

भारतीय शास्त्रीय संगीतात दिलेल्या अमूल्य योगदानासाठी गानसरस्वती किशोरी आमोणकर यांना पंडित हरिप्रसाद चौरसिया 'गुरुकुल प्रतिष्ठान'च्या वतीने सातव्या बासरी उत्सवात प्रदान करण्यात आला. ५ जानेवारी रोजी ठाण्यात हा उत्सव साजरा झाला.

★ डॉ. प्रभा अत्रे यांना 'ऋग्वेदभूषण'

डॉ. प्रभा अत्रे यांना ऋग्वेदभूषण पुरस्कार (१० हजार रुपये रोख व मानपत्र) देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेचे अध्यक्ष डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांच्या हस्ते २९ डिसेंबरला देण्यात आला.

★ सुलभा देशपांडे यांना एकता गौरव पुरस्कार

चित्रपट आणि नाट्य क्षेत्रातील अतुलनीय कामगिरीबद्दल एकता कल्चरल अकादमीच्या वतीने यंदाचा एकता कला गौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री सुलभा देशपांडे यांना देण्यात आला. अभिनेते कमलेश सावंत, नृत्य-दिग्दर्शिका अर्चना पालेकर, पत्रकार देवदास मटाले, चित्रकार चंद्रकांत गणाचार्य, चित्रपट समीक्षक दिलीप ठाकूर, साहित्यिक नारायण लाळे, नाटककार जयंत पवार, पत्रकार भगवान निळे, कवी अशोक बागवे यांचीही पुरस्कारासाठी निवड झाली.

★ दिनेश गोसावी यांना आनंद अभ्यंकर पुरस्कार

नाटक, चित्रपट, दूरदर्शन मालिका आणि जाहिरात क्षेत्रामध्ये स्वत:ची ओळख निर्माण केलेले अभिनेते आनंद अभ्यंकर यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त 'आनंदरंग पुरस्कार' देण्यात आला. करमणूक क्षेत्रामध्ये पूर्ण वेळ काम करणाऱ्या आणि स्वत:ची कारकीर्द घडविण्यासाठी प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करीत सातत्याने परिश्रम घेत असलेल्या व्यक्तीला हा पुरस्कार देण्यात येणार आहे. २५ हजार रुपये, शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

जेमतेम शिक्षण असताना मामाबरोबर चित्रीकरणाच्या सेटवर यायचा... त्याच्यातील प्रामाणिकपणा पाहून अभिनेते आनंद अभ्यंकर यांनी 'पर्सनल बॉय' म्हणून त्यांची निवड केली. दहावीनंतर बारावीपर्यंत शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन दिले. सेटवर अनेक गोष्टी शिकत शिकत आता 'ऑप्टिमॅस्टिक प्रॉडक्शन' संस्थेचा 'असोसिएट एडिटर'... दिनेश गोसावी या युवकाचा प्रवास असा थक्क करणारा आहे. प्रतिकूलतेवर मात करून यश संपादन करणाऱ्या दिनेशला 'आनंद अभ्यंकर स्मृती आनंदरंग' पुरस्काराने गौरविण्यात आले.

★ गोपालकृष्णन, खन्ना यांना 'विशेष योगदान' पुरस्कार

भारतीय चित्रपटसृष्टीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल यंदा दिग्दर्शक अदूर अदूर गोपालकृष्णन व अभिनेते विनोद खन्ना यांना पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये 'विशेष योगदान पुरस्कार' देण्यात आला. याबरोबरच संगीत क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल संगीत दिग्दर्शक व गायक पं. हृदयनाथ मंगेशकर यांना 'एस. डी. बर्मन पुरस्कार' देण्यात आला.

राज्य सरकार व पुणे फिल्म फाउंडेशन यांच्यातर्फे नऊ ते सोळा जानेवारीदरम्यान 'पुणे आंतरराष्ट्रीय 'पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव साजरा झाला. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. इस्राईलचे दिग्दर्शक ॲमाज् गीताई यांच्या 'ॲना अरेबिया' या चित्रपटाने महोत्सवाचा प्रारंभ झाला. सात चित्रपटगृहांमधील अकरा पडद्यांवर दोनशेहून अधिक चित्रपट दाखविले गेले.

★ नरेंद्र दाभोलकर यांना मरणोत्तर सातारा भूषण पुरस्कार

आपल्यामध्ये भरपूर उणिवा आहेत, हे राजकारण्यांना दिसत नाही. फुले, शाहू, आंबेडकर यांच्या काळातील समाजसुधारणेतही आपण खूप मागे पडलो आहोत. त्यामुळेच जादूटोणा विरोधी कायदा मंजूर करताना राज्यकर्त्यांचा करंटेपणा, दिसून आला. त्यामुळे सध्या महाराष्ट्राला पुरोगामी म्हणणे ही सुद्धा अंधश्रद्धाच आहे, असे मत ज्येष्ठ नेते डॉ. एन. डी. पाटील यांनी व्यक्त केले.

रा. ना. गोडबोले ट्रस्टतर्फे डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना मरणोत्तर सातारा भूषण पुरस्कार देण्यात आला. खासदार हुसेन दलवाई यांच्या हस्ते ॲड. मुक्ता दाभोलकर-पटवर्धन यांनी पुरस्कार स्वीकारला. या प्रसंगी आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, ट्रस्टचे विश्वस्त अरुण गोडबोले, डॉ. अच्युत गोडबोले हे व्यासपीठावर उपस्थित होते.

डॉ. पाटील म्हणाले, ''दाभोलकर हे कायद्याने सुधारणा करणारे नव्हते, तर कार्यकर्त्यांना अंधश्रद्धा निर्मूलन करण्यासाठी ताकद मिळावी, यासाठी कायदा करण्यास आग्रही होते. मात्र, सत्ता टिकविण्यासाठी राज्यकर्ते हळवे झाल्याने राजकीय इच्छाशक्ती दाखवत नसल्याने १८ वर्षे कायदा मंजूर होण्यास वाट पाहावी लागली. कायद्याला विरोध करणारे बिल न वाचताच त्याला विरोध करत होते. त्यामुळेच कायद्यात धर्माविरोधात काही असेल तर कायदा होऊ देणार नाही, अशी भाषा बोलत होते. रहिमतपूर येथील डॉक्टरांच्या कार्यक्रमाला विरोध करण्याचे काम सनातनी शक्तीने केले होते. केवळ शासनाच्या भेकडपणामुळेच ही शक्ती वाढत आहे; परंतु आता कायद्यामुळे अंनिसच्या कार्यकर्त्यांना ताकद आली असून, विचारांची लढाई कायम राहील.''

★ शास्त्रज्ञ जॉनसिंघ यांना 'वसुंधरा सन्मान'

आठव्या किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात तमिळनाडू येथील ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. ए.जे.टी. जॉनसिंघ यांना 'वसुंधरा सन्मान', तर आबासाहेब गरवारे महाविद्यालयाच्या प्राध्यापिका, वनस्पतीतज्ज्ञ डॉ. हेमा साने यांना 'वसुंधरा जीवनगौरव' पुरस्काराने बालगंधर्व रंगमंदिरात २५ जानेवारीला गौरविले गेले.

किर्लोस्कर आणि वसुंधरा क्लबने हा महोत्सव १७ ते २५ जानेवारीदरम्यान बालगंधर्व रंगमंदिर, राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय येथे आयोजित केला होता. ५ आर स्मॉल एफर्ट, बिग डिफरन्स' हा महोत्सवाचा विषय होता. 'वसुंधरा वाचवा, तगवा आणि टिकवा' हा संदेश भावी पिढीपर्यंत पोचविणे हा त्याचा उद्देश होता.

वन्यजीव फिल्ममेकर आशिष चंडोला यांना आणि ईशान्य भारतातील 'हेल्प टुरिझम' संस्थेला 'वसुंधरा मित्र', कर्नाटकमधील बेल्लारी जिल्ह्यातील वनांमध्ये कार्यरत समद कोट्टर यांना 'वसुंधरा मित्र कार्यकर्ता', पर्यावरणावर लेखन करणारे अतुल देऊळगावकर (लातूर) यांना 'वसुंधरा इको जर्नालिस्ट', पक्षितज्ज्ञ डॉ. सतीश पांडे यांना 'वसुंधरा ग्रीन टीचर' पुरस्कार देण्यात आले.

★ आशा भोसले, सीएनआर राव यांना डॉक्टरेट

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. सी. एन. आर. राव यांना भारती विद्यापीठातर्फे 'डॉक्टर ऑफ सायन्स' तसेच, ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना 'डॉक्टर ऑफ लेटर्स' हा मानद सन्मान विद्यापीठाच्या १५ व्या पदवीदान समारंभामध्ये देण्यात आला.

विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. जी. जयकुमार यांच्यासह विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता आणि ज्येष्ठ पदाधिकारी या वेळी उपस्थित होते. डॉ. राव यांनी विज्ञान आणि संशोधनाच्या क्षेत्रात केलेले कार्य लक्षात घेत, तर भोसले यांनी संगीताच्या क्षेत्रात राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर केलेली कामगिरी विचारात घेऊन त्यांना विद्यापीठातर्फे सन्मानित करण्यात आले आहे. केंद्रिय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विद्यापीठाचे कुलपती डॉ. पतंगराव कदम कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

★ जंगमवाड यांना शिक्षणरत्न पुरस्कार

पुणे विद्यापीठाचे माजी जनसंपर्क अधिकारी गंगाधर ग्यानोबा जंगमवाड यांना दिल्ली येथील 'ग्लोबल सोसायटी फॉर हेल्थ ॲण्ड एज्युकेशनल ग्रोथ' या संस्थेचा भारत शिक्षणरत्न पुरस्कार नुकताच जाहीर झाला. जंगमवाड यांनी विद्यापीठाच्या जनसंपर्क विभागात ३३ वर्षे सेवा केली आहे. पुणे विद्यापीठ कर्मचारी संघ, अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन समिती, राजा भगीरथी ट्रस्ट या संस्थांसोबत त्यांनी काम केले आहे.

★ मीरा चंद्रशेखर यांना 'चेरी पुरस्कार'

भारताच्या डॉ. मीरा चंद्रशेखर यांना बायलर विद्यापीठाचा २०१४ चा प्रतिष्ठेचा 'रॉबर्ट फॉस्टर चेरी' पुरस्कार जाहीर झाला आहे. २ लाख ५० हजार अमेरिकन डॉलर रकमेचा हा पुरस्कार अमेरिकेतील सर्वांत मोठा शिक्षक पुरस्कार आहे. डॉ. चंद्रशेखर भौतिकशास्त्र विषयाच्या प्राध्यापक असून, त्या खगोलशास्त्रही शिकवतात.

★ फडके, माडगूळकर यांना 'रोटरी सहवास'चा पुरस्कार

रोटरी क्लब ऑफ पुणे सहवासतर्फे देण्यात येणारा 'व्यावसायिक गुणवत्ता पुरस्कार' संगीतकार श्रीधर फडके, संगीत व अनुबोधपट निर्मिती क्षेत्रातील लेखक दिग्दर्शक आनंद माडगूळकर आणि स्वरानंद प्रतिष्ठानचे प्रकाश भोंडे यांना २६ जानेवारी रोजी गणेश कला क्रीडा मंच येथे शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे व रोटरीचे प्रांतपाल डॉ. दीपक शिकारपूर यांच्या हस्ते देण्यात आले.

■

नवे कोरे

फॉरवर्ड अँड डिलिट

लेखिका

स्वाती चांदोरकर

‘बदला घेण्यासाठी रक्तलांच्छितच घटना
घडायला हव्यात असं कोण म्हणतं?
आणि जर तसं म्हणत असतील,
तर ते चूक, अयोग्य.
शांत मनाने आणि अक्कलहुशारीनेही
बदला घेता येतो.
आणि मग तो गुन्हा ठरत नाही.
ठरवता येत नाही.
गुन्हेगार सापडतच नाही.’

अमोलिका मनातल्या मनात
असाच काहीसा विचार करत होती,
आणि नरोत्तम हॉस्पिटलच्या
आयसीयूमध्ये शेवटच्या घटका
मोजत होता....

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, सासवड

अध्यक्षीय भाषणातील मुक्त चिंतन

अध्यक्ष फ. मुं. शिंदे यांनी आपल्या लेखी भाषणात समाज, साहित्य, पुरोगामित्व यांच्या समोरील आव्हानांचा तपशीलवारपणे ऊहापोह केला आहे. परंपरावादी, प्रतिगामी, अंधश्रद्धेला पाठबळ देणाऱ्या शक्तींवर आसूड ओढत पुरोगामी साहित्यिकांसमोरील आव्हानांचा उल्लेख केला आहे. त्यांच्या 'मुक्तचिंतना'चा संपादित अंश...

साहित्याला स्वत:पेक्षा वेगळं, अलग, निराळं मानता येत नाही. साहित्याच्या अंगी माणुसकीचा थोर धागा असतो. एखाद्या संमेलनासाठी, साहित्यिक उपक्रमासाठी आपण आनंदानं, उत्साहानं एकत्रित येतो, जमतो, त्यामागची प्रेरणाही याच धाग्यानं बांधलेली असते. माणुसकीचा हा थोर धागा आपल्या जीवनातून निसटता कामा नये. माणसाची विवेकशीलता वाढीला लावणं हा पुरोगामी विचाराचा, साहित्याचा आणि पुरोगामी चळवळींचा प्रधान हेतू आहे. त्या हेतूंचे संस्कार जाणिवेनं करावे लागतात. अंधश्रद्धेचं आक्रमण समूळ परतवणं, नाहीसं करणं सोपं नसतं. निरंतर जागराचाच हा विषय आहे. अंधश्रद्धेची प्रभावक्षेत्रं रुंदावत जाणं ही नव्या सहस्त्रकाची चिंता आहे. वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था, धर्मांधता विविध प्रकारच्या विषमतेला घट्ट, मजबूत करीत आहेत. अशा प्रकारची अंधश्रद्धा योजकतापूर्वक रुजविण्याचे प्रयत्न दिवसाढवळ्या होत आहेत. या कारस्थानांचा सामना पुरोगमी साहित्यिकांना सदैव करावा लागणार आहे. पुरोगामी साहित्याच्या, चळवळीच्या दृष्टीनं अनेक नवी आव्हानं उभी आहेत. खरं आव्हान आहे, आत्मपरीक्षणाचं, आत्मटीकेचं. पुरोगामी हा पिंडच असावा लागतो. 'पुरोगामी' ही त्या पिंडाची धार्मिकता असावी लागते. त्या प्रकृतीचं चिंतन हीच पुरोगामी परिवर्तनाची प्रक्रिया असते. ती कशी तोलून धरता येईल, याचं निरुपण ही नव्या काळाची गरज आहे.

साहित्याला जात नसते, साहित्य साहित्य असतं इत्यादी म्हणणं जातीतल्या मनाचे प्रश्न असतात. काही अपवाद वगळता इथल्या साहित्यानं समतेचा उच्चार केल्याचं दिसत नाही. स्त्री-पुरुष समता जिथं डाचते तिथं बाकीचा प्रश्नच नसतो. तर्क नसलेले प्रश्न विचारणं हे प्रतिगाम्यांचं वैशिष्ट्यच असतं. त्यात आपण गुंतू नये. आपला प्रवाह खळाळून वाहता ठेवावा. ग्रामीण साहित्याला, दलित साहित्याला, आदिवासी, कामगार, स्त्रीवादी साहित्याला सुरुवातीला विरोध झाला आहे; तसंच

चालत आलेल्या अभ्यासक्रमात नवीन वाङ्मयप्रवाहातल्या साहित्याचा समावेश करण्याला विरोध झाला. असं साहित्य समाविष्ट झाल्यानं अभ्यासक्रमाचा दर्जा घसरला म्हणून ओरड झाली. हे सगळं सनातन वृत्तीतून, सत्तालोलुपतेतून होत आलं. नव्यास विरोध हा सुप्तसंघर्ष असतो. इंग्रजी, माहिती तंत्रज्ञान यांना होणारा विरोध, मराठीच्या भविष्याचा प्रश्न हे यातूनच उपस्थित केले जातात. पोटापाण्याचे प्रश्न ज्ञानानं, स्पर्धेनंच सुटतील हे खेड्याला कळतं. म्हणूनच इंग्रजी, आयटी याचं स्वागत झालं. राहता राहिला मराठीचा म्हणजे भाषेचा प्रश्न. ज्यांना मराठीच्या भवितव्याचा प्रश्न पडत आला आहे, त्याचं मराठीशी सापत्न नातं आहे. ज्ञानदेवांना, तुकोबांना, समर्थांना, शाहिरांना जसा मराठीचा कधी प्रश्न पडला नाही, तसा तो आजही खेड्यात कुणाला पडलेला नाही. काळजी वाहणारांनीच मराठीला मरणकळा आणली. त्यांच्यापुरती खेडी आहेत तोवर मराठी आहे; त्यामुळे शहरानं चिंतेत पडायचं कारण नाही. शासनाला फक्त सत्तेची भाषा कळते. मराठीशिवाय सत्ता नाही हे दाखवून देण्याची धमक फक्त खेड्यांत आहे. त्याची चिंता कोणी वाहायची? लेखक बक्षिसं घेऊन, सन्मान स्वीकारून मोकळे होतात आणि मराठीला चिंता पडावी अशा मोकाट समूहात सामील होतात, ही खरी भाषिक चिंता आहे.

भीत भीत का होईना, खरं बोलण्याचा धीटपणा स्वातंत्र्यानं दिलाच पाहिजे. सत्तेला ही परवडणारी गोष्ट नसते; कारण स्वत:च्या खेळासाठी स्वातंत्र्य दावणीला बांधण्यात सत्ता सफल झालेली असते. सत्तामुखी स्वातंत्र्य अशी वर्तमान स्थिती आहे. हाकेला ओ द्यावी हाच विद्रोहाचा निर्मळ हेतू असतो. म्हणून साहित्याचं आवाहन लोकांनीही जागरूकपणानं झेलण्याची प्राथमिक गरज असते. त्यामुळेच बांधिलकी स्वीकारलेल्या तमाम लेखकाचं कार्य वाटतं तितकं सोपं नाही. काळाशी आणि काळासारख्या माणसांशी चाललेला हा साहित्याचा सामना असतो. तो अखंड अविरत आहे. तुकाराम त्यातून सुटला नाही; फुले-आंबेडकर सुटले नाहीत; आजचे दलित, पुरोगामी लेख म्हणूनच त्यातून कसे सुटतील? 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' असंच एकूण चित्र आहे. लेखकाची संघर्षशीलता सर्जनाची दात्री असते. हा संघर्ष विचारी आणि संवेदनशील मनाचा असतो. संवेदनाच नष्ट होऊ लागल्या तर संघर्ष पेटणार कसा? संघर्ष पेटू नये असं ज्या कुणा दुरात्म्यांना वाटत असतं ते सत्ताधारी बनून संवेदना संपवण्याच्या आकर्षक मोहिमा आखत असतात. लेखक - कवींना नेमक्या याच क्षणाचं भान ठेवावं लागतं. प्रतिभेला पारखं आणि पोरकं करणारी प्रलोभनं पसरवून दुरून दिपवून टाकणारं सोन्याचं पाणी चढविण्याची चाणाक्ष चतुराई आतून ओळखावी लागते. असा अंतर्बाह्य संघर्ष लेखकाला सचेत ठेवत असतो आणि त्यातूनच त्याला आत्मतेज असलेलं आंतरिक बळ प्राप्त होतं. लेखकाच्या सशक्ततेचं ते नाव असतं.

स्वातंत्र्य हा साहित्याचा अंतिम धर्म असतो. मग त्यातला आशय कोणताही

असो. ज्या साहित्यात आशय नसतो तिथं स्वातंत्र्याचा साधा स्पर्शही दुर्मीळ असतो. साहित्याच्या आशयाचे आधार कोण? तुम्ही-आम्हीच! आधार नसलेल्या साहित्यात लोक सापडणं कठीणच. म्हणूनच ध्यास आणि ध्येय लोकजीवनाच्या आशयात परिवर्तन आणण्याचा प्रयत्न लेखक करीत असतो. स्वातंत्र्य त्याचा गाभा असतो. म्हणूनच स्वातंत्र्याला टाळून कोणत्याही साहित्याची व्याख्या करता येत नाही. माणसानं माणसावर प्रेम करावं, ही साहित्याचीच नव्हे, तर जगण्याची शिकवण असते. खरं तर ती प्राणिमात्रांची परम प्रतिज्ञा असावी लागते. प्रतिज्ञा ही विवेकाची वाणी असते. प्रतिज्ञेला विचाराचं, आचाराचं कणखर सूत्र असतं. प्रतिज्ञेची संहिता ही सार्थवाह असते. पसायदान ही प्रार्थना खरी; तथापि प्रतिज्ञेचीही प्रतिबद्धता त्यात आहे. प्रतिज्ञेत एक सामाजिक खबर असते आणि असं असूनही दुर्दैवानं कधी अनिवार्य गरज म्हणून, तर कधी औपचारिकता म्हणून आम्ही प्रतिज्ञा उच्चारत असतो. प्रतिज्ञेस क्रमिक बनवलं की तिचंही प्राक्तनही परास्त होतं. माणसाचं आणि प्रतिज्ञेचं सारखंच होऊन बसलं आहे. माणसं नितळ नाहीत आणि प्रतिज्ञेत बळ नाही. शोकांतिका सारखीच! चिंतनाची भूमी अशाच एखाद्या शल्यातून सापडत असते. साहित्य त्या शल्याच्या शोधार्थ भटकत गेलं पाहिजे हे वर्तमान वचन आहे. शोधार्थ चाललेल्या भटकंतीतच मग माणूस भेटतो. माणसाचा शोध आणि बोध वाटतो तितका सोपा नसतो.

अस्वस्थ होणं हे जिवंतपणाचं लक्षण असतं, असं आपण म्हणत असलो, तरी या अस्वस्थतेला अनुभवणारा माणूस मात्र स्वत:च्या कोशातून; तसंच परंपरांच्या पाशातून विमुक्त होऊन माणुसकीचा भटका नाही बनू शकला. खरी अस्वस्थता इथं असायला हवी. व्यवस्था तसं घडू देत नाही. जात पोसणं हा व्यवस्थेचा पोक्तपणा असतो. जन्माचे मवाळ कसोटीच्या क्षणी जातीनं बहाल बनतात. प्रबोधनाची प्रमेयं पराभूत होतात. परिवर्तनाची पोपटपंची अखेर पोकळ ठरते. मूल्यांची भाषा मुकेपणाचं सोंग घेते. अशा अनुभवाची अस्वस्थता प्रकट करणारं साहित्यही दिङ्मूढ होऊन जातं. हे असं का, हा प्रश्न अंतर्मनाला पडावा लागतो. तो तसा पडतोही आणि जिरून जातो. अशा शोकांतिका समान साहत आला आहे. सोसणारा समाजही माणसांचाच असतो. दगडाला देवपण देणारा माणूस दगडाहून दगड होऊन पडला आहे. जातिधर्मानं शिलान्यास केलेल्या शिलेचा उद्धार अवघड असतो. त्यातूनही अवघड म्हणजे शहाणीसुरती माणसं वेडेपणा करत आहेत. विद्वान विकृत वागत आहे. प्रतिभावंत प्रकोप घडवत आहे. वैज्ञानिक वांशिकता वेचत आहे. एक कमालीचं निलाजरेपण निदर्शनास येत आहे. जातीला तेही भूषणावह वाटावं यात नवल नाही. ही जातीची जंगलं अभयारण्य म्हणून घोषित होत आहेत. बदमाशीत आणि बनवाबनवीत बुद्धिवंतांनी स्वत:ला बांधून घ्यावं, ही त्या अभयारण्यातील हिंस्रता असते. त्याचा भेद करण्याची प्रतिज्ञा घेऊन निर्माण होणाऱ्या साहित्याला बळ मिळणं गरजेचं आहे.

साहित्याची सकलता समाजानंच सांभाळली आहे. फक्त आपल्याच कलेची

सकलता जपणारे कलाकलानं कलह वाढवत असतात. साहित्याला विकल करीत असतात. दुस्वासाची दुरितं पेरत जातात. कधी प्रांताच्या नावानं, कधी प्रमेयाच्या नावानं. कधी पुरस्काराच्या नावानं! बहुतेक वेळा तर परमेश्वराच्याच नावानं दुस्वासाची दुरितं पेरली जातात; आणि अखेर जातीजवळ येऊन मग त्याची परिपूर्ती होते. सर्व प्रवाह पोटात घेऊन साहित्याची सकलता समृद्ध झालेली असते. साहित्याची सकलता सोवळी नसते; त्या सकलतेत समाजाचं साहस असतं, सार्थ समंजसपणा असतो. संमेलनाच्या सोहळ्याचं नातं त्या सकलतेशी जोडलेलं असतं...

☞ साहित्यातील वादांना भिडण्याची तयारी ठेवा

सासवड येथील ८७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन शरद पवार यांच्या हस्ते झाले. संमेलनाचे अध्यक्ष प्रा.फ.मुं. शिंदे, मावळते अध्यक्ष डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, साहित्य महामंडळ अध्यक्षा डॉ. माधवी वैद्य, माजी संमेलनाध्यक्ष मधू मंगेश कर्णिक, ज्येष्ठ कवी ना. धों. महानोर, स्वागताध्यक्ष विजय कोलते, निमंत्रक रावसाहेब पवार, खासदार सुप्रिया सुळे, माजी खासदार रामदास आठवले, आमदार विजय शिवतारे, नगराध्यक्षा नीलिमा चौखंडे, पुण्याच्या महापौर चंचला कोद्रे या वेळी उपस्थित होते.

''अभिरुची स्वातंत्र्य जपण्यासाठी समांतर सेन्सॉरशिपला धाडसाने सामोरे जा. आपले विचार साहित्यातून प्रकट झाल्यावर वाद उभे राहिल्यास त्याला भिडण्याची तयारी ठेवा.'' असे केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी लेखकांना बजावले. तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले तरी लिखित साहित्य असलेली पुस्तके आनंद देत राहतील, हा दिलासाही त्यांनी लेखकांना दिला.

अभिव्यक्ती स्वातंत्र्य जपण्यासाठी साहित्यिकांनी समांतर सेन्सॉरशिपला धाडसाने सामोरे जावे. सखाराम बाइंडर, घाशीराम, कोतवाल अशा कलाकृतींनाही विरोध झाला. वादाला सामोरे जावे लागले. परंतु, आज याच कलाकृती वस्तुपाठ म्हणून शिकविल्या जातात. अशा विषयात काळ हाच न्यायाधीश म्हणून उभा असतो याकडे पवार यांनी लक्ष वेधले. जे विकले जाते, तेच पिकविले जाते. परंतु, अशा काळातही गेल्या काही वर्षांत आशयप्रधान साहित्याची निर्मिती होत आहे आणि त्याला चांगला प्रतिसादही मिळत आहे, असे ते म्हणाले. बदलत्या, नव्या तंत्रज्ञानाच्या काळात पुस्तकांचे काय होणार, असा प्रश्न विचारला जातो. मात्र मला त्याची चिंता वाटत नाही. जोवर कागदाचा वास आहे, पानोपानांचा स्पर्श आहे आणि डोळ्यांना सुखावणारे मुद्रण आहे, तोवर पुस्तके आनंद देतच राहतील, असे त्यांनी नमूद केले. साहित्य संमेलने ही समाजाची सांस्कृतिक गरज आहे. उत्सवांप्रमाणेच संमेलनांमधूनही सामाजिक भावना सुदृढ होते, असे त्यानी सांगितले.

■



५वी आवृत्ती

डोंगरी ते दुबई

मूळ लेखिका : **एस. हुसेन झैदी**

अनुवाद : **अशोक पाध्ये**

किंमत : ३५०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.

मुंबईवर ६० वर्षे गुंडांच्या टोळ्या चालवणाऱ्या माफियांचा प्रभाव होता. त्यात हाजी मस्तान, करीम लाला, वरदराजन मुदलियार, छोटा राजन, अबू सालेम होते. पण या सर्वांवर कडी केली ती दाऊदने. या सर्वांची तपशिलवार माहिती काढून अभ्यासपूर्वक त्यांच्यावर लिहिलेले हे पहिलेच पुस्तक आहे. एका शाळकरी पोरापासून टोळीच्या दादापर्यंत दाऊदची कशी उत्क्रांती होत गेली, दाऊदने पोलिसांचा उपयोग करून आपल्या प्रतिस्पर्ध्यांना कसे निपटले आणि शेवटी तो मुंबई पोलीसांचा एकमेव सूडकरी कसा बनला, याचे वर्णन यात आहे.

हे पुस्तक म्हणजे मुंबईतील गुन्हेगारीचा एक अधिकृत इतिहास आहे. एका पोलीस कॉन्स्टेबलचा मुलगा दाऊद याने पठाणांच्या टोळीला कसे निपटले, पहिली सुपारी कशी दिली गेली. व शेवटी दुबईहून दाऊद पाकिस्तानात कसा पळून गेला, याचे थरारक वर्णन या पुस्तकात आले आहे.

७वी आवृत्ती

आभाळ

शंकर पाटील

किंमत : १००/-रु. । पोस्टेज :३०/-रु.



शंकर पाटील यांचं ग्रामीण 'माणूस' समजावून घेण्याचं कसब दाखवणारे कथासंग्रह नव्या स्वरूपात

शंकर पाटील हे नाव मराठी वाचकाच्या मनात एक स्थान मिळवून आहे. त्यांचे चटपटीत संवाद आणि भाषेचा गावरान बाज लेखनाला ताजेपणा आणतात. निसर्गातले विविध बदल, सामाजिक परिवर्तन याचा ग्रामीण संस्कृतीवर होणारा परिणाम ते फार चपखलपणे आपल्या कथांमधून मांडतात. आठवणी या भरून आलेल्या आभाळासारख्या असतात. मग पावसाचा हलकासा शिडकावा असो वा झोडपणारा धुवाधार पाऊस असो, माणसागणिक त्याचा अर्थ बदलत जातो. पावसाचा एकसुरी निनाद कानात घुमू लागला की मग भरून आलेल्या आभाळात दाही दिशा लुप्त होतात.

सातारा ग्रंथमहोत्सव

★ सातारा ग्रंथमहोत्सवाचा शानदार प्रारंभ

या देशातील सहा लाख खेड्यांतील लोक 'भारतात', तर महानगरातील लोक 'इंडिया'त राहतात. ग्रामीण जनतेत वाचनांक वाढतोय, हे आशादायी चित्र आहे. या देशाचा विकास भारतच करणार आहे. म्हणून ग्रंथमहोत्सवासारख्या उपक्रमांची गरज आहे, असे मत पुण्याच्या सिंबायोसिस विद्यापीठाचे कुलपती डॉ. शां. ब. मुजुमदार यांनी व्यक्त केले.

१५ व्या सातारा ग्रंथमहोत्सवाचा ९ जानेवारी रोजी जिल्हा परिषद मैदानावर शानदार प्रारंभ झाला. त्याचे उद्‌घाटन ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य रा. रं. बोराडे यांच्या हस्ते झाले. डॉ. मुजुमदार अध्यक्षस्थानी होते. 'साहित्यिक डॉ. नरेंद्र दाभोलकर नगरी' असे परिसरास नाव देण्यात आले आहे. व्यासपीठावर या वेळी जिल्हाधिकारी डॉ. रामास्वामी एन., जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिजित बांगर, ग्रंथमहोत्सव समितीचे अध्यक्ष शंकर सारडा, ज्येष्ठ पत्रकार डॉ. विश्वास मेहेंदळे, आदी उपस्थित होते.

डॉ. मुजुमदार म्हणाले, ''भारत आणि इंडिया अशी या देशाची विभागणी झाली आहे. महानगरांतील युवकांची वाचनाची सवय कमी झाली आहे. इंटरनेट, सोशल मीडियाच्या माध्यमातून होईल तेवढेच त्यांचे वाचन असते. या देशातील सहा लाख खेड्यांचा विकास होत नाही, तोपर्यंत आपला विकास होणार नाही. केवळ आर्थिक विकास महत्त्वाचा नाही. येथील माणसांचा वाचनांक (आरक्सू) वाढला पाहिजे. तो ग्रामीण भागात वाढतो आहे, भारत जागा होतोय; परंतु इंडिया अजून निद्रिस्त आहे. देशाचा विकास भारतच करणार आहे. म्हणून सातारा जिल्हा ग्रंथमहोत्सवासारखे उपक्रम सर्वत्र राबविले गेले पाहिजेत.''

ज्ञानी माणूस सर्वशक्तिमान असतो. या ज्ञानाची प्राप्ती वाचनातून होते. एखाद्याची सांस्कृतिक उंची वाचनांकावरून मोजली जाते. ग्रंथवाचनातून वाचनांक वाढेल आणि व्यक्तिमत्त्व विकसित होईल, असेही त्यांनी सांगितले.

उद्‌घाटक रा. रं. बोराडे म्हणाले, ''शिक्षक विद्यार्थ्यांना आत्मशोध घेण्यास शिकवतो. आज हा शोध घेण्याची प्रक्रिया नाकारली जात असल्याची परिस्थिती शाळांतून दिसते. वाङ्‌मय निर्मिती हे करिअर का होऊ शकत नाही? सृजनाकडे आमचे पुरेसे लक्ष नाही. ऑलिंपिकमध्ये पदक मिळावे असे वाटणे चुकीचे नाही; परंतु बुकर, नोबेल ही पारितोषिके मराठी लेखकास मिळावी अशी अपेक्षा आपण का

ठेवत नाही? समाजाचे प्रश्न अस्वस्थ करतील, तितकी धार आमच्या साहित्याला येईल.''

डॉ. दाभोलकर यांच्या खुनाची घटना मराठी मनाला काळिमा फासणारी आहे. त्यांचा विचार पुढे नेणे ही श्रद्धांजली ठरेल, असे आपण म्हणतो; परंतु अशा प्रकारचा विचार पुढे नेऊ इच्छिणाऱ्या माणसांचे पुढे काय याचाही तटस्थपणे विचार होणे आवश्यक आहे, असेही बोराडे यांनी सांगितले.

प्रारंभी रा. रं. बोराडे व डॉ. मुजुमदार यांचा ग्रंथमहोत्सव समितीच्या वतीने मानपत्र. शाल व मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. जिल्हाधिकारी डॉ. रामास्वामी एन. यांनी महोत्सवास शुभेच्छा व्यक्त केल्या. या वेळी जिल्हा परिषदेचे कृषी समितीचे सभापती किरण साबळे-पाटील, समितीचे कार्यवाह, प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे, शिरीष चिटणीस, शिक्षणाधिकारी मकरंद गोंधळी, प्रवीण अहिरे, तसेच समितीचे सदस्य उपस्थित होते.

★ 'बदलणारा भोवताल आणि त्याचे विविध माध्यमांवर पडणारे प्रतिबिंब' परिसंवाद

भोवताल असहिष्णू झाला असून तो बिघडला आहे. त्याविषयी बोलले तर त्रास होईल म्हणून त्याचे प्रतिबिंब माध्यमांमध्ये उमटत नाही. शिवाय माध्यमे लोकानुनयी होत असल्याने समाजाचे प्रतिबिंब उमटवले तरी त्याला तिखट-मीठ लावले जात आहे. परंतु, लोकांसमोर सत्य पोचविणे हेच माध्यमांचे प्रथम कर्तव्य असून ते वास्तव स्वरूपात मांडावे, असा सूर ग्रंथमहोत्सवातील 'बदलणारा भोवताल आणि त्याचे विविध माध्यमांवर पडणारे प्रतिबिंब'या परिसंवादात उमटला. ज्येष्ठ साहित्यिक महावीर जोंधळे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) मकरंद गोंधळी, नाट्यकलाकार सचिन मोटे, पटकथाकार नितीन दीक्षित, किरण माने, कवी बबलू वडार, शिरीष चिटणीस यांनी परिसंवादात भाग घेतला. श्री. जोंधळे म्हणाले, ''ग्लोबल नीती वर्तमानपत्रांनी स्वीकारली असली तरी धनाढ्य शक्तींमुळे वर्तमानपत्रांमध्ये व्यक्तिपूजा होऊ लागली आहे. रस्त्यावरील जगण्यापेक्षा तुरुंगातील आरोपींच्या पुरविण्या सजविल्या जाऊ लागल्या आहेत. ६० टक्केच सत्यदर्शन होत आहे. फायद्यांवर पाणी सोडल्याशिवाय वर्तमानपत्र, साहित्यांमध्ये समाजातील खरी परिस्थिती मांडली जाणार नाही.''

श्री. मोटे म्हणाले, ''सध्याची माध्यमे लोकानुनयी झाली असून, प्रेक्षकांना हवे तेच देत आहेत. 'प्रॉडक्ट' विकण्यासाठी 'टीआरपी' वाढविला जात आहे. शिवाय वस्तुस्थिती मांडण्याचा प्रयत्न केला तरी न्यूज चॅनेल्सवर हल्लेही होत आहेत. त्यातून जातीयवादी, उच्च विद्याविभूषितही आता त्यांचे रूप उघडे केले तर विरोध करू लागले आहेत, हे थांबले पाहिजे.''

श्री. दीक्षित म्हणाले, ''माध्यमे ही प्रेक्षकांची पसंती ठरवून विषय हातात घेत आहेत. दिल्ली सामूहिक बलात्कार प्रकरणी सातत्याने चित्रण केले जात होते. परंतु, शेतमजुरी करणाऱ्या मुलीवर असा प्रसंग ओढवला तर त्याचे चित्रणही केले जात नाही. माध्यमांनी असे न करता लोकांसमोर नग्न सत्यच मांडावे.''

बबलू वडार म्हणाले, ''जग बदलले असून 'इंटरनेट'मुळे विश्व हातात आलेले आहे. तरीही त्यावर अद्याप भाकरी देणारी 'वेबसाइट' निर्माण झाली नाही, ही वस्तुस्थिती मांडणारे कवी समाजात आहेत. त्याही पुढे जात कवी, साहित्यिकांनी शहरांच्या मर्यादा ओलांडून साहित्य पुढे नेले पाहिजे.''

जग सुंदर आहे, हे अनुभवण्यासाठी तुम्ही माध्यमातील काय घ्यायचे, काय नाही घ्यायचे, हे ठरविले पाहिजे, असे श्री. गोंधळी यांनी सांगितले. श्री. चिटणीस यांनी माध्यमे केवळ मोठ्या शहरात पोचली आहेत, ती मध्यम शहरांत पोचली नाहीत. त्यामुळे निमशहरी भागातील भोवताल माध्यमांतून उमटत नाही. अशी खंत व्यक्त केली. डॉ. राजेंद्र माने यांनी सूत्रसंचालन केले. प्रदीप कांबळे यानी आभार मानले.

★ आंदोलनात साहित्याचे स्थान महत्त्वाचे

संयुक्त महाराष्ट्र चळवळ असो वा सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने केलेली आंदोलने असोत, त्यांना वैचारिक अधिष्ठान देण्याचे काम साहित्याने केले आहे. गेल्या तीस ते चाळीस वर्षांत महाराष्ट्रात झालेल्या विविध सामाजिक आंदोलनांना साहित्यनिर्मितीने ऊर्जा दिली. वैचारिक भान दिले, त्यामुळे सामाजिक आंदोलनांना साहित्याचे स्थान हे महत्वाचे आहे, असा सूर या परिसंवादात उमटला.

सातारा जिल्हा ग्रंथमहोत्सवाच्या एका सत्रात 'सामाजिक आंदोलनात साहित्याचे स्थान काय?' हा परिसंवादाचा विषय होता. अध्यक्षस्थानी 'लोकमत'चे मुख्य संपादक विजय कुवळेकर होते. तर ज्येष्ठ साहित्यिक डॉ. दत्तप्रसाद दाभोलकर, गझलकार प्रदीप निफाडकर, यशवंत पाटणे, डॉ. विश्वास मेहेंदळे, डॉ. रणधीर शिंदे यांनी परिसंवादात भाग घेतला.

डॉ. दत्तप्रसाद दाभोलकर म्हणाले, ''साहित्य हा शून्याचा व्यापार आहे. त्याच्या पुढे एक ठेवायचा की मागे ठेवायचा यावर साहित्याचे मूल्य ठरते. कारण साहित्यातून चळवळी निर्माण होत नाहीत, तर चळवळी साहित्याचा वापर करून घेतात. साहित्यातून उपेक्षा. उपहासाने माणसाला कापले जाते. नाहीतर कापून आपल्या चौकटीत बसविले जाते.''

डॉ. विश्वास मेहेंदळे म्हणाले, कवी सुरेश भट यांनी उष:काल होता होता, कवी दामले यांनी एक तुतारी द्या मज आणुनी या कवितातून सामाजिक आंदोलनांना ऊर्जा दिली.

यशवंत पाटणे म्हणाले, ''समकालीन सामाजिक स्थितीला गती देते, प्रश्नांशी लढण्यासाठी ताकद देते ते श्रेष्ठ साहित्य असते. डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी संत तुकाराम, महात्मा फुले यांच्या विचारांनी अंधश्रद्धाविरोधी चळवळ उभारली. ज्ञानाचा प्रकाश देणारे साहित्य आंदोलनाला गती देते.''

अध्यक्षीय भाषणात विजय कुवळेकर म्हणाले, ''एकूणच सामाजिक आंदोलनात साहित्याचे स्थान महत्त्वाचे आहे, असाच सूर प्रत्येकाने व्यक्त केला. मात्र, गेल्या तीस वर्षात सामाजिक आंदोलनांची तीव्रता कमी होताना दिसत आहे. समूहापेक्षा वैयक्तिक भावना वाढली आहे. आंदोलनातील सक्रिय सहभाग कमी होताना दिसतो आहे. हा बदल साहित्यामुळे नाही. साहित्य प्रभावी आहे; पण साहित्याचे संदर्भ तेच लागतील असे नाही.''

''लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, शाहीर अमर शेख यांनी कवन, तमाशा, पोवाडे या माध्यमातून चळवळ जिवंत ठेवण्याचे काम केले. झुलवा, चौंडकं या साहित्यकृतींनी देवदासींना जगण्याचं भान दिलं तर इंद्रजित भालेराव यांनी आपल्या लेखणीने शेतकऱ्यांना अन्यायाला प्रतिकार करण्याचं नवं बळ दिलं. मात्र, जागतिकीकरणाने मोठे प्रश्न निर्माण झालेत, याबाबत कोणती भूमिका घ्यावी, या संभ्रमात लेखक आहेत.'' सामान्य माणसाला आता साहित्यात स्थान दिसत नाही,' अशी खंत प्रा. शिंदेंनी व्यक्त केली.

★ माहितीवर विचारांचे संस्कार जरुरीचे

माहिती तंत्रज्ञानाच्या युगात सर्व काही संगणकाच्या एका क्लिकवर उपलब्ध होते; पण ही माहिती संगणकात भरण्याचे काम मानवच करतो. त्यामुळे माहिती तंत्रज्ञानाच्या या युगातही मानवी मेंदूला पर्याय नाही. **माहिती म्हणजे ज्ञान नव्हे. माहितीवर विचारांचे संस्कार केल्याशिवाय तिचे ज्ञानात रूपांतर होत नाही,** असे मत लोकसाहित्याच्या अभ्यासक डॉ. तारा भवाळकर यांनी व्यक्त केले.

सातारा ग्रंथमहोत्सवाच्या समारोपप्रसंगी डॉ. भवाळकर, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. एन. जे. पवार, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अरुणादेवी पिसाळ, जिल्हाधिकारी डॉ. रामास्वामी एन., ग्रंथ महोत्सव समितीचे अध्यक्ष शंकर सारडा, कार्यवाह प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे, शिरीष चिटणीस, शिक्षणाधिकारी मकरंद गोंधळी, उपशिक्षणाधिकारी तानाजी नरळे, डॉ. नरेंद्र माने यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. भवाळकर म्हणाल्या, ''संशोधन व साहित्य ही जगण्याची दोन टोके आहेत. जीवनात घडते त्याचे प्रतिबिंब साहित्यात येते. साहित्य म्हणजे साधना होय. केवळ शब्दांनी बांधलेली घटना नसून माणसाच्या जगण्याचे तत्त्वज्ञान आहे. वाटेल ते देऊ; पण आमचे ज्ञानोबा, तुकोबा देणार नाही. आपण इतिहास वाचतो; पण त्याचे संदर्भ अमलात आणत नाही. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात पुस्तक कोणीही वाचत नाही. मग

पुस्तकांचा उपयोग काय. लेखनातून अक्षरांशी नाते जोडले जाते. भाषा आपल्याला बहुअंगाने व्यक्त होण्याची संधी देते. त्यामुळेच आपल्या बोली भाषेतूनच संस्कार मिळतात. स्वातंत्र्योत्तर काळात दलित, ग्रामीण, भटक्या विमुक्त जातींचे साहित्य समृद्ध होत गेले. मराठीचा प्राध्यापक साहित्यिक असतोच असे नाही. नरेंद्र दाभोलकर येथेच आहेत. तुमच्या आमच्या श्वासात आहेत. तुम्ही सर्व जण त्यांचे वारसदार असून, त्यांच्या विचारांची शिदोरी पुढे घेऊन जाण्याची जबाबदारी तुमच्या सर्वांवर आहे.''

एन. जे. पवार म्हणाले, ''पुस्तके, ग्रंथ हे आपले मित्र आहेत. ते अडचणींच्या सर्व प्रसंगांना सामोरे जाताना प्रेरित करतात. ते व्यक्तीच्या विकासाचे प्रभावी शस्त्र आहे. चिरंतन विचार करण्याचे साधन म्हणजे ग्रंथ महोत्सव होय. ग्रंथ हे सर्वांगीण विकासाचे साधन आहे.

डॉ. रामास्वामी एन. म्हणाले, ''साताऱ्याचा ग्रंथ महोत्सव हा इतर जिल्ह्यांना प्रेरणादायी असून, यापुढेही दीर्घकाल हा महोत्सव बहरत राहील.'' या वेळी अरुणादेवी पिसाळ, यशवंत पाटणे यांचीही भाषणे झाली.

■

आगामी

विज्ञानातील रंजकता

डी.एस. इटोकर

विज्ञान हा विषय अतिशय रंजक आहे. त्याच्या अभ्यासाने ज्ञान तर वाढतेच, पण आपल्या दैनंदिन जीवनात ज्या अनेक घटना घडतात, त्यांचे आकलनसुद्धा होते. अशीच या विज्ञानातील रंजकता जाणून घ्या, साध्या तत्त्वावर आधारलेल्या खेळणी किंवा उपकरणांमधून...!

अपयशाची चव चाखत नाही तोपर्यंत यशाची किंमत कळत नाही

ग्रंथ महोत्सवात उलगडला सचिन पिळगावकरांच्या पन्नास वर्षाच्या कारकिर्दीचा प्रवास

ग्रंथ महोत्सवात सचिन पिळगावकर यांची मुलाखत अभिनेता राहुल सोलापूरकर यांनी घेतली. या मुलाखतीत सचिनने आपल्या पन्नास वर्षाच्या अभिनय कारकिर्दीचा प्रवास उलगडून दाखवला.



अवघा साडेचार वर्षाच्या असल्यापासून मी चित्रपटात काम करण्यास सुरुवात केली. खेळण्याबागडण्याच्या वयात माझ्या हातात चित्रपटाचा खेळ व कॅमेऱ्याचे खेळणे आले. मी कधीही कोणत्याही दुकानात जाऊन खेळणे घेतले नाही. आयुष्यात प्रत्येक गोष्ट अपघाताने घडते. त्याप्रमाणे हे सर्व झाले. मी चित्रपटसृष्टीत आलो त्यावेळी प्रेरणा वगैरे कळण्याचे माझे वय नव्हते, असे सांगून सचिन पुढे म्हणाला, चित्रपट सृष्टी ही माझी फॅमिली आहे. येथील प्रत्येक चांगल्या वाईट गोष्टीसाठी मीच जबाबदार असणार आहे. काही वाईट घडले तर मी जबाबदारी टाळणार नाही. दुसऱ्याने जरी एखादी गोष्ट वाईट केली तरी मी त्याबाबत माफी मागेन. सचिन पिळगावकर कधीही एकटा नाही, सर्वांना बरोबर घेऊन पुढे जात आहे, अगदी प्रेक्षकांनाही मी अभिनयापुरता मर्यादित राहिलो नाही. पुढे वाटचाल करत राहिलो. या वाटचालीत अपयशही भरपूर मिळाले. एखादा अपमानही डोक्यात सलतो. मात्र ते सगळे बाजूला ठेवून आपल्याला पुढे वाटचाल करावी लागते. १९६३ मध्ये मी चित्रपटात काम केले. त्यानंतर सहा वर्षांनी आपल्या वडिलांनी चित्रपट काढल्याचा उल्लेखही त्याने आवर्जून केला.

मी मनोरंजन करणारा व्यावसायिक कलाकार आहे. निवृत्तीनंतर पुस्तक लिहिले असते तर ते मोठे झाले असते आणि कदाचित कोणी वाचलेही नसते आणि एवढ्या

लवकर त्या पुस्तकाची आवृत्ती संपली असती का, असा सवाल करून सचिन पुढे म्हणाला, लोकांना आनंद देण्यासाठी पुस्तक लिहिले. खऱ्याचे खोटे करून लिहिणे मला आवडत नाही. मी पहिल्यापासून इमानाने जगत आहे आणि पुढेही जगत राहणार आहे. मला पुढे प्रवास सुरू ठेवताना मागे वळून पहायची इच्छा नाही. माझा इतिहास प्रेक्षकांच्या हाती ठेवून मी पुढे वाटचाल करणार आहे. आता माझी पाटी कोरी झाली आहे. माझ्या इतिहासाचा आता तुम्ही विचार करायचा. मी करणार नाही.

१९७५ हे वर्ष माझ्यासाठी सुवर्णवर्ष ठरले आहे. यावर्षी चार चित्रपट ब्लॉकबस्टर ठरले. त्यातील दोन सिनेमात मी काम केले होते. त्यामध्ये शोले, गीत गाता चल, दीवार आणि जय संतोषी माँ या चित्रपटांचा समावेश आहे. वर्षभर अनेक चित्रपट रसिकांना त्याची तिकीटेही मिळाली नाहीत, असे सांगून त्याने अशी ही बनवाबनवी हा एकच चित्रपट आपण हिंदीवरून घेतला असल्याचे सांगितले. मी काम करत होतो त्याकाळात लोक दुसऱ्याला भरभरून द्यायचे. आजच्या काळात लोक दुसऱ्याला द्यायला घाबरतात. त्यामुळे मी झोळी पसरून भरभरून घेत गेलो आणि शिकत गेलो. आजही मी शिकतो आहे आणि पुढेही मी शिकत राहणार आहे. लवकरच मी डिजिटल तंत्रज्ञानाचा पंधरा दिवसाचा कोर्सही करणार आहे.

सचिन तेंडुलकरविषयी बोलताना सचिन म्हणाला, सचिन फार मोठा माणूस आहे. तो किती नम्र आहे! कदाचित मी त्याच्या जागेवर असतो तर तेवढा नम्र राहिलो नसतो. मी त्याला खूप मानतो. माझ्या पुस्तकाचे प्रकाशन त्याच्या हस्ते झाले कारण मला एका मराठी माणसाच्याच हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करायचे होते. अमिताभ बच्चनही कार्यक्रमाला होते. ते खूपच मोठे आहेत. त्यांच्याविषयी मला खूप आदर आहे. मात्र मराठीचे साहित्य असल्याने मराठी माणसाच्याच हातून त्याचे प्रकाशन व्हावे, ही माझी भूमिका होती. कोणी मिळाले नसते तर कदाचित मी माझ्या आईच्या हस्तेही पुस्तकाचे प्रकाशन केले असते. ग. दि. माडगुळकर यांच्या मांडीवर बसून मी पटकथेचा पहिला धड गिरवला. मीनाकुमारींनी मला सलग दोन वर्षे उर्दू शिकवले. कदाचित त्या मला भेटल्या नसत्या तर मी अपूर्ण राहिलो असतो. राजाभाऊ परांजपे, ऋषिकेश मुखर्जी, आर. डी. बर्मन, संजीवकुमार, बलराज साहनी, अशोक सराफ आणि सुप्रिया पिळगावकर यांच्याकडूनही मला खूप शिकायला मिळाले. अगदी माझ्या मुलीनेही मला खूप शिकवले आहे. अमिताभ बच्चन यांच्याशी मी खूप स्पष्टपणे बोलत असल्याने ते माझ्यापासून दूरच राहिले. त्याउलट जयाजी मला खूप जवळच्या मानतात, असा बच्चन कुटुंबियांशी असलेला ऋणानुबंधही त्यांनी उलगडून दाखवला.

शोले चित्रपटातील एक आठवण त्यांनी सांगितली. या चित्रपटात गब्बरसिंगची भूमिका अमजदखानने साकारली. तो त्या चित्रपटात नवोदित होता. धर्मेंद्रला उद्देशून एका संवादात त्याला कुत्ते म्हणायचे होते. त्यावर धर्मेंद्रने आक्षेप घेतला. तो मला कुत्ते म्हणू शकत नाही, असे त्यांनी सांगितले. त्यामुळे जवळपास अडीच तास चित्रीकरण थांबले होते. अखेर धर्मेंद्रनेच त्यातून तोडगा काढला. त्यांनी सांगितले की एक संवाद असा आहे की तेथे मी त्यांना कुत्ते म्हणू शकतो आणि त्यांनी म्हटले. चित्रपट लेखकापेक्षा धर्मेंद्रनी जो बदल केला तो आजही लक्षात राहतो. बसंती इन कुत्तोंके सामने मत नाचना, असा तो संवाद आजही प्रसिद्ध आहे, अशी आठवणही त्यांनी सांगितली.

मुलाखत सुरू असतानाच हर्षला गायकवाड ही लहान मुलगी स्टेजवर चढून एका कोपऱ्यातून सचिनचा फोटो काढत होती. सचिनने तिला पाहिले आणि कोण आहे तिकडे, इकडे ये, अशी हाक मारली. त्यावेळी कार्यक्रम स्थळी एकदम शांतता पसरली. मात्र लगेचच त्याने तिला जवळ बोलावून इथून फोटो काढ, असे सांगितले. त्यावर तिनेही धीटपणा दाखवत समोरून सचिनचा फोटो काढला. त्यानंतर राहुल सोलापूरकरनेही सचिन व हर्षलाचा एकत्र फोटो काढला. त्यावर इतक्या लांबून माझा फोटो कसा येणार, असे मला वाटले. मला रहावले नाही म्हणून मी तिला जवळ बोलवून फोटो काढायला लावला, असे सचिनने सांगितले. त्यावर सचिनची नजर किती तीक्ष्ण आहे, असा शेरा राहुल सोलापूरकरने मारला. त्यानंतर हा धागा पकडत सचिनने मला आणखी काम करायचे आहे. त्यामुळे पुढच्या पिढीच्या मोबाईलमध्येही मला माझा फोटो हवा आहे, असे सांगून पुढच्या पिढीतील प्रेक्षकांवरही त्याची नजर असल्याचे स्पष्ट केले.

मुलाखतीत सचिनने आपली पत्नी, आई, मुलगी, बहीण यांच्याविषयीच्या आठवणीही सांगितल्या. संपूर्ण मुलाखतीचा आनंद लुटण्यासाठी मोठ्या संख्येने सातारकर रसिक आले होते. मुलाखत झाल्यानंतर सचिनला उभे राहून रसिकांनी मानवंदना दिली. यावेळी सचिनला ग्रंथ महोत्सव समितीचे अध्यक्ष शंकर सारडा, प्रमुख कार्यवाह शिरीष चिटणीस यांनी मानपत्र दिले. मानपत्राचे वाचन प्रदीप कांबळे यांनी केले.

यावेळी नगराध्यक्षा सौ. सुजाता राजेमहाडिक, उपनगराध्यक्ष अमोल मोहिते, सातारा पत्रकार संघाचे अध्यक्ष विनोद कुलकर्णी, मेहता पब्लिकेशनचे सुनील मेहता, ग्रंथ महोत्सव समितीचे साहेबराव होळ, डॉ. राजेंद्र माने, नगरसेविका हेमांगी जोशी व मान्यवर उपस्थित होते.

■

युगंधर

मृत्युंजकार शिवाजी सावंतांनी दाखविलेले युगंधर श्रीकृष्णाचे विराट वैभव

लेखक : **शिवाजी सावंत**

पृष्ठे ९६८। किंमत ४८० रु. । पोस्टेज ३०रु./ सभासदांना सवलतीत

'मृत्युंजकार' म्हणून शिवाजी सावंत यांचे गेल्या काही वर्षांत मराठी वाचकांनी उदंड कौतुक केले. कर्ण या व्यक्तिरेखेला कालोचित असा संदर्भ देऊन कुल-गुण-कर्तृत्व-पराक्रम श्रेष्ठ असूनही ज्याला त्याचे श्रेय जन्मभर नाकारले गेले अशा उपेक्षित, घायाळ, नियतीने ताडलेल्या, शापित व्यक्तिमत्त्वाचा प्रतिनिधी म्हणून कर्णाला त्यांनी सहानुभूतीच्या आणि महात्मतेच्या तेजोवलयात पेश केले. त्यामुळे महाभारताचेच समकालीन भावभावनांशी मिळतेजुळते एक वेगळे दर्शन वाचकांना घडले. मृत्युंजयच्या अलंकारिक शब्दवर्षावाने खांडेकरांच्या भाषावैभवावर प्रेम करणाऱ्या वाचकांना चटपटीत सुभाषितवजा वाक्यांची नवी खाणच खुली झाल्यासारखे वाटले. सावंतांनी रंगविलेला कर्ण हा महाभारताच्या चिकित्सक अभ्यासकांना फारसा पटला नाही. स्वामी वरदानंद (पूर्वाश्रमीचे अनंतराव आठवले) यांच्यासारखे विद्वान त्यावर दंड थोपटून आक्षेप घेत राहिले; परंतु महारथी कर्णाचे हे उपेक्षिताच्या वेदनाव्यथा आत्मीयतेने मांडणारे मनोगत जनसामान्यांच्या मनाला खोलवर भिडणारे वाटले. हा सर्वांत ज्येष्ठ कुंतीपुत्र. आपल्या जन्माचे रहस्य प्रकट झाल्याने त्याच्यावर जणू आकाश कोसळते, त्याच्या रथाचे चाक मोक्याच्या वेळी जमिनीत रुतते आणि आपल्या पराक्रमाच्या श्रेयापासून त्याला वंचित व्हावे लागते. 'मृत्युंजय'चे हे दर्शन मराठी वाचकांनाच नव्हे; उत्तर हिंदी भाषकांनाही चित्ताकर्षक वाटले. आजही ते बेस्टसेलर आहे. १९९६ साली म्हणजे प्रथम प्रसिद्धीनंतर तीस वर्षांनी मूर्तिदेवी पुरस्कार मृत्युंजयला मिळाला.

त्यानंतर सावंतांनी छत्रपती संभाजींच्या जीवनावर 'छावा' ही कादंबरी लिहिली (१९८०); लढत व संघर्ष ही विखे पाटील आणि मनोहर कोतवाल यांच्या चरित्रांची कामे अर्थलाभाच्या भावनेतूनच सावंतांनी पार पाडली. साहजिकच 'मृत्युंजय' 'छावा' नंतर त्यांच्या लेखनक्षेत्रातील पराक्रमाचे खरे दर्शन 'युगंधर' मध्येच व्हावे, अशी चोखंदळ सावंतभक्तांची मनोमन प्रार्थना होती. ती प्रार्थना सफल झाली आहे, असे म्हणायला हरकत नाही. गेली तीस वर्षे हा विषय त्यांच्या डोक्यात होता आणि सहा-सात-वर्षे लेखन-चिंतन चालू होते. त्यामुळे या दीर्घ परिश्रमातून साकार झालेली साडेनऊशे पृष्ठांची ही कृती अपेक्षापूर्तता करणारी आहे, ही बाब महत्त्वाची ठरतेच.

कोल्हापूरच्या ग्रामीण परिसराचे कलम

'मृत्युंजय' प्रमाणेच 'युगंधर'च्या निमित्तानेही सावंतांनी सबंध महाभारताचेच एकसूत्री दर्शन घडविले आहे; परंतु येथे केंद्रस्थानी महारथी कर्ण नाही तर पराक्रमी, मुत्सद्दी, युगंधर श्रीकृष्ण आहे. सावंतांनी हा आपला श्रीकृष्ण बराच समकालीन बनवला आहे. आपल्या दुर्मिळ रंगसूत्रांबद्दल बोलणारा, प्रदूषणाबद्दल बोलणारा हा देवकीपुत्र कृष्ण गोकुळात यशोदेच्या छत्राखाली तिचा पुत्र म्हणून,

गवळ्याचा पोर म्हणून वाढतो. कोल्हापूर परिसराची डूब या ग्रामीण जीवनाच्या चित्रणाला सावंत देतात, 'सर्व प्रकारच्या प्रदूषणांपासून दूर' गोकुळात कृषिवलापासून सुवर्णकार, काष्ठकार, उपलेपक, रजक, धीवर, कुंभकार, लोहकार, चर्मकार अशा अठरापगड जातीही गुण्यागोविंदानं नांदत होत्या... उभ्या गोकुळाला वेळूचं व मेसकाठ्याचं, सागाच्या खांबांना रामेठ्याच्या सालींच्या बांधांनी करकचून आवळलेले भक्कम संरक्षक कुंपण होतं. वाघ, सिंह, कोल्हे, लांडगे, तरस या हिंस्र वनचरांपासून आम्हा गोपांच्या प्राणप्रिय गोधनाचं रक्षण करण्याची दक्षता होती ती! त्याशिवाय गोधनाच्या संरक्षणाचा अधिक भार होता तो कुत्र्यांवर... प्रमुख संरक्षक कुंपणाला उगवतीला एक व माळवतीला एक अशी दोन भक्कम व उंचच उंच लाकडी महाद्वारं होती... किंकर वृक्षाच्या टणक, टिकाऊ लाकडांची, दोन-तीन पुरुष उंचीची होती ती!... या दोन्ही महाद्वारांना खांबासारखे गोल, कोरीव व प्रचंड अडणे होते. रात्रीच्या रहदारीसाठी छोटा दिंडी दरवाजा वापरला जाई. त्याची करकर स्पष्ट ऐकू येई... गोकुळात मध्यभागी वेगवेगळ्या गल्लीबोळांची वसाहत होती... घरं साधीच-मातीची, स्वच्छ व कौलारू होती... भिंती कावेनं सारवलेल्या. त्यावर चुनकळीनं चितारलेली कासेच्या पुष्ट गाईंची... खिल्लारांची चित्रं होती... प्रत्येक घरात हटकून दहीलोण्यासाठी सात-आठ वाकाची शिंकाळी होती... माझे बाबा नंदबाबा... माझे आठ काका... त्यांच्या आठ स्त्रिया म्हणजे आठ काकू... बलरामदादा... वयानं माझ्यापेक्षा थोडा मोठा. तांबूसगोर, बाळसेदार, दाट जावळाचा, पटकन संतापणारा, तसाच चटकन निवळणारा. (पृष्ठ ६-१०) आम्ही सावत्रबंधू, यशोदामातेला आम्ही दोघं आदरानं थोरली म्हणत असू. साहजिकच रोहिणीमाता 'धाकटी' यासारखे तपशील वाचताना हे चार-पाच हजार वर्षांपूर्वीच्या ग्रामापेक्षा आजच्या एखाद्या संस्थानी गावाचे चित्रच वाटते. बलराम हा दादा, कृष्णाला धाकल्या म्हणून संबोधतो. बहीण एकानंगा हिला गोकुळात सोडून जाताना कृष्ण तिची समजूत काढतो, ''या राधेबरोबर तू अशीच परत गेलीस तर मी तुला एक गोड जम्माडी भेट देईन... हं घे... एकेऽ पटकन माझी एक गोड पापी घे आणि निघ बघू माघारी...''(६०)

युगंधरच्या लेखनासाठीही सावंतांनी मृत्युंजयसारखेच पात्रमुखी निवेदनतंत्र वापरले आहे. सर्व आत्मनिवेदन श्रीकृष्णानेच करावे, अशी मूळ कल्पना. परंतु त्यामुळे पुढे लेखन अडू लागले. तेव्हा कुसुमाग्रजांनीच त्यांना मृत्युंजयाचा फॉर्म पुन्हा वापरण्याचा सल्ला दिला. त्या आकृतिबंधात आणखी दहा कादंबऱ्या महाभारतावर तुम्ही लिहू शकता, असे सांगून युंगधर पूर्ण करण्यास सुचवले. तेव्हा श्रीकृष्णाशी संबंधित अशा रुक्मिणी (पृष्ठे २१५-३६०), दारुक (३६१-४७८), द्रौपदी (१७९-५८८), अर्जुन (५८९-६७०), सात्यकी (६७१-८२०) आणि उद्धव (८२१-९४८) या व्यक्तींच्या आत्मनिवेदनातून युगंधराच्या आयुष्यातले वेगवेगळे

टप्पे दाखवण्याचा निर्णय घेऊन, वेगाने सावंतांनी कादंबरीचे लेखन पूर्ण केले.

समकालीन संदर्भ

युगंधरच्या प्रारंभीच्या भागात श्रीकृष्णाचे आत्मनिवेदन आहे. काळाच्या आजच्या टप्प्यावर उभं राहून, पाच हजार वर्षांपूर्वीच्या घटनांबद्दल त्याला मनमोकळे व मनसोक्त बोलायचे आहे. ''बोलायला मी तयार आहे आणि तुम्हीही ऐकायला उत्सुक आहात.'' फक्त कुठल्या नात्यानं आणि कसं बोलायचं हा प्रश्न त्याला पडलेला आहे. देव्हाऱ्यात केवळ पूजा करून चालावा असा नुसता देव करून टाकल्याबद्दल त्याची थोडी तक्रार आहे. तसे न मानता तुमच्या मनातला अच्युत म्हणून समजावे, अशी त्याची अपेक्षा आहे. आपल्या जीवनपटावर पाच हजार वर्षांत अनेक पुटं चढलेली आहेत, ती भावुकतेनं चढवण्यात आली असली तरी ती सर्व खरवडून काढायची आहेत. त्यासाठी तर्कशुद्ध निर्दोष उत्तरं शोधायची आहेत, परखड भाषेत खरं तेच बोलायची जन्मजात खोड आपल्याला आहे, असा सावंतांच्या या युगंधरांचा दावा आहे. गीता म्हणजे कठिणातल्या कठीण प्रश्नांची सोपी रसाळ उत्तरे, असे त्याचे प्रतिपादन आहे. वयाच्या एकशेएकोणीसाव्या वर्षी त्याचा उंचनिंच निळसर सावळा देह, डेरेदार अश्वत्थ वृक्षाच्या खाली विसावलेला आहे, उजव्या पायाच्या त्याच्या चक्रवर्ती गुलाबी तळव्यात जरा नामक व्याधाने सोडलेला बाण रुतलेला आहे आणि त्या तळव्यातून टपकणाऱ्या उष्ण रक्ताचे थारोळे जमिनीवर पसरले आहे. त्या रक्तधारांनी त्याचा स्मृतिकोश फुटून, त्यातून स्मृतींच्या आवेगी चैतन्याने भरलेल्या धारा मर्मबंधातल्या ठेवींना भिडतात, अशी प्रस्तावना करून श्रीकृष्ण आपल्या गोकुळातल्या आठवणींपासून आपले मनोगत सुरू करतो, अशी मांडणी सावंतांनी केली आहे.

भविष्य

कृष्णाच्या निवेदनातून गोकुळ-वृंदावनातले बालपण, नंदबाबाचे कुटुंब, तेथील जनजीवन, यांचे घरेलू चित्र प्रथम उभे केले जाते. ते एखाद्या आधुनिक ग्रामीण वाड्यातल्या एकत्र कुटुंबासारखेच आहे. 'हे गोकुळ होतं दुरडीतल्या कवडीदाट दह्याच्या लोटक्यासारखं.' 'येथील प्रत्येक माणूस हा प्रेमाचा एक निकोप आणि रसवंत कंदच होता. भावमधानं शिगोशिग टिच्चून भरलेला.' (पृष्ठ ९) बलरामदादा, कृष्ण आणि बहीण एकानंगा या तिघांचे 'त्रिकूट' आजोबा चित्रसेनांभोवती घुटमळत असे. 'बाबा, थोरली, धाकली, आठ काका-काकू, चुलत भावंडे यांनी गजबजलेलं हे अभिरभानवंशीय वैश्य जातीचे गोपकुटुंब. कृष्णाचे मुरलीवादन, गोपगोपींचे उत्सव यांचे तपशील देऊन वास्तुशास्त्रज्ञ गर्गमुनींनी वर्तविलेले भविष्य सावंत देतात. ''हा सुपुत्र न्यायाचा, धर्माचा पक्ष रक्षण्यासाठी जीवनभर दक्ष कर्म करील...

एक प्रचंड महायुद्ध खेळवील. याचा हितोपदेश मानवजातीला मार्गदर्शक ठरेल. तो चिंरतन, युगंधर ठरेल... माता, महामाता, पत्नी, कन्या, नात, स्नुषा, भगिनी, आत्या, काका, मामी, मावशी, सखी, सेविका अशा नात्यांना नवा अर्थ विशद करील. स्त्रीला हा एक शाश्वत निसर्गतत्त्व म्हणून गौरवील... कुटुंबवत्सल व भावसमृद्ध... हा जलतत्त्वाचा अधिकारी... याचे सदेह गोकुळात नांदणे हाच एक चमत्कार आहे. तो अखंड भ्रमंती करील, चक्रवर्ती युगकर्ता होईल. तो योगयोगेश्वर आहे... सर्वार्थाने विभूतिपुरुष, पूर्ण पुरुष... प्रेमयोग, अनासक्ती व विसर्जन योग हा याचा स्थायीभाव असेल. निर्दोष कर्म करूनही फलमुक्त निर्लेप राहील. वासुदेव, अच्युत उपाधीपर्यंत जाईल,'' असे त्याचे भावी जीवन व त्यामागचे सूत्र गर्गमुनी स्पष्ट करतात.

इडा ही कुलदेवता, गोकुळात गोधनाला चारण्यासाठी नेणे, गोपदीक्षा विधी, पेंद्या इत्यादी सवंगडी, गोपाळकाला, खेळ, हुतूतू, आट्यापाट्या, लगोऱ्या, ह्यामा, आंधळी कोशिंबिर इत्यादी. वाळूची शिवप्रतिमा करून तिचे केलेले पूजन, राधेची भेट, केवलीनंद काकांनी आखाड्यात नेऊन दिलेले मल्लविद्येचे धडे, सर्प मर्दन, इंद्रोत्सव बंद करून इंद्रपर्वताचे गोवर्धन पर्वत असे केलेले नामांतर, कोजागिरीची रासलीला, अक्रूराबरोबर केलेली कंसाच्या राजधानीची म्हणजे मथुरेची यात्रा, कंसाचा वध, मातापित्यांची मुक्तता, कंसपुत्राला केलेला राज्याभिषेक, राजपुरोहित गर्गमुनींनी कृष्णाचे उपनयन विधीनंतर केलेले श्रीकृष्ण असे नामकरण, बलरामाचे डिंभकाशी मल्लयुद्ध, सांदिपनी आश्रमातले अध्ययन, (८५-१०९), सहाध्यायी सुदाम, कुंडलिनी जागृतीचा सांख्ययोग, दारुकाने आणलेल्या राजरथाचे चार धवलशुभ्र अश्व, मथुरेतील स्वागत, धाकलीच्या कन्येचे नामकरण, सुभद्रा, गुरुपुत्र दत्ताच मुक्ततेसाठी शंखासुरावर पश्चिम सागरी भागात जाऊन केलेला हल्ला (१२०-१२४), दैवतकाचा राजा ककुदिक्मन याने आपली कन्या रेवती हिचे बलरामाशी लावून दिलेले लग्न (१२५), कंठातील वैजयंतीमाला, पांचजन्य शंख, यांच्या जोडीला आचार्यांनी श्रीकृष्णाला दिलेले अजितजय धनुष्य (१२६), मथुरा सोडून जाण्याची श्रीकृष्णाने केलेली घोषणा (१३२), दक्षिणेकडचा प्रवास, दंडकारण्य, महाबळेश्वरजवळच्या भृगू आश्रमात मुक्काम (१३५), गोमंतकातून परतताना परशुरामांनी श्रीकृष्णाला दिलेले सुदर्शन चक्र (१४८), करवीरचा पंचगंगा परिसर-जुलमी शृगालाचा वध करून शृगालपुत्र शक्रदेवाला दिलेले राजपद (१५२-५३), विदर्भाच्या सीमेवरून दंडकारण्यमार्गे मथुरेला आगमन (१५४), शिशुपालाच्या मातेने यादवांची माहेरवाशीण म्हणून शिशुपालाला अभय देण्याची केलेली प्रार्थना (१५८), शंभर अपराध सहन करण्याचे कृष्णाने तिला दिलेले अभिवचन (१५९), रुक्मिणीच्या स्वयंवराचे आमंत्रण नसतानाही कौंडिण्यपुरला जाण्याचा निर्णय, कालजवनाचा बंदोबस्त (१८०-८१), कुरुक्षेत्रावर पाच पांडवांची प्रथम भेट (१७१-७६), वसुदेवाचा राज्यभिषेक, सुधर्मा राजसभा (१८९-१९७), द्वारांची नावे (शुद्धाक्ष, ऐंद्र, पुष्पदंत व भल्लात) (१९६-

९७), कौंडिण्यपूराला जाऊन कलेले रुक्मिणीहरण (२००-२१२), रुक्मिणीच्या आगमनाने आपल्या जीवनातील रंगीबेरंगी संसारपर्व सुरू होऊन आपली भावद्वारका अंगभर खुलून आल्याची कृष्णाची कबुली (२१४) असे तपशील देऊन हे श्रीकृष्णाचे मनोगत थबकते.

रुक्मिणीचे मनोगत

रुक्मिणीच्या निवेदनातून द्वारेकतील वास्तव्याचे तपशील येतातच. पतीचा उल्लेख ती (आधुनिक सुधारलेल्या मध्यमवर्गीय पत्नीप्रमाणे) श्री असा करते. त्याबद्दलचे स्पष्टीकरणही आधीच देते. प्रथम पुत्र प्रद्युम्नाचा जन्म, स्यमंतक मणी प्रकरण, जांबवती, सत्यभामा वगैरे सवतींचे आगमन व त्यांच्याशी असणारे रुक्मिणीचे संबंध, ('ताई, एक मर्माचं तुम्हाला विचारायचं म्हणतेय. मेलं राहूनच जातंय' असा लाडिकपणा त्यात आहेच!) (पृष्ठ २४१), कुंतीदेवी व पाचही पांडव वारणावताच्या अरण्यात जळून ठार झाले, या वार्तेबद्दल श्रीकृष्णाने 'राजकीय डावपेच' अशी व्यक्त केलेली प्रतिक्रिया (२४३), द्रोणाचार्यांनी हस्तिनापुरी भरविलेल्या वासंतिक स्पर्धामध्ये सूतपुत्र कर्ण व क्षत्रिय अर्जुन यांच्यातील द्वंद्व कृपाचार्यांनी अवैध ठरविले (२४५), कामरूपातील, प्राग्जोतिषपूरच्या स्त्रियांनी कृष्णाची भेट घेऊन तेथील राजा नरकासुराने कारागृहात डांबलेल्या सोळा हजार स्त्रियांची मांडलेली कैफियत (२५१), नरकासुराचा वध व त्या स्त्रियांची मुक्तता, त्यांचा पत्नी म्हणून स्वीकार करून कृष्णाने दिलेले अभय (तुम्ही आजपासून द्वारकेच्या आहात, तिथं सासर म्हणून नव्हे तर माहेर म्हणून मुक्त मनानं रहा. तुमचंही पुनर्वसन केलं जाईल. तुम्ही मुक्त आहात. उन्नत मानेनं सांगा मी द्वारकाधीशांची पत्नी आहे म्हणून) (२६४-५). कोसलकन्या सत्या हिचे पाणिग्रहण (२७६). अमरनाथाच्या हिमलिंगाची यात्रा (२७०-२), द्वारकेला आगमन (२७३-७४), द्वारकेतील मोरपंखी दिवस (२७७), पाचही कृष्णपत्नींना झालेली मुले (२८५), बकासुराच्या वधाची वार्ता ऐकल्यावर हे भीमाचेच काम असा श्रीकृष्णाने दिलेला निर्वाळा (२८५), पांचाली स्वयंवर व द्रौपदीने पाचही पांडवांचा पती म्हणून केलेला स्वीकार, द्रौपदीने कृष्णाकडे प्रियसखी म्हणून मागितलेला आशीर्वाद (पाच पतींची पत्नी असूनसुद्धा पातिव्रत्याच्या अत्युच्य शिखरावर पोचशील तू... तुझं नाव प्रात:स्मरणीय राहील... तुम्ही सातही जण (कुंती, द्रौपदी, व पाच पांडव) अमर, अजर, अक्षयच रहाल) (२९८), बृहत्सेन कन्या लक्ष्मणा हिच्या स्वयंवरात मत्स्ययंत्रभेद तसे धृष्टकेतू केकयांची कन्या भद्रा हिच्याशी कृष्णाचे पाणिग्रहण (३८०), हस्तिनापूरला पांडवासह भेट देऊन, राज्यसभेत कौरव-पांडव यांच्यात राज्याच्या विभाजनाची केलेली मागणी व तिच्यावरील चर्चा (३१५-३९), खांडववन पांडवांच्या वाटणीला आल्यावर

त्याचे केलेले नंदनवन (३२०-३२७), सुदामा भेट (३२८-३३२), आंगिरस महाराजांचे आशीर्वाद (३३४), अर्जुनाचे आठवडाभर द्वारकेत वास्तव्य (३३८), युधिष्ठिराच्या राज्याभिषेकाचा इंद्रप्रस्थ येथील सोहळा (३४२-३४८), भीमाला बलरामदादाकडून प्राप्त झालेले मल्लविद्येचे शिक्षण (३५१), सुभद्राहरण (३५२-३५९), बलरामदादाचा संताप आवरणे (३६०). अशा प्रसंगांतून रुक्मिणीच्या मनोगतातून कथाभाग पुढे जातो, तसेच तिचे आपल्या सवतींशी असणारे संबंध आणि आपले महाराणीपदाचे भान, द्रौपदी-कुंती-पांडव यांच्याशी असलेले भावबंध आणि एकूणच त्या काळाचा राजकीय पट यांची झलक त्यातून दिसते.

दारुक हा सारथी- अश्वपारख करण्यात प्रवीण असून, जरासंधवधाचा विस्तृत वृत्तांत त्याच्या कथनात येतो (३६८-३९०), पांडवांचा राजसूय यश, शिशुपाल वध, सौभपती शाल्वावर चढाई वगैरे दारुकाच्या नजरेतून पेश होतो. दंतवक्र-विदूरथ यांचा वध, उत्कलराजाकडचा सुक्काम, काशीराजाकडील विश्वेश्वर पूजा इत्यादी तपशीलानंतर सुधिष्ठिराने द्युतात सर्व काही गमावण्याचा प्रसंग येतो (४३६-४४५), प्रयागच्या अंगिरस आश्रमात संपूर्ण मानसिक शांततेसाठी वास्तव्य करून श्रीकृष्ण 'आहार, भय, निद्रा मैथुन या चार प्रमुख सहजप्रवृत्तीचं मूळ कारण जाणणारं देतात (४७१), द्रौपदीच्या मनोगतातून तिच्या पाच पतीबरोबरच्या संबंधांचे तपशील मुक्तपणे येतात. शतस्पर्धा, द्रौपदीचे वस्त्रहरण, वनवास, अज्ञातवासातले वास्तव्य, विराह नगरीतील कीचकवध, दुर्योधनाकडे इंद्रप्रस्थराज्याची मागणी, तिला नकार मिळाल्यावर झालेले युद्ध यांचाही समावेश त्यात होतो.

अर्जुन

पांडवांचे परस्पर संबंध, द्रोणाचार्यांचे वर्तन, कृष्णाची शिष्टाई, युद्धभूमीवरचे मार्गदर्शन, अभिमन्यूचे वीरमरण, युद्धातील घटना वगैरे कथाभाग अर्जुनाच्या निवेदनातून येतो.

सात्यकी

सात्यकीच्या निवेदनातून कौरव-पांडव युद्धाचेच तपशील अधिक विस्ताराने येतात. कौरवांचे सैन्य २४ लक्ष तर पांडवांचे पंधरा लक्ष, विविध वीरांनी केलेले पराक्रम, त्यांची वेगवेगळी अस्त्रे, आंजालक बाण सोडून केलेला कर्णाचा वध, अश्वत्थाम्याने समोर समोर ब्रह्मास्त्राचं प्रक्षेपण करून केलेला सार्वत्रिक संहार, उत्तरेच्या गर्भातील पांडवांच्या तिसऱ्या पिढीच्या अंकुराचे श्रीकृष्णाने केलेले रक्षण हा कथाभाग सात्यकीच्या भूमिकेतून समोर येतो. या युद्धात केवळ दहा योद्धे वाचतात. पाच पांडव, महारथी सात्यकी, कृष्ण, कौरवांकडील कृतवर्मा, कृप, अश्वत्थामा.

शेवटचा भाग उद्धवाच्या मनोगताद्वारे प्रकट होतो. श्रीकृष्णाला तो दादा म्हणतो. उद्धव हा कृष्णाच्या आध्यात्मिक जीवनाचा भावविश्वस्त. युद्धानंतर पांडवांनी केलेले उद्ध्वस्त राज्याचे समृद्धीकरण, यादवांमधील अंतर्गत संघर्ष, श्रीकृष्णाने केलेली निरवानिरव, त्याचा मानसिक वानप्रस्थाश्रम, उद्धवाला सांगितलेली गीता, कृष्णाचे अंतिम क्षण यांची हकीकत त्याच्याकडून कळते, कृष्ण कोण होता? तो कोणाला कसा कळला? की कळलाच नाही? असा प्रश्न त्याला पडतो. ''दादा, खरोखर तू कोण होतास?'' या प्रश्नाचे उत्ता तो शोधू पाहतो आणि ''ज्या दिवशी श्रीकृष्ण पूर्णपणे कळेल तो दिवस आर्यावर्ताचाच नव्हे तर विश्वातील सोन्याचा दिवस असेल,'' असे म्हणून स्वत:ची समजूत काढू पाहतो.

'युगंधर'मध्ये अशा प्रकारे श्रीकृष्णाच्या व्यामिश्र जीवनाचे वेगवेगळे पैलू स्पष्ट करण्याचा शर्थीचा प्रयत्न शिवाजी सावंत यांनी केला आहे. श्रीकृष्णाच्या जीवनातील विविध घटनांचा सुसंगत अन्वयार्थ लावण्याची शिकस्त केली आहे.

कृष्ण हा युगंधर आहे, युगकर्ता आहे याबद्दल त्यांनाच काय, इतर कोणाही भारतीयाला संदेह असण्याची कारण नाही. भारतातील सर्वांत मोठे युद्ध- तेही सुमारे चार-पाच हजार वर्षापूर्वी झाले आणि त्यात त्या काळी चाळीसेक लाख सैनिक लढले, त्यातील बहुसंख्य धारातीर्थी पडले. हे युद्ध टळले असते का? कृष्णाने ते घडवून आणले का? कृष्णाची या युद्धातील भूमिका काय? याबद्दल वेगवेगळ्या दृष्टिकोनातून मते मांडली जातात. पुढेही मांडली जातील.

शिवाजी सावंत यांनी आयुष्यातील मोठा काळ महाभारत-श्रीकृष्ण यांच्या चिंतनात घालवून समकालीनांनाही सुसंगत व तर्कशुद्ध वाटेल अशी त्याची कथात्मक मांडणी केली आहे. परंपरागत दृष्टीने मूळ संहितेकडे पाहणाऱ्यांना सावंतांनी घेतलेले स्वातंत्र्य मान्य होणार नाही. सांवतांनी लावलेले घटनांचे व व्यक्तित्वाचे अन्वयार्थ अनेकांना पटणारही नाहीत. मृत्युंजयमध्ये कर्णाबाबत त्यांनी घेतलेली भूमिका वादग्रस्त ठरली. कृष्णाबाबत तशी ती ठरणार नाही. कारण कृष्णाचे युगंधरपण सर्वांना आधीच मान्य आहे. त्याचे बालपण, त्याचे कौटुबिक जीवन, आठ राण्यांशी असणारे त्याचे संबंध, पांडव-कौरवांशी असणारे संबंध, निरनिराळ्या दुष्ट राज्यकर्त्यांचा त्याने केलेला बंदोबस्त, त्याचे मुत्सद्दीपण, त्याचे चातुर्य या सर्व बाबींवर जीवनाचा समग्र अर्थ विशद करणाऱ्या त्याच्या गीतोपदेशाने कळस चढवला आहे.

युगंधरमुळे महाभारताचे मोठेपण पुनश्च मराठी वाचकांना पटू शकेल. मराठी वाचकांना ते आवडेल. सावंतांच्या लेखन कर्तृत्वाचे हे एका परीने एव्हरेस्ट शिखरच!

■

बिफोर मेमरी फेड्स...

अतिरिक्त महाकायदेपंडित हे पद भूषविणाऱ्या फली नरीमन यांच्या आणीबाणीच्या काळातील आठवणी



मूळ लेखक : फली एस. नरिमन

अनुवाद : सुदर्शन आठवले

पृष्ठे ४७२ । किंमत ४८० रु. । पोस्टेज ३०रु./ सभासदांना सवलतीत

अंतर्गत आणीबाणी

अंतर्गत आणीबाणीने जे अनेक धडे शिकविले त्यातला एक होता, आपल्या राज्यघटनेची कार्यवाही करण्याची जबाबदारी असणाऱ्या अधिकारी वर्गावर विसंबून, अवलंबून राहायचे नाही. मंत्रीगण, संसदेचे सन्मान्य सभासद, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश या सगळ्यांनी, एवढेच नव्हे तर देशाचे सर्वेसर्वा राष्ट्रपती, त्यांनीसुद्धा आपल्या पदरी घोर निराशा घातली!

'२६ जून'ची रात्र हा माझे आयुष्य, माझी वकिली व्यवसायाची कारकीर्द बदलून टाकणारा आणखी एक अत्यंत महत्त्वपूर्ण असा क्षण होता. मनात थोडी भीती आणि चिंता होती, पण तरीही मी माझे पद सोडायचा निर्णय घेतला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी मी मुंबईहून एच.आर. गोखले यांच्या ऑफिसमध्ये फोन केला आणि ते स्वत: नव्हते म्हणून माझा निर्णय त्यांच्या खाजगी चिटणिसांच्या कानावर घातला. पाठोपाठ मी एकाच ओळीत माझा राजीनामा लिहिला, खाली सही केली आणि पोस्टात टाकून दिला. त्या राजीनाम्याच्या पत्रात मी माझी कोणतीही विरोधाची, रागाची भावना व्यक्त केली नाही की, माझ्या कृतीचे कारण, समर्थनही दिले नाही. माझ्या राजीनाम्याची खबर आणीबाणीत देशातल्या वृत्तपत्रांवर लादलेल्या बंधनांमुळे (सेन्सॉरशिपमुळे) भारतीय वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाली नाही, पण परदेशातील न्यूयॉर्क टाइम्स आणि इतर काही वृत्तपत्रांत मात्र छापून आली आणि परदेशातून या ना त्या मार्गाने आपल्या देशात पोहोचलीच. हळूहळू ती सर्वत्र पसरली आणि मला माझ्या वकील मित्रांचे अभिनंदनाचे फोन्स येऊ लागले. शांतीभूषण[१] यांचा आला, मिकी छागला या माझ्या मित्राचा आला, पण मी सरकारी नोकरी कायमची सोडून दिली आहे हे फारसे कुणाला, माझ्या ऑफिसमधील लोकांनाही ठाऊक नव्हते.

***

आणीबाणीचा फास आवळला जाण्याच्या जवळ-जवळ तीन महिने आधी दिल्लीत एक बॉंबची वावडी उठली होती. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश रे यांची गाडी ट्रॅफिक सिग्नलला थांबली असताना एक अज्ञात इसम त्यांच्या गाडीत एक वस्तू टाकून पळून गेला. तो बॉंब असावा, ही भीती नंतर निखालस खोटी ठरली, पण त्या घटनेने न्यायमूर्ती रे हे इतके घाबरले की, त्यांना नीट श्वास घेता येईना, बरे वाटेना, त्यांची अस्वस्थता वाढली, इतकी की एक-दोन दिवस त्यांना घरीच पडून राहावे लागले. त्या प्रसंगाने महान्यायप्रतिनिधी निरेन डे यांनी आम्हा तीनही अधिकाऱ्यांना आणि सर्वोच्च न्यायालयाच्या सर्व न्यायाधीशांना संरक्षण मिळाले पाहिजे असा आग्रह धरला. त्यानुसार जाडजूड पिस्तूल बाळगणारा एक

साध्या कपड्यातील पोलीस माझ्या घरावर तैनात करण्यात आला. तो सतत सावलीसारखा मी जाईन तेथे, अगदी संध्याकाळी नेहरू पार्कमध्ये फिरायला जातानाही, माझ्या बरोबर राहू लागला.

त्यावेळेपासून मला असे जाणवू लागले की, अशा प्रकारच्या सुरक्षा व्यवस्थेखाली सतत राहणाऱ्या बड्या सरकारी अधिकाऱ्यांची किंवा इतर अतिमहत्त्वाच्या व्यक्तींची मनोभूमिका अन्य सामान्य नागरिकांहून अगदी भिन्न अशी तयार होते. मी राजीनामा दिल्यानंतर सुमारे दोन-तीन आठवड्यांनी ती बातमी सर्वत्र पसरली, सगळ्या मंत्रालयातही पोहोचली, त्याचा परिणाम असा झाला की, गेले चार महिने माझ्याभोवती वावरणारा माझा सुरक्षारक्षक काढून घेण्यात आला. मला एकदम असुरक्षित वाटू लागले आणि ती भीती एक-दोन महिन्यांपर्यंत माझ्या मनात जागी राहिली. तुमच्या नकळत तुमच्या मनाची प्रवृत्ती स्वसुरक्षेसाठी त्या रक्षकावर विसंबून राहण्याची तयार होते आणि जेव्हा ते कवच निघून जाते, तेव्हा कुठेही एकटे जायलाही मन धजावत नाही. मला संरक्षण पुरवले गेले तेव्हापासून आपण कोणीतरी 'मोठे' आहोत, आपले आयुष्य इतरांहून महत्त्वाचे आहे आणि त्याचे संरक्षण नीट व्हायला हवे, या भावनेने माझा ताबा घेतला होता आणि ते संरक्षण अचानक काढून घेतले गेल्यावर मला माझ्या सुरक्षिततेची काळजी वाटू लागली.

***

मी एका खाजगी दाव्यात वकील म्हणून मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांच्या कोर्टात उभा राहिलो. दोन न्यायाधीशांचे खंडपीठ होते. एक होते मुख्य न्यायाधीश कांतावाला आणि दुसरे होते सज्जन आणि सडेतोड वृत्तीचे न्यायमूर्ती व्ही. डी. तुळजापूरकर (ते त्या वेळी मुंबई उच्च न्यायालयात जज्ज होते, पण सप्टेंबर, १९७७मध्ये त्यांची भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली). मला पाहिल्यावर मुख्य न्यायाधीश कांतावाला मला ऐकू जाईल इतपत मोठ्याने तुळजापूरकरांना म्हणाले, 'नरीमनने राजीनामा दिला आहे.' तुळजापूरकरही (कांतावाला यांना एका कानाने जरा कमी ऐकू येत असल्याने,) त्यांच्यापेक्षाही मोठ्याने म्हणाले, 'मला नक्की माहीत नाही, पण मी असं ऐकलं आहे की, इंदिरा गांधींच्या बाजूने केस लढवण्यासाठी त्यांनी राजीनामा दिला आहे.' ही अफवा सगळीकडेच, अगदी जोरात पसरली होती, कारण अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निकालाविरुद्ध इंदिरा गांधींच्यावतीने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या केसचे वकीलपत्र (२६ जून, १९७५नंतर) नानी पालखीवाला यांनी परत करून टाकले होते.

देशावर आजवर अनेक आणीबाणीचे प्रसंग आले, पण २५ जून, १९७५[२] या दिवशी देशभरात जी 'अंतर्गत आणीबाणी' जाहीर करण्यात आली ती लोकशाहीचा

गळा दाबून टाकणारी, सर्वांत क्रूर दडपशाही होती. त्याच दिवशी मी माझ्या 'अतिरिक्त महाकायदेपंडित' पदाचा राजीनामा दिला, त्यानंतर काही महिन्यांनी मला अशा एका प्रसंगाचा साक्षीदार व्हावे लागले, जो त्या वेळच्या देशात पसरलेल्या आणीबाणीने दूषित केलेल्या हवामानाचा द्योतक होता. लॉर्ड ॲक्टन यांच्या सर्वांना पाठ असलेल्या प्रसिद्ध वचनाची आठवण करून देणारा होता. ते वचन आहे, 'सत्ता सहसा भ्रष्टाचाराकडे झुकतेच आणि ती जर निरंकुश असेल, तर भ्रष्टाचारही निश्चितपणे तसाच निरंकुशपणे फोफावतो.'[३] २५ जून, १९७५ला आणीबाणी जाहीर होण्याच्या आधी 'अतिरिक्त महाकायदेपंडित' या भारत सरकारच्या अधिकृत अधिकारपदाचा मान म्हणून मला आंध्र प्रदेशच्या वकिलांच्या एका परिषदेचा (ती राजामुंद्री येथे भरणार होती.) अध्यक्ष होण्याचे आमंत्रण दिले गेले होते. त्या वेळी भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश असलेले न्यायमूर्ती कृष्णा अय्यर हे परिषदेचे उद्‌घाटन करणार होते. मी परिषदेच्या संयोजकांना तत्परतेने पत्र लिहून मी राजीनामा दिला असल्याचे कळवले, परंतु त्यांनी तरीही एक ज्येष्ठ वकील म्हणून मी परिषदेचे अध्यक्षपद भूषवावे असा आग्रह केला.

आणीबाणीचा बडगा असूनही त्या राज्यातील सुमारे दोन हजार वकील परिषदेला उपस्थित होते. आम्ही परिषदेच्या स्थळी पोहोचलो तेव्हा तेथील प्रमुख संयोजकांनी आम्हाला एक दु:खद बातमी सांगितली. त्या परिषदेच्या कामात त्यांना हिरिरीने मदत करणाऱ्या त्यांच्या कायद्याचा विद्यार्थी असलेल्या तरुण मुलाला आणीबाणीत लागू केल्या गेलेल्या 'अंतर्गत सुरक्षा कायद्या'खाली आदल्याच दिवशी अटक करण्यात आली होती. तो एक शहाणा, विचारी विद्यार्थी होता, पण त्या वेळेच्या बदललेल्या मानदंडानुसार मूर्ख, अविचारी ठरला होता, कारण जुलै महिन्याच्या शेवटी-शेवटी एक दिवस जेव्हा त्याच्या (विशाखापट्टणम येथील) कॉलेजमधील प्राध्यापकांनी वर्गात असे जाहीर केले की, त्या आठवड्यातील एका दिवशी कॉलेजमधील सगळी मुले इंदिरा गांधी यांच्या नव्या वीस कलमी योजनेला विद्यार्थिवर्गाचा असलेला संपूर्ण पाठिंबा दर्शविण्यासाठी एका भव्य मिरवणुकीत सामील होतील. तेव्हा हा वेडा विद्यार्थी वर्गात उभा राहून त्यांना म्हणाला की, त्यापेक्षा तो वेळ आम्हाला कॉलेजमध्येच अभ्यासात घालवू द्यावा आणि मिरवणूक काढायचीच असेल, तर ती पुढे ढकलून एखाद्या सुट्टीच्या दिवशी काढावी! वर्गातल्या बाकीच्या विद्यार्थ्यांनी ओरडाआरडा करून त्याला गप्प केले, खाली बसवले, कारण त्यांना वर्गात बसण्यापेक्षा मिरवणुकीतला जल्लोष हवासा वाटत होता. तो त्याचे म्हणणे सोडेना, शब्दाने शब्द वाढत गेला, जरा वादविवादही झाला, पण नंतर ते प्रकरण तिथेच शमले, असे वाटले. त्या आठवडाअखेरीच्या सुट्टीत तो मुलगा राजामुंद्रीला आला. त्याच्या हातून घडलेल्या त्या 'घोर अपराधा'ची खबर जिल्हा न्यायाधीशांच्या कानापर्यंत पोहोचली होती. आणीबाणीने सर्व जिल्हा न्यायाधीशांना कुणालाही डांबून ठेवण्याचे, स्थानबद्ध करण्याचे

अधिकार बहाल केलेले होते, त्याचा झटका आणि चटका त्यांनी या बिचाऱ्या मुलाला द्यायचे ठरवले. 'हा तरुण राज्याच्या सुरक्षिततेला मोठा धोका आहे.' असा आरोप त्याच्यावर ठेवण्यात आला, त्याच्या अटकेचा हुकूम त्याच्या घरी जाऊन बजावला गेला आणि अपरात्रीच त्याला उचलण्यात आले! सुदैवाने आंध्रप्रदेशचे कायदामंत्री त्या दिवशी त्या परिषदेला उपस्थित होते, त्यांना आम्ही सर्वांनी त्या प्रकारात वैयक्तिक लक्ष घालण्याची विनंती केली. त्यांनीही आमच्या विनंतीला मान देऊन चौकशीची चक्रे फिरवली, अल्पावधीत त्या मुलावरचा तो जुलमी हुकूम मागे घेण्यात आला, पण त्या मुलाचा ठावठिकाणाच लागेना.

त्याला कुठल्या तुरुंगात डांबला होता तेच समजेना. बऱ्याच प्रयत्नांनंतर राज्याच्या कोणत्या तरी कोपऱ्यात तो सापडला आणि मोठ्या मिनतवारीने, तीन आठवड्यांच्या जीवघेण्या, प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर अनेक काळजीयुक्त, चिंतातुर दिवस आणि रात्रींनंतर त्याच्या आई-वडिलांना परत मिळाला. त्या जिल्हा न्यायाधीशांना दिल्लीहून कोणीही तशा सूचना दिलेल्या नव्हत्या. माझ्या मते साउथ ब्लॉकमधले (पंतप्रधानांच्या कचेरीतले) अधिकारीही जिल्हा न्यायाधीशांच्या त्या बेजबाबदार, अविचारी कृतीने विस्मितच झाले असतील. या सत्यकथेचे सार हे की, अधिकाऱ्यांना मनमानी करायला मोकळीक देणारा कायदा पास केला गेला की, आपल्यासारख्या देशात (आणि बहुधा इतर देशांतही) ते अधिकारी माकडाच्या हाती कोलित मिळाल्यासारखे, त्या कायद्याचा बडगा हाती घेऊन, खिळ्यांचा तळ असलेल्या बुटांखाली गरीब जनतेला गांजतात, भाजतात, चिरडून टाकतात!

असे जुलमी कायदे अशा क्रूरपणे अमलात आणले जाऊ लागले, तेव्हा त्याखाली भरडल्या जाणाऱ्या लोकांनी मोठ्या आशेने न्यायालयांकडे धाव घेतली, पण त्यांची ती आशा फोल ठरली.

कारण देशाला संकटातून वाचवण्याचा एकमेव उत्तम मार्ग म्हणून वर वर्णन केलेल्या, पण बनावट आणि कालांतराने मूर्खपणा शाबित झालेल्या जून, १९७५मधील आणीबाणीच्या संकटकाळात, एप्रिल, १९७६मध्ये एडीएम जबलपूर विरुद्ध शुक्ला[४] या केसमध्ये देशाच्या सर्वोच्च न्यायालयानेही अत्यंत खेदकारक असा निर्णय सुनावला. या केसची थोडी पार्श्वभूमी सांगितली पाहिजे. घटनेच्या ३५२ कलमांतर्गत २६ जून, १९७५ रोजी आणीबाणीची घोषणा झाली आणि २७ जूनला (घटनेच्या ३५९ कलमानुसार) राष्ट्रपतींचा हुकूमनामा जारी झाला. त्यामुळे ज्या लोकांना स्थानबद्ध केले गेले अथवा अटक करण्यात आली त्यांनी घटनेच्या १४ (समानतेचा हक्क), २१ आणि २२ (व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या रक्षणाचा हक्क) या कलमांनी मिळणाऱ्या कोणत्याही हक्कांची मागणी करण्याचे त्यांचे अधिकार गमावले. १९व्या कलमाप्रमाणे प्राप्त झालेला (स्वातंत्र्याचा) हक्कही (३६८ कलमाने) आणीबाणी लागू झाल्याने आपोआपच रद्द ठरला.

प्रश्न असे निर्माण झाले होते की, ज्यांना प्रतिबंधक कायद्याखाली अटक झाली होती, त्यांना संविधानाच्या २२६ या कलमानुसार उच्च न्यायालयात त्याविरुद्ध दाद मागता येईल का? न्याय मागण्याचा त्यांचा हक्क तरी त्यांना बजावता येईल का? उच्च न्यायालय त्या परिस्थितीत 'हेबियस कॉर्प्स' म्हणजे आरोपीला त्याच्या अटकेची कारणे शोधण्यासाठी न्यायालयासमोर हजर करण्याचा लेखी हुकूम काढू शकेल का? देशातील अलाहाबाद, मुंबई, दिल्ली, कर्नाटक, मध्य प्रदेश, पंजाब, राजस्थान इत्यादी नऊ उच्च न्यायालयांनी असा निर्णय दिला की आणीबाणी आणि राष्ट्रपतींचा आदेश लागू करण्यात आले असले तरीही अटक केल्या गेलेल्या लोकांच्या अटकेचे हुकूम 'मिसा' या नावाने ओळखला जाणाऱ्या अंतर्गत सुरक्षा कायद्यातील तरतुदींप्रमाणेच काढले गेले आहेत की, त्यांचे सर्रास उल्लंघन झालेले आहे हे तपासण्याचा हक्क न्यायालयांना निश्चित पोहोचतो. काँग्रेस पक्षाची सर्व राज्य सरकारे आणि केंद्र सरकारने त्या नऊ उच्च न्यायालयांच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. या खटल्याच्या सुनावणीसाठी सरन्यायाधीश रे जे खंडपीठ स्थापन करतील, त्यात त्यांच्या निर्णयाला होकार भरतील, मान हलवतील असेच 'होयबा' सदस्यच नेमतील, असे न्यायवर्तुळात बोलले जाऊ लागले. असे होणे टाळता आले तर पाहावे, म्हणून आम्ही काही जण सी. के. दप्तरी (माजी महान्यायप्रतिनिधी) यांना भेटलो आणि तशा 'निवडक' सदस्यांचे खंडपीठ होऊ नये, यासाठी सरन्यायाधीशांशी बोलण्याची चंदुभाईंना विनंती केली.

खंडपीठाचे सभासद निवडण्याचा हक्क सर्वस्वी सरन्यायाधीशांचा असतो, तरीही दप्तरी यांनी रे यांची भेट घेऊन त्यांना तशी, जराशी विक्षिप्त अशी विनंती केली. आपला पाइप ऐटीत ओठात धरून त्याचे झुरके घेत, ते सरन्यायाधीश रे यांना म्हणाले, 'सरन्यायाधीश, माझ्या असे कानावर आले आहे की, आपण प्रतिबंधक अटकेच्या केसेसच्या सुनावणीसाठी खंडपीठाची रचना करीत आहात.' त्यांनी होकार देताच दप्तरी त्यांना म्हणाले, 'त्याविषयी वकिलांच्यात थोडे चिंतेचे वातावरण आहे. मी काही सूचना करू शकतो का?' त्यांच्या सूचनेचा वास लागल्याने सरन्यायाधीश त्यांना म्हणाले, 'खंडपीठ कसे बनवायचे, सदस्य म्हणून कोणाला निवडायचे या गोष्टी सरन्यायाधीशांना दुसऱ्या कोणीतरी सुचवल्या आहेत असे यापूर्वी कधी घडले आहे?' प्रश्न संपण्याच्या आत दप्तरी उद्‌गारले, 'हो, मला आठवतंय की, एकदा सरन्यायाधीश एस. आर. दास यांना खंडपीठाच्या रचनेविषयी सूचना केल्या होत्या आणि त्यांना तरी त्यात काही गैर वाटले नव्हते.' एस. आर. दास यांचा संदर्भ देताच ए. एन. रे यांनी जरा बचावाचा पवित्रा घेतला, कारण दास हे नावच आदरणीय होते आणि त्यातून ते रे यांचे गुरू होते. विषय तिथेच संपला, पण खंडपीठाची घोषणा झाली तेव्हा आम्हाला दप्तरींच्या शिष्टाईचा योग्य परिणाम दिसून आला. खंडपीठात 'निवडक' सदस्य नव्हते, पाच सर्वांत ज्येष्ठ अशा सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचा

समावेश होता. आम्हाला जरा दिलासा मिळाला, पण तो अल्पजीवी ठरला. ती आणखी एक कहाणी आहे.

मी चंदुभाई दप्तरींना कधी जाऊन विचारले नाही की, त्यांनी किंवा अन्य कोणी कधी खरेच एस. आर. दास यांना खंडपीठातल्या सदस्यांबद्दल सूचना केल्या होत्या का! पण माझा असा अंदाज आहे, अजूनही आहे की तसे काही घडले नसावे. दप्तरी यांना ती एक त्या क्षणी सुचलेली युक्ती, मखलाशी असावी. काही का असेना, त्या वेळी हवा तो परिणाम साधला हे नक्की!

एडीएम जबलपूर विरुद्ध शुक्ला या केसची सुनावणी सर्वोच्च न्यायालयात सुरू झाली. खंडपीठातील एक सभासद न्यायमूर्ती एच. आर. खन्ना यांनी भारताच्या महान्यायप्रतिनिधींना असा नेमका प्रश्न विचारला की, जर एखाद्या पोलीस आधिकाऱ्याने वैयक्तिक वैरातून किंवा राज्याच्या सुरक्षेशी सर्वस्वी असंबंधित अशा कारणांसाठी जर कायदा पाळणाऱ्या, निरुपद्रवी नागरिकाला अटक केली आणि कदाचित त्याला मारूनही टाकले, तर त्यावर काही न्यायालयीन उपाय अस्तित्वात आहे का? महान्यायप्रतिनिधींचे उत्तरही नेमके, सुस्पष्ट होते, 'मी आधी सांगितलेलेच आहे की, जोवर आणीबाणी अस्तित्वात आहे तोवर अशा प्रकारांवर कोणताही न्यायालयीन उपाय नाही.' त्यांनी खंडपीठाला सांगितले :

> 'या वास्तवाने आपल्या सदसद्विवेकबुद्धीला धक्का बसेल, माझ्याही बसला, पण मी म्हणालो तसे आणीबाणीच्या काळात[५] या बाबतीत न्यायालय कुठलीही कारवाई करू शकत नाही.'

घटनेतील २१व्या कलमाने प्रदान केलेला जीवन जगण्याचा आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा हक्क रद्द केल्याचा हा दुष्परिणाम होता. सरकारच्या सल्लागारानेच हे स्पष्ट केले होते की, कायद्याच्या, अधिकाराच्या कोणत्याही प्रकारच्या गैरवापराची शक्यता टाळण्यासाठी न्यायालये जशी पूर्णपणे असमर्थ होती तशीच ती तसे प्रकार घडले, तर त्यांच्याविरुद्धही कोणतीही कारवाई करू शकत नव्हती. अशा रीतीने एडीएम जबलपूर विरुद्ध शुक्ला या केसच्या – जी केस 'हेबियस कॉर्पस केस' या नावाने प्रसिद्ध झाली – सुनावणीनंतर निघालेल्या या 'कायदेशीर' निष्कर्षापुढे खंडपीठातील पाचपैकी चार न्यायाधीशांनी मान डोलावली आणि देशातल्या नऊ उच्च न्यायालयांनी मान्य केलेला 'हेबियस कॉर्प्स' देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने नामंजूर केला. उच्च न्यायालयांनी कायद्याच्या बंधनांबाहेर जाऊन, संकुचितपणा सोडून, विचारपूर्वक प्रदर्शित केलेला जनतेच्या हिताचा, उदार, विशाल दृष्टिकोन त्यांच्या वरच्या, देशातील न्यायासंबंधातील अखेरच्या, अत्युच्च न्यायासनाने चुकीचा, गैर ठरवला. या दुर्दैवी निर्णयाने जुलमी आधिकाऱ्यांची मनमानी, अकारण केली जाणारी अटकसत्रे, खोट्या स्थानबद्धता या सगळ्यांपुढे

सर्वोच्च न्यायालय कसे हतबल आहे, किती दुर्बल आहे, याचीच दवंडी पिटली गेली! न्यायसंस्थेच्या षंढपणाचीच ती ग्वाही ठरली!!

खंडपीठातील पाच सभासदांतला जो एक 'पुरुष' होता, ते होते सर्वोच्च न्यायालयातील (सरन्यायाधीश रे यांच्या खालोखालचे) सर्वांत ज्येष्ठ न्यायाधीश एच. आर. खन्ना. त्यांनी हुकूमशाही, जुलूमशाही यांचे समर्थन करायला नकार दिला. सत्तेने उन्मत्त, उद्दाम बनलेल्या शासनापुढे झुकायला ते तयार झाले नाहीत. 'देशातील नागरिकांना जीवन आणि ते जगण्याचे स्वातंत्र्य हे काही कुठल्या घटनेने, कायद्याने दिलेले नाही, ते सर्व स्त्री पुरुषांना मानवजन्म मिळाला त्याबरोबरच प्राप्त झालेले आहे!' असे त्यांनी ठणकावून सांगितले, पण देशाचे दुर्दैव असे की, धीरोदात्तपणे बोलणारे ते एकटेच होते, 'एकटे' पडले, अल्पमतात गेले[६]. सर्वोच्च न्यायालयाचा इतिहास लिहिणारे इतिहासकार या गोष्टीचा निश्चितपणे उल्लेख करू शकतील की, या अत्युच्च न्यायासनाला मानवी हक्कांच्या पायमल्लीविषयी फार काळजी, घोर चिंता वाटते, ही गोष्ट त्या अत्युच्च न्यायालयाने आणीबाणीच्या (जून, १९७५ ते मार्च, १९७७.) काळात नाही पण आणीबाणी उठवल्यानंतर मात्र उघडपणे जाहीर केली होती. हे वाचून मानवी हक्कांच्या पुरस्कर्त्यांना, वकिलांना, न्यायाधीशांना जरासा दिलासा मिळेल!!

'सिक्स मेन'[७]– नावाच्या आपल्या पुस्तकात स्वत:हून पदत्याग करेपर्यंत आठवे किंग एडवर्ड असलेले 'ड्यूक ऑफ विंडसर यांच्याविषयी लिहिताना ॲलिस्टर कूक या सुप्रसिद्ध समालोचक आणि निर्मात्याने म्हटले आहे की, 'सर्व काही सरळ, सुरळीत चाललेले असेपर्यंत त्यांची कामगिरी अगदी सर्वोत्कृष्ट असायची.' आमच्या देशातही जेव्हा (जून, १९७५मधील आणीबाणीच्या काळात) काहीही सरळ, सुरळीत नव्हते, तेव्हा अगदी हाताच्या बोटांवर मोजता येतील एवढेच न्यायाचे रखवाले रखवाल्यांप्रमाणे वागले. त्यातले एकच सर्वांत उल्लेखनीय होते, ते म्हणजे आणीबाणीच्या काळातील सर्वांत कुप्रसिद्ध केसच्या एडीएम जबलपूरच्या केसच्या खंडपीठातील बहुमतापुढे न नमता आपल्या योग्य मताशी चिकटून राहिलेले एकांडे शिलेदार न्यायमूर्ती एच. आर. खन्ना. एक निर्भय न्यायाधीश काय करू शकतो, हे त्यांनी दाखवून दिले. 'माणसाचे मूल्यमापन तो सुखासमाधानात आयुष्य घालवताना कसा वागतो यावर होत नाही, तर तो वादग्रस्त, आव्हानात्मक अशा परिस्थितीला कसा सामोरा जातो, तिच्याशी कसा मुकाबला करतो यावर होते'[८]. खन्ना यांनी जेव्हा त्यांच्या बहुमताच्या विरोधातील निकालपत्रावर सही केली तेव्हाच त्यांना या गोष्टीची पूर्ण कल्पना होती की, ते अगदी नजीकच्या काळात त्यांना मिळू शकणाऱ्या सरन्यायाधीशपदाला तिलांजली देत आहेत, त्या वेळी ते सर्वोच्च न्यायालयातील सर्व न्यायाधीशांच्यात ज्येष्ठतेनुसार दुसऱ्या क्रमांकावर होते, त्यामुळे (इतर सगळ्या गोष्टी समान धरल्या तर,) विद्यमान सरन्यायाधीश ए. एन. रे २८ जानेवारी, १९७७

या दिवशी निवृत्त झाल्यानंतर ते सन्माननीय पद त्यांनाच मिळायला हवे होते. ती वेळ जेव्हा आली तेव्हा अनेकांच्या आग्रह, विनंत्या डावलल्या गेल्या, (त्यावेळच्या सरकारकडून) ज्येष्ठतेखेरीजच्या 'इतर' गोष्टींत खोट काढली गेली आणि (तिसऱ्या क्रमांकावर असलेले.) न्यायमूर्ती एम. एच. बेग हे खन्ना यांना मागे टाकून भारताचे सरन्यायाधीश झाले. अर्थातच खन्ना यांनी आपला स्वाभिमान, आत्मसन्मान जपला, न्यायाधीश पदाचा तत्काळ राजीनामा दिला! त्यांच्या या मोठेपणाचा आदर त्यांचे एक चित्र ते सर्वोच्च न्यायालयातील जेथे बसत असत त्या दोन नंबरच्या कोर्टात लावून केला गेला आहे. हे छायाचित्र त्यांच्या व्यक्तिमत्त्वाशी मिळते जुळते नाही तो भाग वेगळा.

'युरोप राष्ट्रसंघाचा पिता' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जीन मॉनेट याने एके ठिकाणी म्हटले आहे की, 'जगात दोन प्रकारची माणसे असतात, 'एक, ज्यांना 'कोणीतरी बनायचे' असते आणि दुसरे, ज्यांना 'काहीतरी करायचे' असते.' आपल्या देशात सरन्यायाधीश येतील आणि जातील, विस्मरणात जातील, पण खन्ना यांना कोणी विसरणार नाही, ते कायम आठवत राहतील, कारण त्यांनी संस्मरणीय ठरावे असे, 'काहीतरी केले' आहे!

अंतर्गत आणीबाणीने जे अनेक धडे शिकविले त्यातला एक होता, आपल्या राज्यघटनेची कार्यवाही करण्याची जबाबदारी असणाऱ्या अधिकारी वर्गावर विसंबून, अवलंबून राहायचे नाही. मंत्रिगण, संसदेचे सन्मान्य सभासद, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश या सगळ्यांनी, एवढेच नव्हे तर देशाचे सर्वेसर्वा राष्ट्रपती त्यांनीसुद्धा आपल्या पदरी घोर निराशा घातली! मंत्रिमंडळाची बैठक झालेली नाही, मंत्र्यांची मते, मान्यता घेतलेली नाही हे माहीत असून राष्ट्रपतींनी २५ जूनच्या रात्रीच काहीही आढेवेढे न घेता आणीबाणीच्या जाहीरनाम्यावर सहजगत्या सही करून टाकली. तीन वर्षांनंतर (मार्च, १९७७मध्ये आणीबाणी उठवली गेल्यावर) घटनेतील ३५२ (३) हे कलम १९७८ सालचा ४४वा घटनादुरुस्ती कायदा पास करून बदलण्यात आले, त्यानुसार यापुढे मंत्रिमंडळाचा निर्णय राष्ट्रपतींना लेखी स्वरूपात कळविण्यात आल्याशिवाय ते आणीबाणीच्या जाहीरनाम्यावर सही करू शकणार नाहीत, असा नियम करण्यात आला! २० जून, १९७९ रोजी अमलात आणली गेलेली कलम ३५२ (३)मधील ही घटनादुरुस्ती म्हणजे संसदेने देशाच्या अत्युच्च पदावरील शासकाबद्दलच्या – राष्ट्रपतींबद्दलच्या – घोर अविश्वासाचे उघड प्रदर्शन आहे, असेच मला वाटते.

आता, एवढ्या काळानंतर मागे वळून पाहताना असा विचार मनात येतो (आत्ताच, त्या वेळी आलेला नव्हता.) की, २५ जून, १९७५च्या अंतर्गत आणीबाणीच्या काळातील एप्रिल, १९७६मधील एडीएम जबलपूर विरुद्ध शुक्ला या केसमधील खंडपीठाच्या दुर्दैवी विरोधी बहुमताचा (दीर्घकालीन) परिणाम काही वाईट झाला

नाही, त्यामुळे विचारी लोकांना याची पक्की जाणीव झाली की आपल्याला हव्या असणाऱ्या निरनिराळ्या क्षेत्रांतील स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी केवळ घटनेने दिलेल्या अधिकार आणि हक्कांवर अवलंबून राहून चालणार नाही, घटनेचे अधिकृत रक्षक, अधिकारी त्यांची कर्तव्ये दक्षपणे करतील, जबाबदाऱ्या काटेकोरपणे पार पाडतील अशी अपेक्षा ठेवूनही भागणार नाही, त्यासाठी जनतेत, देशवासीयांच्यात जागृती झाली पाहिजे, त्यांच्या मनात या जाणिवेने खोल मुळे धरली पाहिजेत की आपले मूलभूत अधिकार केवळ आपल्या संविधानाच्या कलमात आहेत, घटनाकारांनी आपल्याला दिलेत म्हणून ते आपले हक्क आहेत असे नसून, ते अधिकार या मानवी जीवनाच्या सुखा समाधानाचा विचार करणाऱ्या सुविचारी, सुजाण लोकांनी सुसंस्कृत, निरामय असे आयुष्य प्रत्येक नागरिकाला जगता यावे यासाठी अत्यावश्यक ठरवलेल्या पायाभूत गोष्टी आहेत.

मला तर वाटते की जून, १९७५मधील आणीबाणी ही तशा प्रकारच्या सत्ती जबरदस्ती, दडपशाही, जुलूम यांसारख्या भयंकर रोगांच्या साथी देशात पसरून भविष्यात लोकांना कधीही तसल्या भीषण संकटांनी ग्रासू नये यासाठी टोचलेली रोगप्रतिबंधक लसच होती. असा आजार आपल्या लोकशाहीला परत व्हायला नको असेल, तर कायद्याच्या नियमांविषयी कायमच नितांत आदर ठेवण्याचे पथ्य पाळलेच पाहिजे ही गोष्ट लोकांच्या, लोकांनी निवडून दिलेल्या संसदेत बसणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या, मनात आणीबाणीने चांगलीच ठसवली. वर उल्लेख केलेल्या जून, १९७९पासून अस्तित्वात आलेल्या चव्वेचाळीसाव्या घटनादुरुस्ती कायदा १९७८मधून संविधानाचा एक मूळ घटक या नात्याने संसदेने असे जाहीर केले की, ३५२ या संविधानातील कलमाचा वापर करून युद्धाची अथवा अंतर्गत किंवा बाह्य आणीबाणीची घोषणा करण्यात आली, तरीही घटनेतील कलम २० (दुहेरी संकट, जोखीम) आणि कलम २१ (जगण्याचा आणि स्वातंत्र्याचा अधिकार) ही दोन कलमे कुठल्याही परिस्थितीत रद्द करता येणार नाहीत. घटनेत आणीबाणी मागे घेण्याच्या अधिकारांसंबंधी असलेल्या मूळच्या तरतुदी (तो अधिकार फक्त राष्ट्रपतींना म्हणजे केंद्रसरकारला होता.) अपुऱ्या आहेत हे लक्षात घेऊन त्याविषयी पुरेशी दक्षता घेतली जावी यासाठी पुढील संरक्षक बाबी समाविष्ट करण्यात आल्या.

अ) कलम ३५२प्रमाणे ज्यांना अधिकार प्राप्त आहे, त्या आधिकाऱ्यांनी जाहीर केलेली आणीबाणी ज्या वेळेला संसदेतील प्रतिनिधींना बहुमताने अनावश्यक वाटेल, ती उठवण्याची योग्य वेळ आली आहे असे वाटेल, त्या वेळी ती मागे घेण्याचा खास अधिकार त्यांना दिला गेला. ब) कलम ३०२ प्रमाणे जर आणीबाणी घोषित केली तर ठरलेल्या कालावधीच्या आत, संसदेच्या दोन-तृतीयांश सदस्यांच्या बहुमताने तिला मान्यता मिळवलीच पाहिजे. त्या वेळी संसदेचे अधिवेशन चालू नसेल, तर याच कारणासाठी तिचे खास अधिवेशन बोलावले पाहिजे. क) अडतिसाव्या घटनादुरुस्ती

कायद्याद्वारे (१ ऑगस्ट, १९७५पासून लागू झालेला कायदा) घटनेच्या ३५२व्या कलमाच्या पाचव्या भागात घुसडण्यात आलेली दोन अन्याय्य कलमे – आणीबाणी ही अंतिम असल्याचे कलम (जाहीर झालेली आणीबाणी म्हणजे काळ्या दगडावरची रेघ समजली जाणे) आणि त्याविरुद्ध न्यायालयाचे दरवाजे बंद करणारे कलम – ही दोन्ही कलमे काढून टाकण्यात आली.

नागरिकांच्या हक्कांचे कसोशीने रक्षण करणाऱ्या या घटनादुरुस्त्या, हे कायदे यांनी खूप काही प्राप्त होते असे नाही. ते केवळ शब्द आहेत, जे कागदावरच राहू शकतात. ख्यातनाम इतिहासकार एडवर्ड गिब्बन यांनी त्यांच्या 'द डिक्लाइन ॲन्ड फॉल ऑफ रोमन एम्पायर'[९]– 'रोमन साम्राज्याची अवनती आणि ऱ्हास' या श्रेष्ठ ग्रंथाचा पहिला खंड जेव्हा पूर्ण केला तेव्हा तो तिसरे किंग जॉर्ज यांचे बंधु ड्यूक ऑफ ग्लाउसेस्टर यांच्यापुढे सादर करण्याची संधी त्यांना देण्यात आली होती. ड्यूक महोदयांनी ग्रंथाचे आणि ग्रंथकाराचे छान स्वागत केले. कालांतराने पहिल्या खंडाइतक्याच प्रचंड आकाराचा दुसरा खंडही पूर्ण झाला. तोही ड्यूकसमोर ठेवल्यावर त्यांनी त्याचेही तेवढ्याच सौहार्दतेने कौतुक केले. समोर टेबलावर ठेवलेल्या प्रचंड ग्रंथराजाकडे पाहात ड्यूक गिब्बन यांना म्हणाले, 'आणखी एक जाडजूड, गलेलठ्ठ चौकोन! मि. गिब्बन, काय सारखं पांढऱ्यावर काळं करत बसता, किती खरडता?' मानवी हक्कांसंबंधींच्या देशोदशींच्या चळवळींचे जाहीरनामे, परिषदातील ठराव, संस्थांची आवाहने, करार, पत्रके, भित्तिपत्रे, लेख, पुस्तिका, पुस्तके अशा वाढत्या कागदपत्रांबद्दलही शिक्षणक्षेत्रातल्या आणि राजकारणातल्या लोकांचेच नव्हे, तर जगभरातल्या बुद्धिजीवी लोकांचेही असेच काहीसे मत बनत चालले आहे. नुसते शब्द... शब्द... आणि शब्द! युनायटेड नेशन्स (युनो) मानवी हक्कांचे रक्षण व्हावे, त्यांचे पालन व्हावे यासाठी जगभरातल्या देशात दूरगामी प्रयत्न करीत आहे, असे निदान ते जाहीरपणे सांगत तरी आहेत, पण युनोचे सदस्य देश त्या दिशेने, त्या दृष्टीने काही ठोस कृती करण्यात मात्र कमी पडताना दिसतात. मानवी हक्कांबद्दलची जागरूकता आणि त्यांचे काटेकोर पालन यांचे जागतिकीकरण झालेच असले, तर ते केवळ कागदावर झाले आहे, असेच म्हणावे लागेल. त्याचे प्रत्यक्ष परिणाम फारसे अनुभवास येत नाहीत. या टीकेत नक्कीच सत्यांश आहे. सार्वभौम, प्रगत, प्रबळ देश या जागतिकीकरणाचा वेग वाढवण्यापेक्षा त्याच्या प्रयत्नात अडथळेच आणत आहेत. जगातील बहुतेक सर्व देशांचा शासने मानवी हक्कांसाठीच्या कार्याचा, योजनांचा जो गाजावाजा करतात, जे 'आम्ही करतो आहोत,' असा दावा करतात ते आणि जे त्यांच्या देशात प्रत्यक्ष अमलात आणतात, ज्याची कार्यवाही करतात त्यात फार मोठे अंतर असते. हे कार्य असे आहे की, ज्यात सर्वांत जास्त महत्त्व कागदांना, शब्दांना नाही तर लोकांच्या मनोवृत्तीला आहे.

***

'अतिरिक्त महाकायदेपंडित' या पदाचा मी राजीनामा दिला, पण आम्ही दिल्ली काही सोडली नाही. मी सर्वोच्च न्यायालयात खाजगीरित्या वकिली करू लागलो.

अर्थातच आम्हाला ७, सफदरजंग लेनचा सरकारी बंगला लगेचच खाली करावा लागला. एवढ्या चांगल्या पदाचा राजीनामा देणे ही जरी नंतर शौर्याची, धाडसाची, अभिमानाची गोष्ट म्हणून प्रशंसली गेली तरी वारा बघून पाठ फिरवणाऱ्या लोकांच्यात, तत्कालीन आणीबाणीच्या वादळात, आम्ही टीकेलाच पात्र ठरलो. आम्हाला जागा द्यायला बंगल्यांचे मालक तयार होईनात. माझी पत्नी बाप्सी हिने कितीतरी जागा बघितल्या, टीका सहन केली, नकार पचवले. माझा एक जुना साहाय्यक अशोक प्रताप त्या वेळी मुंबईत वकिली करीत होता. आमची अडचण ओळखून तो दिल्लीला आला आणि त्याने बाप्सीला घरसंशोधनात मोलाची मदत केली. त्या दोघांच्या कित्येक आठवड्यांच्या भगीरथ प्रयत्नांना अखेर यश आले आणि आम्ही ऑगस्ट, १९७५मध्ये २१, हौज खास एन्क्लेव्ह येथे राहायला गेलो. तेव्हापासून आम्ही त्या घरात अनेक सुखा-समाधानाची वर्षे घालवली, त्या वेळी ते घर (सरकार आणि त्यांची धोरणे यांचे कडवे, सडेतोड टीकाकार आणि सुप्रसिद्ध लेखक) पतवंतसिंग यांच्या भगिनींच्या मालकीचे होते. ते स्वत: आणि त्यांची बहीण दोघेही अतिशय सज्जन माणसे होती. त्या घराचा संपूर्ण तळमजला त्यांनी आम्हाला भाड्याने दिलाच, काही काळानंतर आम्ही तो पूर्ण बंगलाच त्यांच्याकडून विकत घेतला, वर भाडे किती द्यायचे या प्रश्नाला 'तुम्हाला योग्य वाटेल ते द्या.' असेच उमदे उत्तर पतवंतसिंग आम्हाला देत राहिले. आणीबाणी जाहीर झाल्या-झाल्या तिच्या निषेधार्थ सरकारी पदाचा राजीनामा देण्याच्या माझ्या कृतीचा ज्या थोड्या लोकांना अभिमान वाटला, ज्यांनी माझे मनापासून कौतुक केले, त्यात त्या दोघांचा समावेश होता. आणखी एका व्यक्तीचा उल्लेख केला पाहिजे – तो म्हणजे दिल्ली शासनात कायदा सचिव म्हणून काम करणारे रजनी कांत यांचा. त्या आणीबाणीच्या काळात आमचे जुने, एकेकाळचे 'सगे सोबती'ही आम्हाला भेटणे, आमच्याशी बोलणे, आमच्या घरी येणे टाळत असत, 'यांच्या घरी गेलो तर आपल्या गाडीचा नंबर गुप्त पोलीस लिहून घेतील आणि १ सफदरजंग (पंतप्रधान इंदिरा गांधींचे निवासस्थान) येथे तातडीने कळवतील,' अशी त्यांना भीती वाटत असे. अशा परिस्थितीत रजनी कांत हे सरकारी नोकरीत असूनही जवळ जवळ रोज आम्हाला भेटायला आमच्या नव्या घरी येत असत. खंबीर, कणखर असे रजनी कांत, त्यांची प्रेमळ पत्नी आणि त्याची मुले यांना मी, बाप्सी आणि आमची मुलेही कधीच विसरू शकणार नाही. खरंच, राजधानीत इमानदारी, निष्ठा अगदीच अल्पजीवी असतात!!

■

हुकुमशाहीच्या सावलीत

इराक : सद्दाम हुसेनच्या काळातील



मूळ लेखिका : वेंडेल स्टीव्हन्सन

अनुवाद : अशोक पाथरकर

पृष्ठे २१६। किंमत २५० रु. । पोस्टेज ३०रु./ सभासदांना सवलतीत

लेखिका वेंडेल स्टीव्हन्सचे निवेदन

मी २००३च्या उन्हाळ्यात बगदादला 'ऑब्झर्व्हर' या वृत्तपत्राची पत्रकार म्हणून गेले. युद्धाच्या काळात मी उत्तरेला कुर्दिस्तानमध्ये होते आणि मला युद्धानंतरच्या स्थितीचे निरीक्षण करावयाचे होते. तसेच सद्दामच्या कारकिर्दीबद्दल आणखी माहितीही मिळवायची होती. त्या वर्षीचा पूर्ण ऑगस्ट महिना मी बगदादमध्ये होते आणि नंतरच्या नोव्हेंबरमध्ये सात महिन्यांसाठी पुन्हा तिथे परत गेले. आधी मी इतर पत्रकारांबरोबर 'हमरा' हॉटेलमध्ये राहिले. नंतर जवळच्याच जरा स्वस्त अशा 'दुलाश्मी' हॉटेलात राहिले आणि मग बागेत दोन सशस्त्र पहारेकरी असलेल्या गार्डियन हाऊसमध्ये राहिले. मी slate.com साठी वृत्त पाठवीत होते. 'फायनान्शियल टाइम्स मॅगेझीन' आणि 'ग्रांटा' यांच्यासाठी लेख लिहायचे, तसेच या पुस्तकासाठी जनरल कमेल सचेत यांचे कुटुंबीय, मित्र व सहकारी यांच्या मुलाखती घेत होते. इराकमध्ये काय घडले हे केवळ ज्यांच्यावर अत्याचार झाला त्यांच्याच नव्हे, तर ज्यांनी अत्याचार करण्यात भाग घेतला, त्यांच्याही नजरेतून सांगता यावे, यासाठी मला एखाद्या इराकी जनरलची कहाणी हवी होती. मी सर्व मुलाखतींमधली हकिकत बहुतेक त्याच दिवशी एका वहीत लिहून काढायचे आणि मग ती हकिकत इतर निरीक्षणे व माहितीसह माझ्या लॅपटॉपवर टाकायचे.

बगदादमधील वाढत्या हिंसाचाराच्या तणावामुळे थकून जाऊन थोडा ब्रेक घेऊन परत यावे, असा विचार करून जून, २००४ मध्ये मी बगदाद सोडले. उन्हाळ्यात माझ्या दोन मित्रांचे अपहरण झाले – दोघांनाही थोड्या दिवसांनी सोडून देण्यात आले; पण माझ्या सहकाऱ्यांशी जे बोलणे व्हायचे, त्यावरून बगदादमध्ये नेहमीच्या कारमधून माझे सोनेरी केस ओढणीखाली लपवून, गन किंवा गार्ड न घेता एकटीने फिरण्याची माझी पद्धत मूर्खपणाची आहे, हे माझ्या लक्षात आले. २००५च्या जानेवारी-फेब्रुवारीमध्ये पहिल्या निवडणुकींचे वृत्त देण्यासाठी, तसेच आणखी काही 'मसाला' मिळतो का ते बघण्यासाठी आणि सचेत कुटुंबाची हालहवाल जाणण्यासाठी मी पुन्हा पाच आठवड्यांसाठी बगदादला गेले; पण तोपर्यंत अपहरणाच्या घटना खूपच वाढल्या होत्या आणि परदेशी नागरिक हे बंडखोर आणि लुटारू दोघांचेही आवडते लक्ष्य झाले होते. बगदादचा सत्तर टक्के भाग बंडखोरांच्या नियंत्रणाखाली होता आणि तिथे जाणे-येणे शक्य नव्हते; गोळीबार आणि लुटालूट नित्याच्याच घटना झाल्या होत्या. स्वत:ला मोठ्या काळ्या बुरख्यात लपेटणे, साध्या कारमध्ये मागे बसणे, लोकांना पूर्वसूचना न देता जाणे आणि त्यांच्याकडे एक-दोन तासांपेक्षा जास्त न थांबणे, इतकी सावधगिरी बाळगूनसुद्धा धोका जराही कमी नव्हता. त्यानंतर थोड्याच दिवसांनी मार्ला रझिका एका कारबॉम्बच्या स्फोटात मारली गेली. तिने अमेरिकेच्या कारवाईमुळे नुकसान झालेल्या लोकांना भरपाई देण्यासाठी एक सामाजिक

संस्था स्थापन केली होती. त्यानंतरच्या वर्षी 'ख्रिश्चन सायन्स मॉनिटर'साठी फुटकळ काम करणाऱ्या जिल कॅरोलचे अपहरण झाले. तिचा दुभाषा ॲलन एन्विया याच्याशी माझी २००३मध्ये प्रथम भेट झाली होती. तो एक अतिशय उमद्या स्वभावाचा आणि हुशार माणूस होता. या प्रकरणात ॲलनही मारला गेला.

२००४च्या उन्हाळ्यानंतर हे लिखाण करेपर्यंत २००७मध्ये परिस्थितीत थोडी सुधारणा होऊनसुद्धा कोणीही पाश्चिमात्य पत्रकार, कुर्दिस्तान वगळता उरलेल्या इराकमध्ये कॉफी घेण्यासाठी किंवा एखाद्या रेस्टॉरंटमध्ये जाण्यासाठी किंवा सहज शॉपिंगसाठी म्हणून रस्त्यातून वावरला असेल, असे मला वाटत नाही. इराकमधील पोस्टिंगवरून तात्पुरत्या विश्रांतीसाठी येणाऱ्या पत्रकारांबरोबर माझे जे बोलणे व्हायचे त्यावरून त्यांना इराकमध्ये सशस्त्र पहाऱ्यातील हॉटेलच्या बाहेर न पडता, प्रत्यक्ष आँखो देखा हाल समजून घेण्यासाठी स्थानिक इराकी सहकाऱ्यांवरच अवलंबून राहावे लागत होते, हे स्पष्ट होते. २००६ उजाडेपर्यंत तर माझ्या ओळखीचे खुद्द इराकी पत्रकारही (तोपर्यंत जे जिवंत राहिले ते) 'आम्हालाही आता क्वचितच बाहेर पडता येते आणि तेसुद्धा कॅमेरा, नोटबुक न घेता!' असे म्हणाले.

त्यामुळे २००५नंतर मी माझे माहिती जमविण्याचे काम इराकमधून देशोधडीला लागून लंडन, बेरुत, दमास्कस, अम्मान आणि दुबई इथे वाढत्या संख्येने आलेल्या इराकी स्थलांतरितांच्या भेटी घेऊन केले. हा अगदी निर्दोष असा मार्ग नव्हता; पण एकदा तुम्हाला एखाद्या गोष्टीची मूलभूत माहिती झालेली असली आणि तिथली नस बरोबर सापडलेली असली की स्थळ व काळ यांच्यातील फरकामुळे अडचण येत नाही.

हे पुस्तक लिहिताना इराकी माणसाविषयी बाहेरच्या माणसांनी लिहिणे किती धाडसाचे आहे, याची तीव्रतेने जाणीव झाली. अर्थात मी सत्य जाणून घेण्याचा पुरेपूर प्रयत्न केलाच; पण संबंधित इराकी व्यक्तींचे खाजगी जीवन आणि विचार उघडे पडतील आणि तेसुद्धा अशा धोकादायक आणि अनिश्चित परिस्थितीत, याची मला काळजी वाटतेय. त्यामुळे मी काही व्यक्तींची नावे बदलली आहेत. या पुस्तकात उल्लेख असलेले जे इराकी लोक माझ्याशी बोलले, त्यांचा माझ्यासमोर मन मोकळं करण्यामागे वेगळा हेतू होता. कमेल सचेतच्या हकिकतीवरून आणि त्यांच्या अनुभवांवरून इराकी जनता सहन करीत असलेल्या हालअपेष्टांचे चित्र जगाला दिसेल आणि अमेरिकन आणि ब्रिटिश वाचकांना आपण ज्याच्यावर आक्रमण केले तो देश थोडा जास्त चांगल्या प्रकारे समजेल, या भावनेतून ते बोलले.

बाथ पक्षाच्या या देशातून कोणी फारशी पुस्तके लिहिलेली नाहीत आणि जी इंग्रजी पुस्तके लिहिली गेली, ती दुसऱ्यानेच लिहिलेल्या आठवणींच्या स्वरूपात असून त्यात अनेक त्रुटी आहेत. २००३ साली जो 'महान दरोडा' घातला गेला, त्यात शेकडो सरकारी फायली व कागदपत्रं हितसंबंधी लोकांनी – शिया, अमेरिकन,

इतिहासलेखक, खंडणीबहाद्दर – यांनी पळविली; पण ते बहुतेक दस्तऐवज अरबी भाषेत हाताने लिहिलेले असून त्यांच्यात कोणतीही सुसंगती नाही. ही कागदपत्रे असंबद्ध ढिगांच्या स्वरूपात आहेत. लेखी कागदपत्रांच्या अभावी मी लोकांच्या आठवणींवर भरवसा ठेवला आहे आणि त्या त्यांच्या सोयीच्या आणि अपुऱ्या असू शकतील. कमेल सचेतच्या जीवनाबद्दलची प्रत्येक गोष्ट (एक-दोन किरकोळ अपवाद सोडून) मला एकापेक्षा जास्त व्यक्तींनी सांगितली आहे आणि त्यांच्या कथेच्या एकंदरीत स्वरूपाला अनेकांनी दुजोरा दिला आहे. मात्र लोकांनी ज्या गोष्टी स्वत:बद्दल सांगितल्या, त्यांचा खरे-खोटेपणा पडताळणे शक्य नव्हते. सांगताना एखादा भाग गाळून टाकणे आणि सोयीस्कर तेवढाच भाग सांगणे हे खोटे बोलण्यासारखेच आहे, याची मला जाणीव आहे. त्यामुळे लोक जास्तीतजास्त प्रामाणिक राहतील असा प्रयत्न मी केला; परंतु या पुस्तकाचा विषयच असा आहे की काही वेळा त्याचाही उपयोग झाला नाही. अखेरीस या गोष्टीची सत्यासत्यता मीच ठरविली आहे. त्याबाबत दुसऱ्या कोणाचे मत घेतलेले नाही.

जुलूम करण्यात सहभागी झालेल्या ज्या अधिकाऱ्यांच्या मुलाखती मी घेतल्या, त्यांच्या भावनांना किती महत्त्व द्यावे याचा विचारही मला करावा लागला. बाथ पक्षाच्या लोकांबद्दल वाटणाऱ्या सहानुभूतीबद्दल मी असं म्हणेन, की अखेरीस तीसुद्धा माणसेच आहेत आणि एखाद्याचे म्हणणेसुद्धा ऐकून घेऊ नये असा कोणी असू शकतो का? माझ्या मते कोणीच नाही. आपण जर दुसऱ्याच्या दृष्टिकोनातून स्वत:ला बघण्याचा, समजण्याचा प्रयत्न केला तर नक्कीच नाही.

बगदादमधील प्रारंभीचे दिवस

ऑगस्ट २००३. सुरुवातीचे दिवस. मला एक नाव मिळाले होते– डॉ. हसन अल् कधानी आणि एका कागदावर त्यांचा पत्ता आणि फोन नंबर. बगदादमधील इतर फोन्सप्रमाणेच तोही लागत नव्हता.

बागेभोवतालच्या भिंतीवरून गुलाबी रंगाच्या गुलाबाची एक फांदी डोकावत होती. लोखंडी दरवाजाच्या बाजूला असलेले बेलचे बटण मी दाबले; पण वीज नव्हती, त्यामुळे बेल वाजली नसावी. माझ्या दुभाष्याने आवाज दिला; बराच वेळ गेल्यावर आम्ही पुन्हा आवाज दिला. दरवाजातून एक बाई भीत भीत डोकावली आणि डॉक्टर थोड्याच वेळात परत येतील, असे म्हणाली. मला आत घुसून तिला घाबरवायचे नव्हते, म्हणून 'आम्ही इथे गाडीतच थांबतो' असे मी तिला म्हटले.

डॉ. हसन आल्यावर मी स्वत:ची ओळख दिली; ते आम्हाला आत घेऊन गेले आणि त्यांनी आम्हाला घराच्या रिसेप्शन रूममध्ये बसविले. पन्नास-पंचावन्नमधील वय, देखणा चौरस चेहरा, ब्रश केलेले काळे केस, मिशा, सडपातळ बांधा, आदबशीर, उमदे आणि थोडेसे थकलेले वाटत होते. डोळ्याभोवती काळी वर्तुळे

होती. डॉ. हसन मानसोपचारतज्ज्ञ (Psychiatrist) होते. त्यांचे शिक्षण म्युनिक आणि लंडनला झाले होते आणि ते लष्कराच्या वैद्यकीय शाखेत (Army Medical Corps) होते. ते उत्कृष्ट इंग्रजीत, जरा गंभीरपणे, सावकाश बोलत होते. एकदोनदा त्यांच्या चेहऱ्यावर मैत्रीपूर्ण स्मितही आले. त्यांना बरेच बोलायचे होते.

"मानसिक आघातामुळे येणारा ताण, आत्महत्या, स्वत:ला इजा करून घेणे." त्यांनी यादीच सांगितली – "या सर्व गोष्टी मी चार युद्धांत बघितल्या." थोडे थांबून त्यांनी युद्धांची मोजदाद केली, "हो, १९७४मधले उत्तरेतील कुर्दांविरुद्धचे युद्ध, इराणचे युद्ध, पहिले आखाती युद्ध आणि हे आत्ताचे म्हणजे– हो, चार युद्धे."

सोनेरी केसांची, नीटनेटका पोषाख केलेली त्यांची बायको कॉफीचे दोन कप घेऊन आली. मला बाहेर रस्त्यावर थांबावे लागले म्हणून डॉ. हसन माफी मागू लागले. मी हातानेच त्यांना 'ते मनावर घेऊ नका' म्हणून सांगितले.

"पण असं बघा की माझी पत्नी घाबरलेली होती. पाच दिवसांपूर्वीच आमच्या घरात चोरी झाली. पहाटे तीन माणसे घरात घुसली." त्यांनी डॉ. हसनच्या डोक्याला पिस्तूल टेकवून उठविले. दरोडेखोरांनी डॉ. हसन, त्यांची पत्नी आणि त्यांचा आठ वर्षांचा मुलगा, सर्वांना ढकलत किचनमध्ये बांधून ठेवून घर लुटले होते. १५००० डॉलर रोख, एक सोन्याचे बिस्कीट आणि बाहेर पार्क केलेल्या मर्सिडिसची चावी त्यांच्या हाती लागली. तेवढ्याने त्यांचे समाधान झाले नाही. 'तुमच्याकडे एक लाख डॉलर आहेत, हे आम्हाला माहीत आहे. कुठे आहेत ते?' त्या रकमेसाठी त्यांना डॉक्टरांच्या आठ वर्षांच्या मुलाला पळवून नेऊन ओलीस ठेवायचे होते; पण डॉक्टरांनी 'माझ्याकडे इतके पैसे नाहीत, तुम्हाला कोणीतरी चुकीची माहिती दिली आहे. माझ्या मुलाला सोडा. हवे तर कार घेऊन जा' असे सांगितले. तेवढ्यात उजाडू लागले होते म्हणून ते गेले. लुटारूंनी कालाश्निकॉवचा दस्ता पोटात मारल्यामुळे त्यांच्या पोटावर डाग पडला होता. अजून दिसणारा लाल डाग त्यांनी शर्ट वर करून दाखविला.

"माझ्या मुलाला भयंकर स्वप्नं पडतात आणि तो रडत-ओरडत उठतो." ते म्हणाले, "तो आता आमच्याजवळच झोपतो. त्याला आता बाथरूमला जायचं झालं तरी आमची सोबत लागते. मी त्याला खूप समजविण्याचा प्रयत्न केला की सगळं काही ठीक आहे. कोणालाही दुखापत झालेली नाही. सगळं काही ठीक होईल वगैरे; पण त्याचा विश्वास बसत नाही. तो आता कायम माझी गन शोधत असतो– स्वत:जवळ ठेवायला."

पण इराकमध्ये अशी एखाद्-दुसरी घटना नव्हती. अशा अनेक घटना घडल्या होत्या आणि प्रत्येक घटना म्हणजे एक जखम होती. आम्ही त्यांच्या ताज्या केसेसबद्दल बोलायला लागलो. तेवढ्यात एका स्फोटाचा आवाज आला आणि आमचे बोलणे थांबले. खिडक्यांच्या काचा हादरल्या, एका कारचा अलार्म वाजायला लागला.

डॉ. हसननी आपल्या हातांकडे बघितले व ते म्हणाले, ''मी रुग्णांच्या व्यथा समजू शकतो. त्यांच्या मनातील भीती, काळजी, नैराश्य, अस्वस्थता, निद्रानाश या सगळ्या गोष्टी मला समजू शकतात. जुन्या सरकारच्या जमान्यात एकदा मला स्वत:लासुद्धा अटक झाली होती.'' दरोडेखोरांनी वाकविलेल्या खिडकीच्या गजांमधून बाहेर बघत ते म्हणाले, ''या गोष्टी फार नाजूक आहेत.'' माझ्याकडे न बघता ते म्हणाले, ''तीन महिन्यांची एकान्तवासातील कैद... छळ झालेले अनेक लोक मी बघितले आहेत. ते उदासीन असतात. सर्वांपासून दूर राहतात, घोर नैराश्यात असतात. बरेचदा अशक्त झालेले असतात. एका डॉक्टरने दुसऱ्या डॉक्टरला ट्रीटमेंट देणं, एका मानसोपचारतज्ज्ञाने दुसऱ्या मानसोपचारतज्ज्ञावर उपचार करणं फार कठीण असतं...''

पुढच्या वेळी मी डॉ. हसनना भेटायला गेले तेव्हा गेटला लावलेली नवी आणि मोठी कुलपे उघडून आम्हाला आत घ्यायला त्यांना बराच वेळ लागला; पण मागच्या वेळेपेक्षा ते जरा बरे वाटले. ते बरेचदा स्मित करीत होते, डोळ्यांभोवतीची काळी वर्तुळे गेली होती आणि त्यांच्या पोटावरील वळ बरा होण्याच्या मार्गावर होता.

त्या उन्हाळ्यात आम्ही अनेकदा भेटलो. डॉ. हसन यांची विनोदबुद्धी परतलेली दिसत होती; पण बरेचदा त्यांचे डोळे आठवणींमध्ये हरवल्याप्रमाणे वाटायचे आणि त्यांच्या बोलण्यात एक प्रकारचा गूढ मोकळेपणा जाणवायचा. त्यांनी सर्व काही दीर्घकाळ मनात कोंडून ठेवले होते. आम्ही बोलायला लागलो की ते सावधपणे मन मोकळे करायचे. त्यांचा एक भाऊ इंग्लंडमध्ये आहे. ते म्युनिकला असताना एकदा प्रेमात पडले होते; पण नंतर त्यांना त्या मुलीला सोडावे लागले होते. ते दक्षिणेकडील शिया होते आणि त्यांनी आपल्यावर कधीच विश्वास ठेवला नाही, असे त्यांच्या बोलण्यात आले. सैनिक काम करण्यासाठी मानसिकदृष्ट्या सक्षम आहेत की नाहीत, ते प्रमाणित करणे, हा त्यांच्या जबाबदारीचा एक भाग होता. त्यांनी कर्तव्य सोडून पळालेल्या सैनिकांना गोळ्या घातलेले बघितले होते आणि मग ज्यांनी गोळ्या घातल्या, त्यांना ढासळलेली मन:स्थिती बरी करण्यासाठी ट्रीटमेंट दिली होती. त्यांचे मानसिक नैराश्य बरे केले होते आणि हेरगिरी करणाऱ्यांची चौकशीही केली होती. आम्ही अमेरिकनांबद्दल बोललो. त्यांना इराकमध्ये काय हवे होते? बाथ पक्षाच्या माजी सदस्याने अमेरिकेच्या राजवटीत काय धोरण ठेवावे, कसे वागावे? असहकार करावा की साथ द्यावी? त्यांना त्यांच्या कुटुंबाच्या सुरक्षिततेबद्दल फार काळजी वाटायला लागली होती, देश सोडून जाण्याचा विचारही त्यांनी बोलून दाखविला. पूर्वीच्या उच्चपदस्थांमध्ये सूड म्हणून करण्यात येणाऱ्या हत्या, खंडणी उकळणे, तुरुंगात टाकणे वगैरे अफवा पसरल्या होत्या. त्यांचा एक स्नेही माजी उपपंतप्रधान तारीक अझीझ यांचा सल्लागार होता, तो आता घरी बसला होता त्याची झोप आणि

भूक उडाली होती, वजन कमी झाले होते. त्याला त्याच्या राजनैतिक पासपोर्टवर प्रवास करण्याचे धाडस होत नव्हते. अमेरिकन सैनिक येऊन केव्हा अटक करतील याची तो वाट बघत होता. भीतीचे फक्त रूप बदलले. पूर्वी आम्ही सद्दामच्या भीतीत असायचो, तर आता तीच भीती ब्रेमर आणि अमेरिकनांबद्दल वाटते!

मग बोलणे हमखास नुकताच होऊन गेलेल्या सद्दामच्या काळाकडे वळायचे. सद्दाम – शिवराळ पिता, सुपरशेख, संशयी – डॉ. हसन त्याचे एकंदरीत व्यक्तिमत्त्व समजावून द्यायचा प्रयत्न करायचे; आतील माहिती, त्यांचे स्थान, त्यांचे लागेबांधे, लष्करी हुद्दा वगैरे सर्व.

'लोकांना स्वत:च्या तत्त्वांविरुद्ध जाऊन खोटे बोलायला लागायचे. पटत नसेल ते बोलायला लागायचे. तो एक मानसिक संघर्ष असायचा. अशा प्रकारच्या तणावामुळे आणि दडपणामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व नष्ट व्हायचे. त्यांना कोणताही निर्णय घेता येत नसे. सरकार सांगणार, लोकांनी कोणते शिक्षण घ्यायचे– लष्करी सेवा, नोकरी. अशी अनेक उदाहरणे दिसायची की लोक समाजापासून दूर राहायचे. त्यांना कामावर जायची भीती वाटायची. ते वरचेवर गैरहजर राहायचे. समाजाचे भय आणि उघड्यावर जायचे भय त्यांच्यामधले काही तरी. आणि सामान्य माणसातसुद्धा भीतीची लक्षणे दिसायची. उदाहरणार्थ, टेलिफोनवर बोलायचे टाळणे, अवेळी दारावरची बेल वाजण्याची भीती. ज्यांच्या बाबतीत ही लक्षणे जास्त व्हायची, त्यांची नोकरी जायची. त्यांना त्यांच्या कुटुंबीयांचा आणि मित्रांचाही संशय यायचा. पोलीस त्यांचा पाठलाग करीत आहेत, त्यांच्या हालचालींवर उपग्रहावरून लक्ष ठेवण्यात येत आहे, असे ते म्हणायचे.

ही भीती हळूहळू निर्माण व्हायची. अंगात भिनायची. 'पस्तीस वर्षे अशी काढणे म्हणजे चेष्टा नाही. तो लोकांच्या व्यक्तिमत्त्वाचा भागच होऊन जायचा.'

असे अनेक वर्षे सहन करावे लागले. डॉ. हुसेन यांनी जुलूम करणारा आणि त्याचा बळी अशा मला परिचित असलेल्या कृष्णधवल जगाचे दार उघडले नाही, तर एका मधल्याच जगाचे दर्शन घडविले. ते बाथ पक्षाचे सभासद होते; लष्कराच्या वैद्यकीय शाखेत ते जनरल या हुद्द्यापर्यंत पोहोचले होते, असे मला आढळले. त्यांचा त्या सत्तेत, त्या सरकारमध्ये सहभाग होता आणि तरीही –

आणि तरीही एक हुशार आणि सूज्ञ व्यक्ती; वेदना आणि नैतिकता, पश्चात्ताप आणि गर्व; पत्नी आणि मुलगा असलेला, अभिमान आणि अपमानाची भीती असणारा एक माणूस!

ही त्या वेळी मिळालेली या कथेची केवळ झलक होती. त्या पहाटेपूर्वीच्या काळोखात माझ्या डोक्यात काही प्रश्न धुमाकूळ घालू लागले. डॉ. हुसेनसारखी माणसे सोडून का गेली नाहीत? अशा सत्तेची सेवा ते का करीत राहिले? त्यांनी स्वत:च्या नीतिमूल्यांना मुरड कशी घातली? ते जीवन कसे जगले? स्वत:च्या

सदसद्विवेकबुद्धीचा सामना त्यांनी कसा केला?

एके दिवशी या मुद्द्यांवर बोलत असताना डॉ. हुसेन मला म्हणाले, ''तुम्ही सचेतना जाऊन भेटायला पाहिजे. ते तुम्हाला किती सांगतील मला माहीत नाही; पण ते एक इंटरेस्टिंग कुटुंब आहे. कमेल सचेत एक जनरल होते. एक अतिशय प्रसिद्ध जनरल.''

जनरल सचेत आणि त्यांची पत्नी

सचेत कुटुंब सैदियामध्ये राहायचे. सैदियामध्ये वास्तव्य करणाऱ्या लोकांमध्ये बहुसंख्येने, सरकारने बक्षीस दिलेल्या भूखंडांवर घरे बांधून राहणारे लष्करी अधिकारी होते. ही वसाहत बगदादमध्ये सर्वत्र दिसणाऱ्या घरांप्रमाणेच ठोकळ्यांसारख्या दिसणाऱ्या काँक्रीटच्या बंगल्यांची होती. १९७०च्या दशकातील तेलाच्या पैशावर बांधलेल्या, पण नंतर अमेरिकेने घातलेल्या प्रतिबंधाच्या काळात झाडेझुडपे आणि कचऱ्याच्या ढिगांचे आक्रमण झालेल्या महामार्गांच्या कडेने ही वसाहत वसली होती.

ऑगस्टमध्ये ५६ अंशावर असणारा सूर्य संध्याकाळी भर्रकन खाली जायचा आणि दिवसभर तापलेल्या शहरातील काँक्रीटमधून उष्णता बाहेर पडायची. अंधाराबरोबर येणारा गारवा नसायचा. वाऱ्याची झुळूकही नाही; पण उष्णता कमी झाल्यामुळे पाय मोकळे करायला बाहेर पडावे, एखाद्या कॅफेमध्ये कबाबच्या धुरात, सरहद्द खुली केल्यामुळे येणाऱ्या लाखो सेकंडहँड गाड्यांच्या रहदारीचा आवाज ऐकत, घामेजलेल्या कपड्यांनी, फसफसणाऱ्या कोमट पेप्सीचे घोट घेत बसावे. सरहद्द अचानक खुली केली – कस्टम्स ड्युटी नाही! एक्झिट व्हिसा नाही! इमिग्रेशन अधिकारी नाहीत! काही नाही! रस्त्यातील क्रॉसिंगला पोलिसाच्या समोरच ट्रॅफिक जॅम झाला होता. हॉर्न्सचा गदारोळ होता. पेट्रोल पंपावर चाळीस गाड्यांची रांग होती. क्यू मोडणाऱ्यावर पिस्तूल रोखणारा कोणीतरी माणूस आरडाओरडा करीत होता. रस्त्यावर काळाबाजार करणाऱ्या पोरांकडून लोक सराईतपणे 'जेलीकॅन' भरून पेट्रोल घेत होते. दुकानांमधील इंपोर्टेड वस्तूंचा फूटपाथवर ढीग ओघळला होता. सेटलाईट डिशेस, इलेक्ट्रिक फॅन्स (जरी वीज हमखास तीन तास यायची आणि मग तीन तास जायची), मोबाईल फोन (नेटवर्क लवकरच कार्यरत होईल अशी अफवा होती), सोनेरी मुलामा असलेली झुंबरे, रंगीबेरंगी दिव्यांच्या माळा, चमकणारी लाल लिपस्टिक, चित्त्याच्या कातडीसारख्या डिझाईनची लिंगरी (नवऱ्याला बायको आकर्षक वाटायला हवी, नाही का?), लहान मुलींसाठी गुलाबी रंगाच्या बाहुल्या आणि मुलांसाठी प्लॅस्टिकच्या कालाश्निकोव्ह बंदुका, उंच टाचांचे सँडल्स अशा अनेक वस्तू त्यात होत्या. तिथले पुरुष ट्रॅकसूटचे ढगळ लेंगे घालून सतत सिगारेटी फुंकत वीज, पाणी, अमेरिकन लोक, बेकारी अशा विषयांवर व्यर्थ गप्पा मारत बसले होते. स्त्रिया पायघोळ डगला घालून टोमॅटोची ओझी घेऊन जा-ये करीत होत्या. इंटरनेटच्या दुकानात मुलांची गर्दी होती. त्यात

धुळीचे थर असलेल्या जुन्या मॉनिटर्सना नाके चिकटवून 'गल्फ वॉर वन' खेळणारी, इराकी सैनिकांचा पाठलाग करणारे अमेरिकन बनून कॉम्प्युटर गेम खेळणारी मुले होती.

आम्ही दुकानांच्या गर्दीतून कारने पुढे सरकत होतो. मधेच बंदुकीतून गोळी झाडल्याचा आवाज आला. तो कदाचित कारचा बॅकफायर असेल असे स्वत:चे समाधान करून आम्ही त्याच्याकडे दुर्लक्ष केले. एका ओसाड मैदानाच्या बाजूने जात, क्रेनखालची अर्धवट बांधलेली मशीद आणि एक सोडून दिलेली पोलीसचौकी मागे टाकत, अडथळा म्हणून रस्त्यात टाकलेल्या नारळाच्या झाडांच्या ओंडक्यांमधून नागमोडी जात, रेझर वायरचा एक रोल चुकवून हिरव्या सांडपाण्याने भरलेले डबके मागे टाकून आम्ही छोटे छोटे बंगले आणि त्यांच्यापुढे कम्पाऊंडवॉलने बंदिस्त केलेली हिरवळ असणाऱ्या एका साध्या रस्त्यावर आलो.

कमेल सचेत अझीझ अल् जनाबी, 'स्पेशल फोर्स'चे प्रमुख, गल्फ युद्धात कुवेत शहरात असलेल्या सैन्याचे जनरल आणि मेसन विभागाचे गव्हर्नर होते; पण त्यांचे घर मध्यमवर्गीयांचे असावे इतके साधे व प्रसन्न होते. बाथ पक्षाच्या बड्या धेंडांचे, उंच संगमरवरी स्तंभ, ब्राँझच्या रंगाच्या काचा असलेले इमले असतात तसे नव्हते. मला ज्या औपचारिक स्वागतकक्षात बसविले गेले तो दिवाणखाना प्रशस्त, भरपूर उजेड असलेला आणि आरामशीर होता. मी काचेचा टॉप असलेल्या एका कॉफी टेबलापुढे असलेल्या सोफ्यावर बसले. टेबलावर विणलेल्या टेबलमॅट आणि प्लॅस्टिकच्या गुलाबांचा गुच्छ असलेली फुलदाणी होती. सचेत कुटुंबीयांना त्यांच्या वडिलांविषयी खूप अभिमान होता आणि ते त्यांच्याविषयी आनंदाने बोलत होते. आम्ही जेव्हा त्या पहिल्या उन्हाळ्यात भेटलो, तेव्हा आम्हा प्रत्येकाच्या मनात उत्सुकता, आशा आणि उत्कंठा होती. त्यांना मला अनेक प्रश्न विचारायचे होते. अमेरिकनांनी आक्रमण का केले? तेलासाठी का? ते आता कोणत्या प्रकारचे सरकार आणतील? पण त्यानंतरच्या हिवाळ्यात अबूघरीबबद्दलच्या अफवा, अटकसत्र, धाडी यांमुळे आम्ही सगळेच जरा नाउमेद झालो होतो. अमेरिकेविषयी त्यांच्या मनात संताप निर्माण होत होता आणि त्याबद्दल मला सतत दिलगिरी व्यक्त करावी लागत होती.

कुटुंबातील मुली एकदोनदा काहीतरी दाखविण्यासाठी म्हणून मला घराच्या आतल्या भागात घेऊन गेल्या – माझा दुभाष्या पुरुष असल्याने अर्थातच बाहेरच बसला – अलीने (दुसरा मुलगा) त्याची खोली नवी नवरी येणार म्हणून गुलाबी रेशमी कापडाने कशी सजविली आहे किंवा भरल्या वांग्याच्या भाजीसाठी वांगी कशी भरतात ते दाखविण्यासाठी; पण बहुतेकदा मी जेव्हा आठवड्यातून एक-दोनदा तिथे जायचे तेव्हा बाहेरच्या खोलीतच बसायचे आणि घरातील लोक तिथे येऊन 'हॅलो' करायचे, चहा-कॉफी आणायचे आणि मग बोलण्यासाठी बसायचे.

कमेल सचेतच्या बायकोचे नाव होते उम ओमर – म्हणजे ओमरची आई. ओमर हा त्यांचा सर्वांत मोठा मुलगा. त्यांना नऊ मुले होती. त्यांचा क्रम अंदाजे असा : शादवान, ओमर, अली, शीमा, अमानी, अहमद, झैनाब, मुस्तफा आणि झैद आणि अनेक नातवंडे. उम ओमर एक प्रेमळ आई किंवा आजी होती. 'हॅलो' करण्यासाठी त्यांच्या पद्धतीप्रमाणे तिला मिठी मारली की एखाद्या भरपूर कापूस भरलेल्या तक्क्याला कवटाळल्यासारखे वाटायचे. ती वळली किंवा हलली की पडदा हलल्यासारखे वाटायचे. ती करारी होती तशीच आपले म्हणणे सोडून देणारीही होती; मऊ आणि जाडजूड, काळ्या मखमलीत लपेटलेली. ती पूर्ण कुटुंबाची काळजी वाहणारी प्रेमळ पण कधीकधी नर्व्हस होणारी कुटुंबप्रमुख झाली होती. अधूनमधून तिला काहीतरी व्हायचे. कधी झोपच यायची नाही तर कधी पोट ठीक नसायचे. दुखायचे नाही पण आवळल्याप्रमाणे वाटायचे. एकदा एका आठवड्यात ती तीन डॉक्टरांकडे गेली आणि ढीगभर औषधे घेऊन आली – झोपेच्या गोळ्या, अँटिडिप्रेसंट गोळ्या, अँटिबायॉटिक्स आणि टायफॉइडच्या गोळ्यासुद्धा. मी एकदा तिला नीट तपासून व्यवस्थित सल्ला देण्यासाठी म्हणून माझ्या एका डॉक्टर-मित्राला घेऊन गेले. 'मला चक्कर येते, आजारी नाही पण आजारी असल्यासारखं वाटतं. हो, मागे एकदा असं झालं होतं तेव्हा फारच त्रास झाला होता. त्या वेळी मी बेशुद्धच पडले. हो, कदाचित मानसिक ताण असेल...' माझ्या डॉक्टर-मित्राने तिला मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्याचा परस्परसंबंध कसा असतो, हे समजविण्याचा प्रयत्न केला. तो तिला 'आराम करा, काळजी करू नका' असे सांगत असतानाच कुठेतरी दूरवर बॉम्बचा स्फोट झाल्याचा आवाज आला.

तिचा गोरा, गुबगुबीत, अंडाकृती चेहरा काळ्या ओढणीने लपेटलेला असायचा आणि ती रागावलेली नसेल, तेव्हा तिच्या चेहऱ्यावर एक प्रेमळ स्मित असायचे. त्या वेळी बडबड्या आणि फुगलेला अली विशीत होता आणि दरवेळी भेटला की आणखी लठ्ठ झाल्यासारखा वाटायचा. तो म्हणाला की ते लहान असताना ती फार कडक होती आणि अभ्यासाकडे दुर्लक्ष केले किंवा घरात पळापळी करताना एखादी वस्तू पाडली किंवा मोडली किंवा फोडली की ती आम्हाला चप्पल नाही तर लाटणे वगैरे फेकून मारायची; पण ती इतकी कडक होती अशी कल्पना करणे अशक्य नसले तरी कठीण वाटायचे. ती सोनेरी चष्मा घालायची आणि एकेकाळी ती शिक्षिका होती, यावर विश्वास बसायचा. कधीकधी तर सगळ्यांमध्ये तीच जास्त खट्याळ आहे असे वाटायचे; तिची मुले सद्दामच्या सरकारच्या कडक नियमांच्या जाचात आणि वडिलांच्या कठोर शिस्तीत वाढली; पण उम ओमर जरा सहिष्णु वातावरणात वाढली होती. बरेचदा ती खट्याळ हसायची, जवळजवळ लहान मुलीसारखी, मुठी वळून डोळे वर फिरवायची – जणू काही हे इतके मनावर घेण्यासारखे नाही, असे तिला सुचवायचे असावे आणि मग ती घाबरल्यासारखे

करून आपला पोरकटपणा गंभीर आणि धार्मिक स्वभावाच्या अहमदच्या नजरेला तर पडला नाही ना याची खात्री करण्यासाठी खांद्यावरून मागे बघायची.

२००३ मध्ये एके दिवशी दुपारी मी तिला भेटायला गेले तेव्हा तिचे हात लाल दिसले.

'ओह! समजले मी. मी शादवानच्या केसांना मेंदी लावत होते आणि हे बघा,' असे म्हणत तिने हाताचे तळवे दाखवले.

''आणि तू फाव्याच्या शेंगाही सोलत होतीस.'' मी म्हणाले. किचनच्या दरवाजाजवळ सालांनी भरलेल्या दोन थैल्याही मला दिसल्या होत्या.

''हो, फार गोड आहेत. आताच त्यांचा मोसम असतो.'' उम ओमर तिचा डगला नीट करीत म्हणाली, ''पण दाणे काढायला फार वेळ लागतो.'' तिने अंगावर शहारे आल्यासारखे केले आणि एखादी उशी थोपटावी तसे गुडघे थोपटले.

तेवढ्यात शादवान, तिची तीस वर्षांची आणि अजून लग्न न केलेली सर्वांत मोठी मुलगी, हातात एका मोठ्या थाळ्यात भात आणि उसळ घेऊन आली. उम ओमरने खूश होऊन तिच्याकडे एक दृष्टिक्षेप केला. शादवानने प्रसन्न स्मित केले. तिच्या मागोमाग दुसरी मुलगी अमानी – चवळीच्या शेंगेसारखी शेलाटी, किंचित फिकट वर्ण, अंडाकृती चेहरा – दह्याचे वाडगे घेऊन आली. तिने नम्रपणे माझ्याकडे बघून नजरेनेच अभिवादन केले. तिने काचेच्या टेबलावर काळजीपूर्वक, आवाज होऊ न देता वाडगे ठेवले आणि ती आतल्या खोलीत निघून गेली. तिच्या चालण्यात किंचित दोष आहे असे मला जाणवले.

''खा, खा!'' संपूर्ण जनाबी जमातीला पुरून उरेल एवढा भाताचा ढीग आणि उसळ यांच्याकडे गार्डाच्या बावट्याप्रमाणे हात हलवत ती मला म्हणाली. आम्ही खायला सुरुवात केली. उम ओमरने हात वर करून कोपरापर्यंत बाह्या वर केल्या.

''आवडली उसळ? मला नेहमी काळजी वाटते नीट होईल की नाही म्हणून. आपण लक्ष दिलं नाही तर पदार्थ छान होतो आणि चांगला व्हावा म्हणून मुद्दाम लक्ष देऊन केला तर हमखास चांगला होत नाही.'' ती म्हणाली.

उम ओमर नुकतीच मक्क्याला जाऊन आली होती. ती प्रथमच इराकच्या बाहेर पडली होती. हज यात्रेसाठी प्रत्येक मुस्लीम देशाला यात्रेकरूंची संख्या ठरवून देतात आणि यात्रेकरूंची लॉटरीने निवड करतात. उम ओमरने अर्ज केला होता आणि तिचा नंबर लागला. तिने माझ्यासाठीसुद्धा प्रार्थना केली आणि माझ्यासाठी भेट म्हणून एक हँडबॅग घेऊन आली. तिने मला एका छोट्या ग्लासात आणलेल्या पवित्र जलाचा – झमझमचा – घोट घ्यायला लावला. त्यांनी थोडेसेच आणलेले झमझम संपेल म्हणून जास्त घ्यायला मी नकार दिला, पण ती म्हणाली, ''तू काळजी करू नकोस. आम्ही खूप आणलं आहे.''

''कशी झाली यात्रा?'' मी विचारले.

''छान झाली. खूप इंटरेस्टिंग. पण फार थकवा आला.''

त्यांना मक्केला पोहोचायला पाच दिवस लागले होते. त्यांना बसने सफवानला नेले. तिथे यात्रेकरूंसाठी कायमचे उभारलेले तंबू होते. त्यात त्यांना थांबावे लागले. 'टॉयलेट्स फारच घाण होत्या.' उम ओमर अंगावर शहारे आणून म्हणाली.

''आम्हाला शेळ्या-मेंढ्यांसारखं वागवलं; पण आमच्या आधीच्या जथ्थ्याचे तर फारच हाल झाले. त्यांना पाच दिवस सफवानमध्ये राहावं लागलं.'' आकाशाकडे हात करीत ती म्हणाली. सफवानहून एका शाळेच्या पिवळ्या बसने ते कुवेतला गेले. आधी उम ओमरच्या ओळखीचे कोणीच नव्हते; पण मग तिच्यासारख्या एकट्या आलेल्या स्त्रियांशी तिची मैत्री झाली. बगदादच्या मन्सूर भागातून आलेल्या एका बाईशी तिची खास मैत्री झाली. ''ती वहाबी होती. पण फार चांगली होती.'' उम ओमर म्हणाली. वहाबी हा मुस्लीम धर्मातील एक कडवा पंथ आहे. त्या वहाबी बाईने उम ओमरला वाचण्यासाठी काही धार्मिक पत्रके आणि पोथ्या दिल्या. ''पण मी काही त्या वाचल्या नाहीत... आणि घरी आल्यावर तर विचारूच नकोस. ती पत्रकं आणि पोथ्या बघून सगळ्यांनी असा आरडाओरडा केला. अहमदने ती सगळी पत्रकं आणि पोथ्या, धर्मविरोधी आहेत असं म्हणत जप्त केल्या.'' उम ओमर म्हणाली.

कुवेतमध्ये यात्रेकरूंना राहण्यासाठी व्यवस्था फार चांगली होती. एखाद्या छोट्या गावासारखीच वसाहत होती. बाथरूम्स स्वच्छ होत्या, जेवण चांगलं होतं. मग विमानात बसायची वेळ आली. उम ओमरने आधी कधीच विमानप्रवास केला नव्हता. त्यामुळे ती जरा नर्व्हस झाली होती; पण तिला तो प्रवास आवडला. हवाई सुंदरी खरोखरीच सुंदर होत्या. ''त्या टर्कीमधल्या होत्या आणि जेवण तर मी कधीच घेतलं नसेल इतकं छान होतं.''

ते विमानाने जेद्दाला गेले आणि तिथून मक्केला. मक्केला इराकी यात्रेकरूंची सोय एका चांगल्या हॉटेलमध्ये केली होती. त्या हॉटेलात लिफ्ट होती. तिची उम ओमरला खूप भीती वाटली. न्याहारीच्या वेळेस छोट्या छोट्या पाकिटांमध्ये मध, दूध, संत्र्यांचा रस, चीज वगैरे न भरलेल्या परड्या ठेवलेल्या असायच्या. त्या उम ओमरला फार आवडल्या.

''पण मक्केला खूप लोक होते आणि सगळीकडून आलेले!'' खूपच गर्दी होती आणि तुम्ही तिच्यामधे सापडलात तर बाहेर पडणे कठीण. पुढे जाणाऱ्या लोकांचा रेटा एवढा होता की माऊंट अराफतला जाताना गुडघे टेकून प्रार्थना करणाऱ्या लोकांवर मागून येणारे लोक आदळायचे आणि पडायचे. एका म्हाताऱ्या माणसाला अडखळून इतके लोक पडत होते की अखेरीस इतर यात्रेकरूंनी त्याची मान पकडून त्याला बाजूला खेचले आणि अल्लाची शपथ घालून 'नंतर प्रार्थना कर' म्हणून बजावले. उम ओमरला खांबातल्या सैतानाला दगड मारायचे होते; पण तिथे तर चेंगराचेंगरी व्हायची खूप शक्यता होती. त्यामुळे तिने तिच्या वतीने फेकून मारण्यासाठी

म्हणून दोन वेगवेगळ्या माणसांना दोन दगड दिले. 'दोघांना द्यायचे कारण त्यातला एखादा विसरला तर दुसरा तरी मारेल.'

सर्व पुरुषांनी एक खांदा उघडा राहील असे पांढरे डगले घातले होते. बायका अर्थात 'हिजाब' (संपूर्ण अंग झाकणारा बुरखा) असल्यामुळे काहीही घालू शकत होत्या.

''इंडोनेशियाहून आलेल्या काही बायकांनी सौंदर्य प्रसाधने आणि निळी आयशॅडोसुद्धा लावली होती.'' उम ओमरला धक्काच बसला आणि शियांनी हुसेनचे चित्र आणले होते तेही योग्य नव्हते. इंग्लंडहून आलेल्या काही यात्रेकरूंनी तिला काही पुस्तके आणि पत्रके दिली. पण छे, तिने ती घेतली नाहीत. तिने हातवारे करून कसा नकार दिला ते दाखविले; पण त्यांच्या गटातील इतर इराकी यात्रेकरूंची वागणूक तिला तेवढी आवडली नाही. प्रत्येक बारीक-सारीक गोष्टींवरून ते भांडायचे, हटून बसायचे. उम ओमर म्हणाली की हाज यात्रेसाठी जेव्हा तिची निवड झाली, तेव्हा त्यांच्या गटाच्या प्रमुखाला तिने विचारले की बरोबर आणायच्या वस्तूंमध्ये सर्वांत महत्त्वाची गोष्ट कोणती? यावर तो म्हणाला की हज यात्रेला जाताना बरोबर बाळगायची सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे सोशिकता. जेव्हा जेव्हा एखाद्या रांगेत थांबायला लागायचे किंवा एखाद्या गोष्टीला वेळ लागायचा, तेव्हा तेव्हा ती शांतपणे थांबायची. इतर इराकी जराही सोशिकता दाखवायचे नाहीत, अशी तिची तक्रार होती. उदाहरणार्थ, मदिना या दुसऱ्या महत्त्वपूर्ण शहरात परतीच्या प्रवासात तिला जास्त राहायचे होते; प्रेषिताच्या समाधीच्या ठिकाणी दोन दिवस पुरेसे नव्हते; पण त्यावर इतका वाद झाला की अखेरीस त्यांना लवकर निघावे लागले.

''आणि तुला माहीत आहे, बहुतेक सर्व सौदी लोक वहाबी आहेत आणि मोहम्मद किंवा अलीपुढे प्रार्थना करणे त्यांना मान्य नाही. कारण ते म्हणतात की तेसुद्धा माणूसच आहेत, अल्ला एकच आहे आणि ते म्हणतात ते बरोबर आहे. मला त्यांचं म्हणणं पटलं; पण त्यांनी आम्हाला आमच्या नातेवाइकांची आणि मित्रांची पत्रे प्रेषित मोहम्मदाच्या थडग्यात टाकू दिली नाहीत. माझ्याकडे शादवाननी दिलेलं पत्र होतं आणि मी ते टाकून दिलं. शादवान हिरमुसली झाली आणि तिने खांदे उडविले. आणि मला भेट म्हणून एक मोबाईल फोन घ्यायचा होता, ज्याच्यावर गाणी ऐकता येतील असा; पण त्यांनी मला घेऊ दिला नाही. 'संगीत हराम आहे' असं त्यांचं म्हणणं. असं का? मला तर तो एका लहान मुलाला भेट द्यायचा होता! उम ओमर हाताचे तळवे दाखवत उद्‌गारली. ''अर्थात हज म्हणजे एक वेगळाच अनुभव. काय वाटतं त्याचं वर्णन करता येत नाही. त्याची दुसऱ्या कशाशीही तुलना करता येणार नाही.'' उम ओमरने दृष्टी वळविली आणि मग पुन्हा माझ्याकडे बघून म्हणाली, ''पण गैरसोय खूपच!'' गेल्याबद्दल तिला आनंद झाला होता; पण पुन्हा जायची तिची इच्छा नव्हती. एकदा गेली ते पुरे होते. 'ती देवाची आज्ञा आहे, आपले कर्तव्य आहे.'

अहमद आत आला. तो सतरा वर्षांचा होता आणि बगदादच्या धार्मिक विद्यापीठात शिकत होता. त्याने एक फिकट पिवळ्या रंगाचा दिसदशा घातला होता, अगदी स्वच्छ आणि इस्त्री केलेला. त्याने वाकून हृदयावर हात ठेवून, त्याच्या लांब पापण्या फडकावीत मला अभिवादन केले. आपणसुद्धा कधीतरी हजला जाऊ अशी आशा त्याने व्यक्त केली.

मक्केत केलेली एक प्रार्थना ही इतर ठिकाणी केलेल्या एक लाख प्रार्थनांच्या तोडीची असते. हो, अगदी निश्चित आणि मदिनात केलेली एक प्रार्थना ही दहा हजार प्रार्थनांच्या बरोबरीची असते. जेरूसलेमच्या खडकातील घुमटातल्याप्रमाणे.

''मी त्या वेळी हिजाब वापरत नसे.'' उम ओमर आणि मी अशा दोघीच गप्पा मारत बसलो होतो. तिचे लहानपण कसे गेले, नवरा कसा भेटला, सर्व काही मला पहिल्यापासून ऐकायचे आहे आणि असले तर फोटोसुद्धा बघायचे आहेत, असे मी तिला म्हणाले होते.

''फोटो फार नाहीत.'' उम ओमर म्हणाली. ती आत गेली आणि फोटोंचे एक खोके घेऊन आली. फोटो दाखवत, त्यातील तरुणपणीच्या शम्हची छबी कौतुकाने बघत स्वत:ला खोटा खोटा दोष देत उम ओमर म्हणाली, ''त्या वेळी माझा नवरा धार्मिक वृत्तीचा माणूस असता तर त्यांनी माझ्याशी कधीच लग्न केले नसते!'' उम ओमर माझ्याजवळ सरकली आणि तो काळ आठवून हसली. ''अहमद नाहीये ते बरं आहे...'' तिने स्मित दाबले. अहमद नक्कीच रागावला असता.

शम्ह शिक्षक होण्यासाठी बगदाद विद्यापीठात गेली – तिची कोणतीच बहीण कॉलेजात गेली नव्हती. खूप शिकावे अशी तिची महत्त्वाकांक्षा होती. कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाला असताना जवळपास राहणारा एक तरुण आपल्यामागे असतो, असे तिच्या लक्षात आले. तो बसस्टॉपवर पोलिसांच्या गणवेषात असायचा. त्याला आपण आवडलेले दिसतो, या भावनेने ती सुखावून जायची; पण एके दिवशी बसमध्ये तो शेजारी बसेपर्यंत ती त्याच्याशी बोलली नव्हती. आपले नाव कमेल असल्याचे सांगून त्याने तिला आपल्याबद्दल माहिती दिली आणि 'मला तुझ्याशी लग्न करायला आवडेल,' असे सांगितले. शम्ह मोहरली, त्याच्या बोलण्यावरून तिला त्याच्या हेतूबद्दल शंका राहिली नाही. सचेत कुटुंब प्रसिद्ध होते. शम्हने तिच्या वहिनीला त्याच्याबद्दल सांगितले आणि थोड्याच दिवसांत तो तिच्या आई-वडिलांना औपचारिकरीत्या भेटण्यासाठी त्याच्या आईवडिलांना घेऊन आला. शम्हने एका अटीवर त्याच्याशी लग्न करावयाची तयारी दाखविली; घर घेऊन वेगळे राहायचे; पण पोलीस खात्यातील पगारात कमेलला ताबडतोब घर घेणे शक्य नव्हते. त्यामुळे त्यांचे लग्न लांबणीवर पडले.

तोंडावर हाताचा आडपडदा करून लटकी भीती दाखवत उम ओमरने त्यांच्या

दोन कुटुंबांमधील तफावत माझ्या कानात कुजबुजत सांगितली : तिचे कुटुंब शहरी आणि सुखवस्तू होते, तर त्याचे कुटुंब नुकतेच खेड्यातून शहरात आले होते आणि अजून जरा बेदू (खेडवळ) वळणाचे होते. ''तुला सांगते, त्याचे आई-वडील जरा 'अरबी' होते, त्यामुळे मला त्याच्या कुटुंबाबरोबर राहायचे नव्हते.''

■



वसुंधरा

आता नव्या स्वरूपात

निरंजन घाटे

किंमत : २५०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.

आपल्या देशात शास्त्रीय कुतुहलच नाही. त्यामुळे विज्ञानाची जोपासना आपल्याकडे दिसून येत नाही. परिणामी देशी भाषेत विज्ञानविषयक साहित्यच नाही. आम्ही विज्ञानाने बहाल केलेल्या असंख्य इहलोकी उपयुक्त ठरलेल्या वस्तूंचा स्वीकार करतो. त्यांचा वापर करतो. त्या वस्तूंच्या मुळाशी असलेल्या विज्ञानविषयक संशोधनाच्या बाबतीत मात्र उदासीन असतो. ज्या पृथ्वीवर आपण राहतो तिची घडण कशी झाली आहे याचे साधे कुतुहलदेखील आमच्या मनात नसते. दुर्दैवाने बालवयात त्या विषयाची गोडी लागावी यासाठी कसून प्रयत्नही होत नाहीत. अशा वातावरणात तुमच्या प्रयत्नाला फार महत्त्व आहे.

६वी आवृत्ती

बुद्धिबळ शिका

ना. रा. वडनप

किंमत : १३०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.



'बुद्धिबळ खेळ' म्हणजे दोन बुद्धीवंतामधील लढा आहे. बुद्धिबळ खेळ एक श्रमिक कार्य होऊ शकते किंवा बुद्धिबळ खेळ श्रमपरिहारक मौजेची लूट होऊ शकते.तेव्हा बुद्धिबळाचा डाव म्हणजे माणसाच्या मेंदूला उत्तम व्यायाम घडवून त्याचा तल्लखपणा वाढविणारा सोज्वळ करमणुकीचा उच्च प्रकार होय.हे सारे नवोदितांना सहज समजण्यासाठी 'बुद्धिबळ शिका' हे खास पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकात बुद्धिबळे खेळण्याची तंत्रे व सुत्रे अनेक आकृत्यानिशी समजावून सांगितली आहेत. खेळाचे नियमही दिले आहेत. प्रत्येक प्रकारणाशेवटी स्वाध्यायासाठी चाचणी-प्रश्न टाकले आहेत आणि जिज्ञासू वाचकांना आपापली उत्तरेही दिली आहेत. कुठलाही खेळ म्हटला,की त्यात करमणूक ही आलीच; परंतु करमणुकीबरोबर बुद्धीचापल्य,मनाची एकग्रता,सोशिकपणे व तर्कशास्त्राचा योग्य उपयोग या गोष्टीही बुद्धिबळाच्या खेळातून सहज सध्या होतात.हे सारे पाहून ज्यांना हा खेळ शिकण्याची तीव्र इच्छा होते,अशा नवोदितांसाठी किंवा नियमित खेळाडूंसाठी हे मार्गदर्शन पुस्तक तयार केले आहे.त्यांना ते आवडेल आणि उपयुक्त ठरेल, आणि मार्गदर्शक म्हणून नित्य हाताशी ठेवावेसे वाटेल.

❀ नामदेव ढसाळ यांचे निधन



प्रस्थापितांच्या मराठी साहित्याला हादरा देणारे, जातीव्यवस्थेच्या विरोधात सत्तरच्या दशकात लढाऊ संघटना उभारून दलितांच्या मानवमुक्तीच्या लढ्याला आगळेवेगळे परिणाम देणारे ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत, दलित पँथरचे संस्थापक नामदेव ढसाळ 'पद्मश्री' यांचे १५ जानेवारी रोजी बॉम्बे हॉस्पिटलमध्ये निधन झाले. ते कर्करोगाच्या विकाराने त्रस्त होते.

त्यांच्या पश्चात पत्नी कवयित्री मल्लिका अमरशेख आणि मुलगा चित्रकार आशुतोष असा परिवार आहे. नामदेव ढसाळ गेली अनेक वर्षे 'मायस्थेनिया ग्रेव्हिस' या दुर्धर आजाराने त्रस्त होते. त्या आजाराशी मुकाबला करीत असतानाच, त्यांना आतड्याच्या कर्करोगाचा विकार जडला. त्यावर ते गेले दोन महिने बॉम्बे हॉस्पिटलमध्ये उपचार घेत होते.

पुणे जिल्ह्यातील राजगुरुनगरनजीकच्या कनेसर खेडेगावात जन्मलेले ढसाळ घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्यामुळे वडिलांसोबत मुंबईत आले. सुरुवातीला टॅक्सी चालवून उदरनिर्वाह करणारे ढसाळ हे तत्कालीन कामगार नेते जॉर्ज फर्नांडिस यांच्या संपर्कात आले. त्यांनी उपेक्षितांच्या खास करून शरीरविक्रय करणाऱ्या महिलांच्या हक्कांसाठी काढलेला मोर्चा गाजला. पुणे जिल्ह्यातील इंदापूर बावडा येथील दलित कुटुंबावर सवर्णांनी टाकलेल्या बहिष्काराचे प्रकरण कमालीचे गाजले. त्यावेळी अनेक संघटनांतर्फे काढण्यात आलेल्या मुंबईतील मोर्चातील ढसाळ यांचे जहाल भाषण अनेकांना आवडले नाही. त्यामुळे अमेरिकन ब्लॅक पँथरची प्रेरणा घेऊन त्यांनी १९७२ मध्ये 'दलित पँथर' स्थापन केली. या संघटनेने महाराष्ट्रात

एकच रान उठवले आणि दलितांचे हक्क ऐरणीवर आणले.

माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची सभा उधळणे, शंकराचार्य यांच्याशी वाद घालणे आणि दलितांना मानवमुक्ती नाकारणाऱ्या व्यवस्थेच्या विरोधात कविता व लेखांच्या माध्यमातून एल्गार उभारणे यामुळे हा नेता दलित युवकांच्या गळ्यातील ताईत बनला. संपूर्ण आयुष्य बंडखोरीने जगणाऱ्या ढसाळ यांच्या निधनामुळे राजकीय, सामाजिक, साहित्यिक व उपेक्षितांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या संघटनांना धक्काच बसला आहे.

सहकार महर्षी विखे पाटील साहित्य पुरस्कार, साहित्य अकादमी - जीवनगौरव, गंगाधर गाडगीळ साहित्य पुरस्कार, डॉ. आंबेडकर पुरस्कार, पुणे विद्यापीठाचा जीवन साधना पुरस्कार २०१०. हे पुरस्कार त्यांना मिळाले.

* साहित्यसंपदा, कवितासंग्रह :

गोलपीठा (१९७२) मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले (१९७५) आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र : प्रियदर्शिनी (१९७६), तुही इयत्ता कंची (१९८१), खेळ (१९८३), गांडू बगीचा (१९८६) या सत्तेत जीव रमत नाही (१९९५), मी मारले सुर्याच्या रथाचे सात घोडे (२००५), तुझे बोट धरून चाललो आहे मी (२००६), मी भयंकराच्या दरवाजात उभा आहे (निवडक कविता) - संपादन सतीश काळसेकर (२००७), निर्वाणाअगोदरची पीडा (२०१०) ही त्यांची ग्रंथसंपदा

* ढसाळांच्या कवितांचे अनुवाद :

'नामदेव ढसाळ - पोपट ऑफ दि अंडरवर्ल्ड' : दिलीप चित्रे

हमारे इतिहास का अपरिहार्य चरित्र : प्रियदर्शिनी - रतनलाल सोनग्रा

* कादंबरी :

हाडकी हाडवळा (१९८१), निगेटिव्ह स्पेस (१९८७)

* अन्य गद्यलेखन :

आंधळे शतक (१९९५), आंबेडकरी चळवळ आणि सोशालिस्ट कम्युनिस्ट (२००६), सर्व काही समष्टीसाठी (२००६), बुद्ध धर्म आणि शेष प्रश्न.

✽ ज्येष्ठ कवी श्री. दि. इनामदार यांचे निधन

'मराठवाड्याचे रवींद्रनाथ टागोर' अशी ख्याती असलेले प्रसिद्ध कवी श्री. दि. इनामदार (वय ८६) यांचे १ जानेवारी रोजी निधन झाले. गेल्या काही महिन्यांपासून ते आजारी होते. आपल्या तरल कवितांतून श्रीदिंनी स्वतंत्र चाहतावर्ग निर्माण केला होता.

सत्तर व ऐंशीच्या दशकातील आघाडीच्या कवींमध्ये श्री. दि. इनामदार यांचा समावेश होता. 'शिवगान' हा त्यांचा पहिला कवितासंग्रह १९८२ मध्ये प्रकाशित झाला. त्यानंतर 'फूल फुलता राहिना' ,'नभ मातीच्या कुशीत', 'दिंडी जाय दिगंतरा',

'सत्यं वद गोदावरी', 'दिवे सोडिले प्रवाही', 'बुद्धिदाता श्रीगणेश', 'जाऊ अमृताचे बावा', 'हे माय मातृभूमी', 'श्रीरामरक्षा', 'मुक्तीचा येळकोट', 'अपरिग्रहाचा महामेरू' अशी मोठी साहित्यसंपदा वाचकांच्या भेटीला आली. लातूर जिल्ह्यातील खामगाव येथे पाच फेब्रुवारी १९२८ रोजी त्यांचा जन्म झाला. निझामी राजवटीत शिक्षण पूर्ण झालेल्या श्रीदिंचा मोठा काळ स्टेट बँक ऑफ हैदराबादच्या नोकरीत गेला. अनेक पुरस्कारांनी त्यांचा गौरव करण्यात आला होता.

❀ सर्जेराव घोरपडे यांचे निधन

'प्रेस्टिज प्रकाशन' संस्थेचे संस्थापक सर्जेराव घोरपडे यांचे निधन झाले. ते ८२ वर्षांचे होते. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, मुलगी, नातवंडे असा परिवार आहे.

घोरपडे हे मूळचे सांगली जिल्ह्यातील होते. त्यांचा जन्म कवठेमहांकाळ येथे झाला होता. सांगलीतील विलिंग्डन कॉलेजमधून त्यांनी कलाशाखेची पदवी संपादन केली होती. १९५२ मध्ये घोरपडे कुटुंबीय पुण्यात आले. सुरुवातीला सुदर्शन मासिकामध्ये त्यांनी नोकरी केली. तर १९६५ च्या सुमारास त्यांनी प्रिंटिंग प्रेस सुरू केला. तसेच प्रकाशन व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवली.

यशवंतराव चव्हाण यांच्याशी त्यांचा निकटचा संबंध होता. त्यामुळे, 'कृष्णाकाठ,' 'भूमिका' आणि 'ऋणानुबंध' ही त्यांची तीन पुस्तके त्यांनी प्रसिद्ध केली होती. ज्येष्ठ पत्रकार गोविंद तळवलकर यांचीही 'अग्रलेख', 'वाचता-वाचता' वगैरे पुस्तके त्यांनी प्रसिद्ध केली होती. प्रकाशन व्यवसायात सुबक निर्मितीमूल्यांचा अंतर्भाव असला पाहिजे, हा त्यांचा ध्यास होता.

❀ ज्येष्ठ पत्रकार डोईफोडे यांचे निधन

व्यासंगी संपादक, लढवय्या स्वातंत्र्यसेनानी सुधाकर विनायकराव डोईफोडे (वय ७८) यांचे २२ जानेवारी रोजी हैदराबाद येथील खासगी रुग्णालयात निधन झाले.

गेल्या काही दिवसांपासून यकृताच्या आजाराने ते त्रस्त होते. नांदेडमध्ये उपचार केल्यानंतर त्यांना हैदराबाद येथे हलविण्यात आले होते. त्यांच्यामागे पत्नी, दोन मुलगे, सुना, बहिण, पाच भाऊ, नातू-पणतू असा परिवार आहे. ध्येयवादी पत्रकार, सामाजिक विचारवंत, समाजहितासाठी धडपडणारा सामाजिक कार्यकर्ता, रेल्वे प्रश्नाचे गाढे अभ्यासक, सर्जनशील लेखक, प्रभावी वक्ते अशा विविध अंगांनी संपूर्ण महाराष्ट्राला व्यापून टाकणारे व्यक्तिमत्त्व म्हणून डोईफोडे यांची ओळख होती.

गेल्या सहा दशकापासून डोईफोडे यांनी 'प्रजावाणी'च्या माध्यमातून विविध प्रश्न व विषयांवर परखडपणे आपली लेखणी चालविली निर्भीड, चतुरस्त्र व दूरदृष्टीचे पत्रकार-संपादक म्हणून ते परिचित होते. 'सुधाकर डोईफोडे यांच्या

निधनाने मराठी वृत्तपत्रसृष्टीतील झुंझार पत्रकार हरपला आहे,' अशा शब्दांत मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी शोक व्यक्त केला आहे.

✽ ज्येष्ठ पत्रकार द्वारकानाथ लेले यांचे निधन

साने गुरुजी कथामालेचे कार्यकर्ते आणि ज्येष्ठ पत्रकार द्वारकानाथ लेले यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८१ वर्षांचे होते. त्यांच्या मागे दोन विवाहित मुली, जावई व नातवंडे असा परिवार आहे. पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विभागातील प्रा. डॉ. उज्ज्वला बर्वे त्यांचे ते पिता होत.

लेले यांनी टपाल खात्यात काही काळ काम केले. 'समाचार भारती' या वृत्तसंस्थेचे पुण्यातील प्रतिनिधी म्हणून त्यांनी काम केले. दै. सकाळमध्ये त्यांनी दीर्घ काळ पत्रकारिता केली. स्वराज्य साप्ताहिकाचे ते संपादकही होते. पुण्यातील पत्रकारनगरच्या उभारणीत त्यांचे योगदान मोलाचे होते.

साने गुरुजी कथामालेचे कार्यकर्ते म्हणून त्यांनी अनेक वर्षे काम केले. अंध:श्रद्धा निर्मूलन समिती, सदाचार भारती, पनवेल येथील शांतिबन वृद्धाश्रम आदी संस्थांच्या कामातही त्यांचा सक्रिय सहभाग होता. लेले यांच्या पार्थिवावर वैकुंठ स्मशानभूमीत कोणतेही धार्मिक विधी न करता अंत्यसंस्कार करण्यात आले.

✽ भाषातज्ज्ञ आशा मुंडले यांचे निधन

प्रसिद्ध भाषातज्ज्ञ आशा मुंडले (७४) यांचे किडनीच्या आजाराने मुंबईच्या लीलावती हॉस्पिटलमध्ये निधन झाले. प्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञ अशोक केळकर यांच्या त्या भगिनी होत. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, मुलगी आणि नातवंडे असा परिवार आहे.

मुंडले भाषाशास्त्र विषयात पारंगत होत्या. नोकरीच्या निमित्ताने भारतात येणाऱ्या विदेशी कर्मचाऱ्यांना भारतीय भाषा शिकविण्यात त्यांचा हातखंडा होता. त्यासाठी त्यांनी खास भाषा शिकविण्याचे तंत्रही विकसित केले होते. याशिवाय स्त्रियांना वैचारिक देवाण-घेवाण करण्यासाठी खुले व्यासपीठ उपलब्ध व्हावे, या उद्देशाने त्यांनी पुण्यात महिलांची एक संघटनाही चालवली. भाषाविकासविषयक सरकारी आस्थापनांमध्ये त्यांनी अनेक उच्च पदे भूषविली होती. दिल्लीत बदली झाल्यानंतर काही वर्षे त्यांनी तेथेही वाङ्मय संशोधनविषयक भरीव कामे केली.

✽ विद्रोही कवी सपकाळे यांचे निधन

महाराष्ट्रातील पहिल्या पिढीतील ज्येष्ठ विद्रोही कवी त्र्यंबक सपकाळे (वय ८४) यांचे १३ जानेवारीला वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, नातवंडे असा मोठा परिवार आहे. 'सुरुंग' ही त्यांची पहिली कविता 'अस्मितादर्श'च्या अंकामध्ये १९६७ मध्ये प्रसिद्ध झाली आणि कवी त्र्यंबक

सपकाळे म्हणून उदयास आले. विद्रोह आणि समाजातील रंजल्या-गांजल्या आणि उपेक्षित असलेल्या समाजाने जे भोगले, ते कवी त्र्यंबक सपकाळे यांनी कवितेतून समाजापर्यंत पोचविले.

❀ ज्येष्ठ गायिका लक्ष्मी शंकर यांचे निधन

हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील ज्येष्ठ गायिका लक्ष्मी शंकर यांचे ३० डिसेंबर रोजी अमेरिकेत निधन झाले. कर्नाटकी शास्त्रीय संगीताची पार्श्वभूमी असताना त्यांनी गायनाचे प्रशिक्षण उत्तर भारतीय संगीताची परंपरा असलेल्या पतियाळा घराण्याचे उस्ताद अब्दुल रेहमान खान यांच्याकडून घेतले होते. ख्याल, ठुमरी, भजन यासारख्या गायन प्रकारात त्यांनी प्रभुत्व मिळवले होते. त्यानंतर त्यांनी प्रा. बी. आर. देवधर व सतारवादक रविशंकर यांच्याकडूनही संगीताचे धडे घेतले.

रविशंकर यांच्या अनेक संगीत कार्यक्रमात त्या सहभागी होत्या. त्यांच्या सुमधुर आवाजातून संगीताचा भावनिक आशय सहज व्यक्त होत असे. पाश्चिमात्य देशात भारतीय शास्त्रीय संगीत लोकप्रिय करण्यात त्यांचा मोठा वाटा होता. लक्ष्मीशंकर यांनी सुरुवातीला उदयशंकर यांच्याकडून नृत्याचे प्रशिक्षण घेतले, पण आजारपणानंतर त्यांनी नृत्याची वाट सोडून गायनाची वाट धरली. त्यांच्या गायनाच्या अनेक ध्वनिमुद्रिकाही उपलब्ध आहेत. सर रिचर्ड ॲटेनबरो यांच्या गांधी चित्रपटासह काही चित्रपटांना स्वरसाजही त्यांनी दिला होता. लक्ष्मीशंकर यांचा विवाह सतारवादक रविशंकर यांचे बंधू राजेंद्र शंकर यांच्याशी झाला होता.

❀ दाजीकाका गाडगीळ यांचे निधन

सराफी व्यवसायाला सोनेरी झळाळी प्राप्त करून देणाऱ्या पु. ना. गाडगीळ ज्वेलर्स (पीएनजी) या सराफी पेढीचे संस्थापक व ज्येष्ठ सराफी व्यावसायिक अनंत गणेश ऊर्फ दाजीकाका गाडगीळ यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ९१ वर्षांचे होते. सामाजिक क्षेत्रातही त्यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण कार्याद्वारे ठसा उमटविला.

स्वच्छ पोशाख, धोतर, कोट, टोपी परिधान केलेले आणि हसरा चेहरा आणि

मृदू, मिठ्ठास भाषेमुळे कुणालाही आपलेसे करणारे दाजीकाका गाडगीळ म्हणजे बावन्नकशी व्यक्तिमत्त्वच. अनंत गणेश गाडगीळ हे त्यांचं पूर्ण नाव. त्यांचा जन्म सांगलीजवळ बुधगाव मळ्यामध्ये ११ सप्टेंबर १९१५ रोजी झाला. 'गावठी शाळे'मध्ये त्यांनी प्राथमिक शिक्षण घेतलं. तिथले संस्कार त्यांच्यावर आयुष्यभर राहिले. तिथं शिकलेल्या मोडी लिपीनं सहीच्या रूपानं आयुष्यभर त्यांची साथ केली. शिवाय तिथं घालाव्या लागलेल्या टोपीनंही त्यांची खास ओळख तयार केली. विसाव्या वर्षापासून दाजीकाका रोज घरच्या सराफी दुकानात जायला लागले आणि २४ व्या वर्षी त्यांचा ताराबाई अभ्यंकर यांच्याशी विवाह झाला.

सांगलीतलं दुकान बहरत असताना पुण्यातही अशी सेवा का देऊ नये, असा विचार सुरू झाला आणि नऊ फेब्रुवारी १९५८ रोजी पुण्यामध्ये त्यांनी 'मे. पुरुषोत्तम नारायण गाडगीळ आणि कंपनी सुरू केली. सांगलीच्या सरस्वतीराणी पटवर्धन यांनी शंभर रुपयांचं पहिलं बिल फाडलं होतं. गुरुपुष्याला सोनं खरेदी करण्याची सवय दाजीकाकांनी ग्राहकांना लावली. 'वेगानं धावणाऱ्या जगाबरोबर धावण्यासाठी आधुनिक राहण्याची तयारी, व्यवहारातील सचोटी आणि प्रामाणिकपणा, जिद्द, ग्राहकांना चांगलाच माल देण्याची इच्छा' हे सूत्र त्यांनी आयुष्यभर जपलं.

पुणे सराफ असोसिएशनबरोबरच रोटरी क्लब, सावरकर प्रतिष्ठान अशा संस्थांचंही काम त्यांनी पाहिलं. पुणे महापालिकेतर्फे विशेष गौरव, 'रोटरी एक्सलन्स ॲवॉर्ड', 'कालनिर्णय पुरस्कार' या पुरस्कारांसह 'वर्ल्ड गोल्ड काऊन्सील' तर्फेही त्यांच्या कार्याचा विशेष सन्मान करण्यात आला.

❀ अण्णासाहेब लाटकर यांचे निधन

ज्येष्ठ ग्रंथ मुद्रक चिं. स. उर्फ अण्णासाहेब लाटकर (वय ८६) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुलगे, सुना व नातवंडे असा परिवार आहे. विद्यार्थीदशेपासूनच लाटकर चळवळीमध्ये सहभागी झाले होते. लाल निशाण गटाचे गटाचे ते सक्रिय कार्यकर्ते होते. कम्युनिस्ट विचारांच्या प्रसारासाठीच त्यांनी मुद्रण व्यवसायात प्रवेश केला होता. त्यांच्या 'कल्पना मुद्रणालया'ने ग्रंथमुद्रण क्षेत्रात स्वत:चा ठसा उमटवला होता. सुबक असा फाँट आणि स्वच्छ सुंदर मांडणी यासाठी ते प्रसिद्ध होते. १९७६ ते ८४ या काळात उत्कृष्ट मुद्रणाबद्दल त्यांनी सलग राष्ट्रपती पुरस्कार मिळवले होते. 'दूरदर्शन'वर गाजलेली महाभारत मालिका चार खंडांत पुस्तक रूपाने त्यांनी प्रकाशित केली होती. अभिनव प्रशालेचा समावेश असलेली आदर्श शिक्षण मंडळी नावारूपास आणण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता.

■

स्नेहाचे भावबंध



अण्णा लाटकर गेल्याची दु:खद बातमी समजली आणि अण्णांच्या आठवणी मनात जाग्या झाल्या. माझा आणि अण्णांचा संबंध आला तो प्रकाशक आणि मुद्रक या नात्याने. मराठीतील काही प्रसिद्ध पुस्तकांच्या छपाईच्या निमित्तानं आमचा दीर्घ काळ व्यावसायिक संबंध राहिला आहे. याकाळात अण्णांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक लखलखीत पैलू मी जवळून पाहिले.

मुद्रण व्यवसायातील अनेक स्थित्यंतरांचे ते साक्षीदार होते. कामावर निष्ठा, आपल्या व्यवसायातील बारकाव्यांची उत्तम जाण, सर्वोत्तमतेचा ध्यास, मेहनत घेण्याची तयारी अशा अनेक गोष्टी अण्णांमध्ये होत्या आणि म्हणूनच नानी पालखीवाला यांच्या 'वुई द पीपल' चा मराठी अनुवाद प्रसिद्ध करायचे ठरले तेव्हा अण्णांचे 'कल्पना मुद्रणालय' साहजिकच डोळ्यांसमोर आले. पालखीवाला यांनी मराठी अनुवादाची रॉयल्टी घेण्यास नकार दिला होता; पण त्यांनी पुस्तकाची निर्मिती उच्च प्रतीची झाली पाहिजे अशी अट घातली होती. वि. स. वाळिंबे यांनीही अनुवादाचे मानधन घेणार नसल्याचे सांगितले होते. अनुवादाचे हस्तलिखित तयार झाले होते. ते घेऊन वाळिंबे आणि मी अण्णांकडे गेलो. त्यांना हे सर्व सांगितले. पालखीवाला यांचे पुस्तक मुद्रणासाठी आपल्याकडे आले या गोष्टीचा अण्णांना खूप आनंद झाला. त्यांनी काम सुरू केले.

पुस्तकाच्या एक ते चार फॉर्मस्ची अक्षरजुळणी झाल्यानंतर अण्णांनी मला व वाळिंबेंना रात्री दहा वाजता प्रेसमध्ये बोलावले. त्यानुसार आम्ही दोघे कल्पना मुद्रणालयात पोहोचलो. अण्णांनी दुसरा फॉर्म मशीनवर चढवला होताच. या फॉर्मच्या पाच प्रती त्यांनी आम्हाला दिल्या आणि एक फॉर्म स्वत:कडे घेतला.

मी शाई एकसमान आली आहे ना, हे पाहिले. वाळिंबेंनी प्रुफे पाहिली. पण अण्णांची नजर आणखी बारकावे टिपत होती. त्यांनी भिंग घेऊन तो फॉर्म तपासला. कुठे किडका टाईप भरला गेला आहे का? याची ते खात्री करत होते. त्यांना दोन खिळे किडके आढळले. ते बदलून पुन्हा फॉर्म मशीनवर लावला गेला. परिपूर्णतेचा ध्यास यालाच म्हणतात. आणि अण्णांना याबाबतीत कधीही तडजोड मान्य नसे. दुसरा फॉर्म आधी छापण्यामध्ये त्यांचा शाई एकसमान यावी असा उद्देश असायचा. स्वत:च्या कामाप्रती विलक्षण निष्ठा व परिपूर्णतेचा आग्रह हे अण्णांचे वैशिष्ट्यच होते.

रणजित देसाई यांचे 'स्वामी' हे पुस्तक 'मेहता पब्लिशिंग हाऊस'कडे आले त्यावेळी अण्णांनी हे पुस्तक डेमी साईजमध्ये व मोठ्या टाईपात छापण्याचा आग्रह धरला. या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या वेळी हे पुस्तक अण्णांच्या कल्पनेनुसार छापले. हे नव्या आकार व टाईपातील पुस्तक रणजित देसाई यांना खूप आवडले होते. या आवृत्तीच्या प्रस्तावनेत रणजितदादांनी अण्णांचा आवर्जून उल्लेख केला

आहे. अशा प्रयोगांतून अण्णांची सौंदर्याभिरुची दिसून आली आहे.

त्यानंतर कांचन घाणेकर यांचे 'नाथ हा माझा' हे पुस्तक छपाईसाठी नेले आणि त्यांनी त्याच्या एक हजार प्रती छापायला सांगितल्या. त्यानंतर आठवड्याभरानं अण्णांचा फोन आला. त्यांनी निर्णयच सांगितला– हे पुस्तक चौदा पॉईंटमध्ये छापायचे आणि त्याच्या दोन हजार प्रती काढायच्या.

हे ऐकून मी हादरलोच. कारण नव्या लेखकाच्या पुस्तकाची पहिली आवृत्ती एक हजारपेक्षा जास्त प्रतींची सहसा काढली जात नसे. पण अण्णांचा मात्र फार आग्रह होता. हे पुस्तक वाचक कितपत स्वीकारतील याबाबत मी साशंक होतो. पण अण्णांच्या आग्रहापुढे मी मान तुकवली. आणि आनंदाची गोष्ट म्हणजे अण्णांचा अंदाज बरोबर ठरला. या पुस्तकाच्या पुढे बऱ्याच आवृत्त्याही निघाल्या. अण्णांना केवळ छपाईचे तांत्रिक ज्ञानच नव्हे, तर वाचकांची अभिरुची आणि साहित्याचीही उत्तम जाण व पारख होती, याचाच यानिमित्ताने प्रत्यय आला.

१९८५ सालानंतर 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ची जबाबदारी सुनिल सांभाळू लागला. अण्णा आणि सुनिल यांचे व्यावसायिक संबंध सुरूच होते. एके दिवशी अण्णांचा मला कोल्हापूरला फोन आला. ''सुनीलविषयी बोलायचे आहे, पुण्याला याल तेव्हा भेटा.''

अण्णांच्या फोनने मी जरा अस्वस्थ झालो. सुनीलचा स्वभाव कडक, तापट पण व्यवहारी. म्हटलं बहुतेक त्याचं अण्णांशी वाजलेलं दिसतंय.

पुढच्या वेळी पुण्याला गेलो तेव्हा अण्णांना फोन केला आणि भेटायला केव्हा येऊ, असं विचारलं. त्यावर अण्णा म्हणाले, ''मीच पंधरा मिनिटांत येतो.''

अण्णा आमच्या पेरुगेटजवळच्या ऑफिसमध्ये आले. तिथून आम्ही दोघं आमच्या घरी चहाला आलो. घरी आल्यावर अण्णांनी माझं अभिनंदन केलं. मी आणखीनच गोंधळलो. त्यानंतर मला सविस्तर हकिकत समजली. सुनील त्यांना दरमहा बिलापोटी ठराविक रक्कम देत असे आणि दिवाळीच्या आधी कामगारांचे बोनस वगैर द्यावे लागत असल्यामुळे ही रक्कम दुप्पट दिली जात असे. पण त्यावर्षीपासून सुनीलने त्यांना सर्व बिले पाठवण्यास सांगितले होते. पण अण्णांनी वेळेत हिशोब केला नव्हता. दिवाळीच्या दरम्यान अण्णांनी सर्व बिले पाठवल्यानंतर सुनीलने त्यांना सर्व रक्कम एकावेळी पाठवली. तो त्यांना दरमहा जी रक्कम देत असे त्याच्या आठपट पैसे त्यांना दिवाळी आधी मिळाल्याचे सांगण्यासाठी व सुनीलचे चोख व्यवहाराबद्दल कौतुक करण्यासाठी ते मुद्दाम आमच्या घरी आले होते. त्याच्या हाती सूत्रे दिल्याबद्दल माझे अभिनंदन त्यांनी केले.

प्रकाशन व्यवसायाच्या निमित्ताने आजवर अनेक माणसे भेटली. त्यामधील काहींनी खूप काही शिकवले. त्यांच्या अनुभवाचे, ज्ञानाचे संचित दिले. केवळ व्यावसायिकच नव्हे तर त्यापलीकडील स्नेहाचे भावबंध गुंफले... अण्णा लाटकर अशांपैकीच एक... त्यांना भावपूर्ण आदरांजली!

– अनिल मेहता

नाही स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स
मराठीत प्रथमच, खरीखुरी E-Books



मेहता पब्लिशिंग हाऊस

१९४१, सदाशिव पेठ, बाजीराव रोड टेलिफोन भवनसमोर, माडीवाले कॉलनी, पुणे ३०.
फोन: +91-20-24476924, 24460313 एक्स्टेन्शन क्र. 221, 245, 250 मो. 94220 46575
e-mail: sales@mehtapublishinghouse.com
Follow us on : http://www.facebook.com/mehta.publishinghouse

आगामी

साधी यंत्रे

डी.एस. इटोकर



आपण आपल्या घरगुती गरजांमध्ये व व्यवहारात लहान लहान अशी खूप यंत्रे वापरतो. ही यंत्रे अगदी सरळ सोपी असतात म्हणून यांना साधी यंत्रे म्हणतात. प्रत्येक गुंतागुंतीच्या वापरात साधी यंत्रे वापरलेली असतात. 'रहाट','अडकित्ता', 'सांडशी' आणि 'सायकल' अशा साध्या यंत्राची माहिती देणारे पुस्तक...

'मेहता पब्लिशिंग हाऊस'ची वाचकांसाठी सुवर्णसंधी...

पुणे आणि कोल्हापूर कार्यालयापासून ७ कि. मी. पर्यंतच्या अंतरावर कॅश ऑन डिलिव्हरीची सुविधा!

५००/- रुपये किंवा अधिकच्या खरेदीवरील पुस्तके कॅश ऑन डिलिव्हरीच्या माध्यमातून आपल्याला घरपोच मिळू शकतात. त्यासाठी वर्गणी मनीआर्डर/डिमांड ड्राफ्टद्वारा कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावी. अथवा एस. बी. आयच्या खात्यातही पैसे भरता येतील.

STATE BANK OF INDIA
SBIN0000455 A/C NO 32749992008

बालनगरी

परीक्षा

फार पूर्वीपासून काशी किंवा बनारस हे एक स्वतंत्र राज्य होते. छोटेसे पण समृद्ध असे ते राज्य होते. तसेच तक्षशीला आणि नालंदाप्रमाणे तेही विद्येचे माहेर घर होते. आणि आजही ते तसेच आहे.

शेकडो वर्षांपूर्वी काशीला साऱ्या भारतभरातून वेद-विद्या व संस्कृत भाषा शिकण्यासाठी लोक येत. तिथे वेगवेगळ्या गुरुंच्या पाठशाळा होत्या. त्यांच्यामध्ये सर्वांत प्रसिद्ध आणि विद्‌वान होते पंडित पाणिनी.

पाणिनी संस्कृत बरोबरच अध्यात्मविद्येचे पाठही आपल्या शिष्यांना देत असत. आपले शिष्य गुणवान व्हावेत, त्यांनी आपल्या वागण्याने लोकांपुढे चांगले आदर्श ठेवावे अशी शिकवण ते नेहमी आपल्या शिष्यांना देत असत.

त्यांचे पाचशे शिष्य होते आणि त्यांच्या त्या आश्रमशाळेचा कारभार राजा व लोकांच्या देणग्यावर चालत असे.

काशीचा राजा रामवर्मा हा अतिशय चांगला व लोकांच्या हिताविषयी दक्ष असा होता. त्याचे सारे मंत्री देखील त्याला योग्य असेच होते.

पण अचानक एके दिवशी राजाच्या मुख्यमंत्र्याने त्याला भेटून

आपणाला निवृत्ती देण्याची मागणी केली. कारण त्याला म्हातारपण आले होते. त्यांतच त्याला असाध्य आजारपण आल्याची चिन्हे दिसत होती.

राजाने प्रधानाला त्याच्या लहानपणापासून पाहिले होते. त्याच्याविषयी राजाला पूर्ण विश्वास आणि आदर होता. पण त्याला कधी तरी मुक्त करायला हवेच होते. शिवाय त्याने सांगितलेली कारणे योग्य होती व या वयांत सारे व्याप सोडून, जबाबदाऱ्यांतून मोकळे होऊन राम राम म्हणत राहिलेले आयुष्य काढण्याची त्याची इच्छा योग्य होती. पण...

राजाचे सारे मंत्री आपापल्याजागी योग्य आणि आवश्यक होते. तरी पण सर्वांना सांभाळून घेऊन, योग्य वेळी योग्य निर्णय विवेकाने घेणारा, तो निर्णय निर्भयपणे सांगणारा, सर्वांशी समतेने वागणारा असा प्रधान एकदम कुठून आणायचा...

या काळजीने त्रासलेल्या राजाला अचानक एक कल्पना सुचली. त्याला वाटले, आपल्या इथले गुरू पाणिनी हे विद्‌वान आणि सर्वांच्या आदराचे स्थान आहेत. तेव्हा या विषयी त्यांचा सल्ला घ्यावा आणि त्याप्रमाणे अमात्याची नेमणूक करावी.

त्यावेळी गुरू पाणिनी देखील खूप चिंतेत होते. त्यांना एकुलती एकच पण अतिशय हुशार आणि विलक्षण सुंदर अशी मुलगी होती. ती आता सोळा वर्षांची झाली होती. आईबाबांची अत्यंत लाडकी अशी ती गुणवती मुलगी मधुरा हिला योग्य असा वर शोधून, शक्यतो त्याला घरजावई करून घ्यावे असा त्यांच्या बायकोने लकडा लावला होता.

पंडितजींना हे घरचे काम शक्य तितक्या तातडीने पण नीट लक्षपूर्वक करणे भाग होते. पण...

त्यांचे आणि त्यांच्यासारख्या अन्य गुरुंच्या शिष्यांमधूनच असा तरुण शोधणे भाग होते. याविषयी विचार करत असतानाच राजाने त्यांची भेट घेऊन त्यांना आपल्या अमात्याच्या शोधात मदत करण्याची विनंती केली.

राजा मध्यम वयस्क होता. त्याला चांगला गुणवान, विचारी, निर्भय, ज्ञानी आणि विवेकी अमात्य नीट परीक्षा घेऊन द्यायचा होता. तो तरुण असेल तर मग दुधांत साखर पडणार होती. अखेर त्यांनी खूप विचार करून काय करावे या विषयी निश्चिती केली.

साऱ्या वाराणशीच्या म्हणजे बनारसच्या गुरुकुलातून आपल्या कन्येचे लग्न आपण करणार असे प्रसिद्ध केले. पण आपण गरीब असल्याने जो तरुण सर्वांत चांगले दागिने कसेही करून आणेल त्यालाच आपण आपली मुलगी देऊ असेही कळवले.

पाणिनींचे हे म्हणणे सर्व गुरुकुलांतून समजले आणि सर्वत्र एकच धमाल उडाली. अर्थात पाणिनींच्या अटीबरोबर आणखी एक खोच होती. हे दागिने जर चोरून आणले असले तरी चालतील पण ते कुणालाही कळलेले असून उपयोगी नव्हते.

पौर्णिमेच्या दिवशी साऱ्या तरुणांनी आश्रमशाळेत येऊन पाणिनींना भेटायचे होते.

साऱ्या काशीत हाच एक चर्चेचा विषय झाला होता. ज्ञानदानांत रमलेले, सदासमाधानी, साधे राहणारे, शीलवान आचार्य... आणि मुलीच्या लग्नासाठी असली उफराटी अट...

लोकांप्रमाणेच काशिराजदेखील गोंधळले होते. आपण त्यांना अमात्य शोधण्याविषयी सांगितले, तर मध्येच हा जावयाचा शोध कुठून आला?... पण राजाचा पाणिनींवर विश्वास आणि श्रद्धा होती.

एकेक दिवस जाता जाता अखेर पौर्णिमा आली. पहिला प्रहर उलटला आणि सर्वात आधी काशीराज आश्रमांत आले.

शंभराहून अधिक तरुण त्या मंडपात जमले. सर्वांना अल्पोपहार देण्यांत आला आणि मग वर परीक्षेला सुरवात झाली.

एकेक जण येऊन आपण आणलेले दागिने दाखवीत होता आणि आपण ते कसे मिळवले तेही स्पष्टपणाने सांगत होता.

ते दागिने कुणी आपल्या घरून आणले होते. कुणी मागून, कुणी

उसने, कुणी खोटे सोन्याचा मुलामा देऊन तर काहींनी चक्क चोरून आणले होते आणि ते आपली चोरी कुणालाही माहीत नसल्याचे देखील सांगत होते.

साऱ्यांनी आपापले दागिने दाखविले. आपले पराक्रम सांगितले. पण त्यांचा एक शिष्य पुढे न येता एका कोपऱ्यात उभा राहून हे सारे पाहात आहे, हे पाणिनींना दिसले.

साऱ्यांच्या नंतर पाणिनींनी त्याला पुढे बोलावले. त्याचे नांव वररुची, वररुची अतिशय बुद्धिमान आणि ज्ञानी तर होताच. तो त्याहून अधिक गुणवान आणि विवेकी होता. पण... तो दूरच्या एका लहान खेड्यांतून फारच गरीब घरांतून आला होता.

गुरु पाणिनींनी त्याला पुढे आल्यावर त्याने या विवाह स्पर्धेत भाग न घेण्याचे कारण विचारले. तो आजन्म ब्रह्मचारी राहणार का असाही प्रश्न केला.

'गुरुदेव मी अत्यंत गरीब घरातील आहे. आपली मुलगी रुपवती आणि गुणवती असल्याने ती सुखात राहावी हे तुम्हाला वाटणे योग्य आहे. पण मी गरीब असल्याने घरांतून दागिने आणणे अशक्य होते.'

उसने आणणे अयोग्य होते. कारण काही काळ मोरपिसे लावल्याने इतर कुणी मोर होईल का? आणि अशी स्वत:ची फसवणूक करून घेऊन मिळणारे काहीही खरं समाधान व सुख देऊ शकत नाही.

'चोरून आणायचे तेही कुणालाही न कळता हे अशक्य आहे. एक तर चोरी सारखे वाईट काम करून टिकाऊ सुख मिळणे कसे शक्य आहे. आणि सर्वांना चोरून म्हटले तरी आपल्या अंतरातल्या ईश्वरालाही ते कळणारच. मग...?'

मला स्वत:ला या गोष्टीची जाणीव आहे. आपल्या मर्यादांची जाणीव, तुमच्या मुलीला सुख मिळावे ही अपेक्षा, आणि स्वत:ची विवेक बुद्धी यामुळे मी या विवाहस्पर्धेपासून अलिप्त राहण्याचे ठरविले. आपल्या कन्येचा हात लाभेल तो नशिबवान! कारण केवळ लक्ष्मी अशी आपली कन्या स्वत:च्या पायगुणाने आणि अंगातल्या गुणांनी आपल्या पतीचे कल्याण करण्यास कारण ठरेल यांत शंका नाही. माझ्या शुभेच्छा.' असे बोलून तो वळू लागला.

तो निघाल्याचे पाहून गुरू पाणिनींनी त्याला थांबविले व ते बोलू लागले.

‘वररुची, वत्सा, तुझ्या अनेक गुणांबरोबरच तू शीलवान आहेस, विचारी आहेस आणि खोट्या व अवास्तव अपेक्षा बाळगणारा नाहीस. हे पाहून मला आनंद होतो आहे. आज माझे गुरुपद सार्थक झाले.’ इतके बोलून गुरुदेव क्षणभर थांबले.

त्याच क्षणी राजा पुढे झाला. त्याने गुरुदेवांना काही गोष्ट हळूच सांगितली. काशीराजाच्या बोलण्यावर पाणिनींनी मान डोलावली. मग ते पुन्हा बोलू लागले.

वररुची, मुला, मी माझी कन्या मधुरा आणि माझे गुरुपीठ तुला देऊन वानप्रस्थांत जायचे ठरवत होतो. पण काशीराजांनी आपल्या अमात्य मंडळासाठी तुझी मागणी केली आहे. त्यांचे मागणे व त्यामागची कारणे योग्य आहेत. पण...

‘वत्सा, एका गरीब आचार्याची कन्या स्वीकारून आचार्यपद स्वीकारून गरीबीतच राह्यचे की अमात्यपदाचा स्वीकार करायचा हे तू ठरव. दोन्हींतले काय स्वीकारायचे याचा निर्णय तू घ्यावास.’

आपण आचार्य कन्येचा व गुरुकुलातील दुय्यम आचार्यपदाचा स्वीकार करू, मात्र त्याला आचार्य कन्येने मनमोकळी संमती द्यायला हवी, असे त्याने लगेच सांगितले.

जमलेल्या तरुणांतून ‘अरेरे, कमनशिबी, दरिद्री, भिकारडा’ वगैरे उद्‌गार ऐकू आले.

मग राजाने वररुचीला त्याच्या निवडीचे कारण विचारले. काशिराजाला सुद्धा आश्चर्य वाटल्याचे दिसत होते.

‘महाराज, स्पष्ट बोलण्याबद्दल क्षमा असावी.’ वररुची बोलू लागला. ‘कोणतेही पद, सत्ता, संपत्ती हे सारे अळवावरच्या पाण्यासारखे! दिसायला सुंदर पण केव्हाही नष्ट होणारे. ज्ञानाच्या अधिराज्यांतले आचार्यपद हे ध्रुवपदासारखे अढळ- कायमचे, पिढ्यान् पिढ्या यश व कीर्ति देणारे. आणि सद्‌गुणी व समाधानी पत्नी असेल तर मिळणारे समाधान व आनंद स्वर्गाच्या राज्यापेक्षा तुच्छ आहे, कमी महत्त्वाचे आहे.’ वररुची उत्तरला.

काशीराज व गुरू पाणिनींनी एकमेकांकडे पाहून माना डोलावल्या.

- आणि थोड्यांच दिवसांत वररुची मधुरेशी विवाह करून, अमात्यांच्या हाताखाली भावी अमात्यपदाचे शिक्षण घेऊ लागला.

■

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.: PNCW / M-184 / 2012 - 2014 / Posted at Marketyard Pso, Pune
Publishing Date : 11 Feb.2014 Posting Date : 11 Feb.2014

आगामी

मूळ लेखिका
सुधा मेनन
अनुवाद
सुमिता बोरसे

लाखोंना स्वत:च्या क्षमतेची
खरी जाणीव करून देण्यास उद्युक्त करणाऱ्या
यशस्विनींच्या अंतरंगांचे मनमोहक दर्शन!

आघाडीचे महिला नेतृत्व

भारतातील प्रेरणादायी महिला

आता ती केवळ... राबणारी बिनचेहऱ्याची बाई राहिलेली नाहीतर ती स्वत:चे हक्क असलेली स्वतंत्र नागरिक आहे. केवळ घरकाम, मोलमजुरीच नव्हेतर उद्योगसमूहाची अध्यक्षा... बँकेची व्यवस्थापिका... प्रतिष्ठित सामाजिक कार्यकर्ती... ते उत्कृष्ट कलाकार अशा विविध कार्यक्षेत्रांत तिने आपल्या कर्तृत्वाचा 'कॅन्व्हॉस' चितारला आहे.

अनु आगा... लीला पूनावाला... मेहेर पद्मजी... किरण मुझुमदार-शॉ... यांच्यासारख्या प्रथितयश उद्योजिका! शुभा मुद्गल, मल्लिका साराभाई यांच्यासारख्या कलाकार! शिखा शर्मा... नैना गिडवाई... प्रिया पॉल... यांच्यासारख्या यशस्विता आणि सुवर्णकन्या पीटी उषा... यांच्या यशोगाथांचा हा आलेख!

BOOK POST
Printed Matter

मेहता पब्लिशिंग हाऊस
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.